MAHIS 2.4 M

# एम.ए.इतिहास

## सत्र - II

## (राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सुधारित अभ्यासक्रम)

# २०व्या शतकातील सोव्हिएत समाजवादी प्रजासत्ताक संघाचा (यु.एस.एस.आर.) इतिहास

© UNIVERSITY OF MUMBAI

**प्राध्यापक रविंद्र द. कुलकर्णी**
कुलगुरू,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राचार्य डॉ. अजय भामरे**
प्र-कुलगुरु,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राध्यापक शिवाजी सरगर**
संचालक,
दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्रकल्प व अभ्यास समन्वयक** : **प्रा. अनिल आर. बनकर**
सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग व
प्रमुख, मानव्यविद्याशाखा,
दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र,
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**संपादक** : **प्रा. शिवदास चांगदेव घाडगे**

**लेखक** : **प्रा. टी. पी. मोकल**
इतिहास विभाग प्रमुख,
डॉ. चिंतामणराव देशमुख वाणिज्य आणि के. जी.
ताम्हाणे कला महाविद्यालय,
रोहा, जि. रायगड

: **जयवंत पठाडे**
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग
तुकाराम बाबुराव कदम कला व विज्ञान आणि
एएमपी वाणिज्य महाविद्यालय, भरणे
ता. खेड, जि. रत्नागिरी

**जुन २०२५, मुद्रण - १,**

**प्रकाशक** : संचालक, दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र,
मुंबई विद्यापीठ, विद्यानगरी, मुंबई -४०० ०९८.

**अक्षर जुळणी व मुद्रण :** मुंबई विद्यापीठ मुद्रणालय,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई - ४०० ०९८

# अनुक्रमणिका


| क्रमांक | अध्याय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | रशियातील राजकीय सत्ता व पक्षांचा विकास | ०१ |
| २. | बोल्शेव्हिक व मेन्शेव्हिक विचारसरणी | ०५ |
| ३. | ऑक्टोबर १९१७ची क्रांती आणि सोव्हिएट युनियनची निर्मिती | १५ |
| ४. | रशियन क्रांती आणि पाया (१९१७-१९२७) रशियन राज्यक्रांतीतील व्लादिमीर लेनिनचे योगदान (१८७०-१९२४) | २७ |
| ५. | जोसेफ स्टॅलिन (१९२७-५३) दुसरे महायुद्ध व सोव्हिएत संघ (१९३९-४५) | ४१ |
| ६. | ६.१ शीतयुद्ध आणि सोव्हिएत संघ<br>६.२ डॉ-स्टालिनायझेशन आणि ख्रेश्चुव्ह थॉ (१९५३-१९६४)<br>६.३ ग्लासनोस्त (मोकळेपणा) आणि पेरिस्त्रोईका सुधारणा (१९८५-१९९१)<br>६.४ सोव्हिएत रशियाच्या विघटनाचे परिणाम | ५९ |


❖❖❖❖

| | |
|---|---|
| **Programme Name: M.A. Sem- II** | **Core course: 51411 History of USSR in the 20th century** |
| **Total Credits: 02** | **Total Marks: 50** |
| **Semester End Assessment: 25** | **Internal Continuous Assessment: 25** |

**Course Outcome**

a) To create a comprehensive understanding of the political, social, and economic developments that took place in the Soviet Union during the 20th century.
b) To analyze the Bolshevik Revolution in 1917 to the collapse of theSoviet Union in 1991.
c) To understand the Soviet history, including Lenin, Stalin, Khrushchev, and Gorbachev.

**MODULE I: (2 Credits)**

**Unit 1: Historical Setting of USSR**

a) The Development of Radical Political Parties, 1892-1904, The Soviet Union

b) Bolsheviks and Mensheviks, Socialist Idea

c) October Revolution of 1917 and the creation of the Soviet Union

**Unit 2: The Rise and fall of the Soviet Union (1917–1991)**

a) Revolution and foundation (1917–1927), Vladimir Lenin, Stalin era (1927–1953), World War II and Soviet Union

b) Cold War and Soviet Union, De-Stalinization and Khrushchev Thaw (1953–1964)

c) Glasnost (Openness) and Perestroika (Democratization) reforms (1985–1991), Dissolution and aftermath

**References:**


Ascher, A.*; Revolution of 1905: Russia in disarray*; Stanford University Press, Stanford, 1988.

But, V. P. (ed.); *Russian Civil War: Documents form the Soviet Archives,* Martin's Press, 1996.

Carr, E. H.; *Bolshevik Revolution 1917-1923,* Vol. 1, Maenillan Press, New York, 1950.

De Madariage, Isabel, *Russian in the age of Catherine the great*, Phoenix Press, London, 1981.

Gellately, R., *Lenin, Stalin and Hitler: The age of Social Catastrophe*, Alfred A. Knopf, 2007.

Gaidar, Yegor, *Collapese of an empire : Lessons for modern Russia*, Brookings Institution's Press, Washington DC, 2007.

Gromyko, A.A. and Ponomarev, (ed.), *Soviet Foreign Policy 1917-1980* (*2 Vol.,)* Progress Publishers, Moscow, 1981.

Kotz, D. M. & Fred, *Weir: Russia's path from Gorbachev to potin : The Derrise of the Soviet System & the New Russia*, Routledge, London, 2007.

McDaniel, Tim, *Agony of the Russian idea*, Princeton University Press, Princeton, 1996.

Martin, J. *; Medieval Russia, 980-1584,* C.U. P., Cambridge, 1995.

Plokhy, Serhii, *Ukraine and Russia: Representations of the past*, Toronto, University of Toronto Press, 2008.

Riasanovsky, N.V., History of Russia, 6th ed., Oxford University Press, 2000.

Rzhevsky, N., *Cambridge Companion to Modern Russian Culture*, C.U.P, Cambridge, 1998.

Sakwa, R. (ed.), *Power in policy in Putin's Russia*, Routledge, London, 2009.

Speetor, Ivar, *Introduction to Russian History and Culture*, D. Van Nastrand Company, Toronto, 1949.

Smele J. & Heywood, A (ed.), *Russian revolution of 1905: Centenary perspectives*, Routledge, London , 2005.

Trotsky, L., *History of the Russian revolution*, Victor Gollancz, London, 1965.

Walsh, W.B. (ed), *Readings in Russian History from Ancient Times of the post-Stalin era, Vol.3*, The Revolutionary era and the Soviet period, Syracuse University Press, New York, 1963.

Waldron, Peter, *End of imperial Russia, 1855-1917*, St. Martin's Press, New York, 1997.

World infopaedia, Russia Part -1, Pragun Publication, New Delhi, 2007.

World infopaedia, Russia Part -2, Pragun Publication, New Delhi, 2007.

# १

# रशियातील राजकीय सत्ता व पक्षांचा विकास

**प्रकरण रचना :**

१.० उद्दिष्टे

१.१ प्रस्तावना

१.२ रशियातील राजकीय कारकिर्दी

१.३ रशियातील राजकीय पक्ष

१.४ सारांश.

१.५ प्रश्न

१.६ संदर्भ सूची

## १.० उद्दिष्टे :

१) रशियातील राजकीय कारकिर्दी समजून घेणे.

२) ररशियातील राजकीय पक्षांची माहिती समजून घेणे.

## १.१ प्रस्तावना :

रशियात परंपरागत वारसा हक्काने झार सत्ता प्रचलित होती. हे सत्ताधीश आपल्या राजवटी राबवत असताना सत्तेचे केंद्रस्थानी राजघराणे आहे.व हे घराणेच सर्वाधिकारी आहे या विचारसरणीतून हे राज्यकर्ते लोक आपल्या राजवटी चालवत होते. मग या राजवटी चालवत असताना ते सर्वसामान्य जनतेचा विचार करत नव्हते. सर्वसामान्य जनतेचे स्वातंत्र्य, त्यांचे हक्क यांची हे लोक पायमलनी करत होते. यातूनच पुढे सत्ता संघर्षाची सुरुवात झाली. ही सर्व परिस्थिती समजून घेण्याच्या उद्देशानेच सर्वप्रथम राजकीय कारकिर्दी व नंतर राजकीय पक्ष या दोन्हीं बाबींचा आढावा या घटकात घेण्यात आला आहे.

## १.२ रशियातील राजकीय कारकिर्दी :

**१) झार पॉल पहिला :**

इ. स. १७९६ मध्ये झार पॉल रशियाच्या सत्तेवर आला.तो हुकुमशाही प्रवृत्तीचा होता. राज्यारोहणसमारंभानंतर त्याने शासनात अनेक बदल घडवून आणले. सैन्यात त्याने कडक शिस्त निर्माण केली. सुरुवातीच्या कालखंडात राजाचे सरदार ओळखीचा फायदा घेऊन वर्षातून फक्त एकदा परेडला जात असत.झार पॉल पहिला याने सर्वांनाच परेड सक्तीची

केली. सैनिकांना प्रशिक्षण सक्तीचे केले. राज्यकारभारात असलेल्या भ्रष्टाचार दूर करण्यात त्यांनी बरेच यश आले .लोकांच्या पोशाखात आणि व्यवसायात सुद्धा त्याने अनेक बदल घडवून आणले.झार पॉल पहिला याला

रशियात हुकुमशहा व्हायचे होते. आपल्या दरबारात त्याने नवीन कायदे करून दरबारी अधिकाऱ्यांमध्ये दहशत निर्माण केली. त्यामुळे दररोज दरबारात हजर राहणे म्हणजे फार मोठे संकट होऊन बसले होते .राजा रस्त्यावरून फिरावयास जात असताना उमरावांनी आणि मानकरी लोकांना आपल्या वाहनातून उतरून राजाला अभिवादन करण्याची सक्ती करण्यात आली होती. ज्यावेळी राज्याभिषेक समारंभ झाला त्यावेळी पोलंडच्या राजाला झार पॉलच्या बरोबरीचे स्थान देण्यात आले नाही.उलट त्याला वरच्या गॅलरीत उभे ठेवण्यात आले त्यामुळे पॉलिश लोक रशियन राज्यावर संतप्त झाले.१८०१ मध्ये त्याचा खून झाला.

**२) झार अलेक्झांडर पहिला:**

झार पॉल पहिल्याच्या मृत्यूनंतर झार अलेक्झांडर पहिला रशियाच्या सत्तेवर आला. त्याच्यावर उदारमतवादी विचारांचा प्रभाव होता. नेपोलियन बोनापार्टचा पराभव करण्यामध्ये झार अलेक्झांडर पाहिल्याचा सिंहाचा वाटा होता. त्यामुळे व्हिएन्ना परिषदेमध्ये त्याला मनाचे स्थान मिळाले होते. ध्येयवाद, स्वप्नाळूवृत्ती आणि हुकूमशाही वृत्ती याचा मनोहर संगम त्याच्यात झाला होता. व्हिएन्ना परिषदेत तर युरोपची गुलामगिरीतून सुटका करणारा देवदूत शांतीदूत व नेपोलियनच्या मगरमिठीत सुटका करणारा देवदूत अशा शब्दात त्याचा गौरव करण्यात आला. त्याच्या आदर्शवादी संकल्पनेतूनच यूरोपात पवित्र संघ अस्तित्वात आला.

नेपोलियनचा पडाव करण्यामध्ये त्याचे योगदान महत्त्वाचें ठरले. नंतर तो मेटरनिकच्या प्रभावाखाली आल्याने त्याच्या ध्येय धोरणांमध्ये बदल झाला.

पुढे त्याच्यामध्ये धरसोड वृत्ती निर्माण झाली व यातूनच त्याच्या वाट्याला निराशा आली. अशा अवस्थेतच त्याचा मृत्यू झाला.

**३) झार निकोलस पहिला :**

झार अलेक्झांडरच्या मृत्यूनंतर त्याचा भाऊ झार निकोलस पहिला हा गादीवर आला. त्यांनी आपली कारकिर्दी दडपशाही, पोलीस व नियंत्रण या तीन शब्दांना अनुसरून चालवली. झार अलेक्झांडरने आपल्या मृत्यू पूर्वी आपला वडील मुलगा कॉन्स्टटाईन याच्या ऐवजी

वारस म्हणून निकोलस पहिला याची नेमणूक केली.तो प्रतिगामी धोरणाचा अवलंब करणारा होता.त्यांनी सत्तेवर येताच उदारमतवाद्यांचे बंड पूर्णपणे मोडून टाकले .थर्ड सेक्शन नावाचे मंत्रालय स्थापन करून या मंत्रालयाचे प्रमुख म्हणून एका पोलीस अधिकाऱ्याची नेमणूक. पोलिसांना त्यांनी व्यापक अधिकार दिले. पोलिसांच्या हाती थर्ड सेक्शनच्या मदतीने त्यांनी सर्व क्रांतिकारी चळवली दडपून टाकल्या.चौकशी शिवाय तुरुंगात अटक करण्याचा किंवा हद्दपार करण्याचा अधिकार सुद्धा पोलिसांना त्यांनी दिला. सरकार विरोधी भाषणे

करणाऱ्यांना हद्दपार केले. त्यांनी वीस वर्षात १५ लाख लोकांना रशियातून हद्दपार केले .आपल्या राजवटीत उदारमतवादी विचारांचा प्रसार होऊ नये म्हणून त्यांनी अनेक नियंत्रणे जनतेवर लादली. रशियन लोकांना परदेशी प्रवासाची परवानगी नाकारली. परकीय प्रवाशांना रशियात बंदी घातली .रशियातील तरुण विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षण घेण्यावर बंदी घातली. वर्तमानपत्रांवर कडक निर्बंधने लादली. ज्या पुस्तकांवर नियंत्रण लादण्यात आली होती ती वाचताना कोण जर आढळला तर त्यांना तातडीने तो हद्दपार करत होता.थोडक्यात प्रत्येक क्षेत्रात त्यांनी दडपशाही माध्यमाचा अवलंब करून रशियन जनतेची मोठ्या प्रमाणात पिळवणूक केली.

**४) झार अलेक्झांडर दुसरा :**

क्रिमियन युद्ध सुरू असतानाच झार अलेक्झांडर दुसरा रशियाच्या सत्तेवर आला होता. या युद्धात त्याच्याच कारकीर्दीत रशियाला पराभव पत्करावा लागला होता. तसेच पॅरिस तहावर त्याला सही करावी लागली होती.या तहामुळे रशियाचे काळ्या समुद्रावरील वर्चस्व नष्ट झाले होते. त्यामुळे रशियन जनता त्याच्यावर नाराज होती. त्याच्या कार्यक्षमतेमुळे रशियाचा पराभव झाला व रशियाची आंतरराष्ट्रीय राजकारणातील प्रतिमा मलिन झाली असे रशियन जनतेला वाटू लागले. नंतर त्यांनी आपल्या विचारसरणीत बदल करून रशियातील गुलामगिरीचे उच्चाटन केले,न्यायखात्यात सुधारणा केल्या, रशियात ३३ प्रांतांमध्ये स्थानिक सभा निर्माण केल्या, वृत्तपत्रांना स्वातंत्र्य दिले. तरी पण संपूर्ण जनमत मिळविण्यात त्याला अपयश आले.व यातूनच त्याचा खून होवून मृत्यू झाला.

**५) झार अलेक्झांडर तिसरा :**

वडिलांच्या मृत्यूनंतर झार अलेक्झांडर तिसरा रशियाच्या गादीवर आला. त्यावेळी त्याचे वय ३६ वर्ष होते. तो दृढ निश्चयी होता.तो हुकूमशाही प्रवृत्तीचा होता. तसेच तो उदारमतवादी चळवळीचा कट्टर शत्रू होता. सत्तेची सूत्रे हातात घेतल्यानंतर त्यांनी वडिलांच्या खुनाशी संबंधित असणाऱ्यांना कठोर शिक्षा केली. विद्यार्थी व प्राध्यापक यांच्या हालचालींवर गुप्तपणे लक्ष ठेवले. अनेकांना केवळ संशयावरून हद्दपार केले. गुप्त पोलिसांची संख्या वाढविली. पोलिस प्रमुख व चर्च प्रमुख यांच्या मदतीने सर्वसामान्य जनतेवर मोठयाप्रमाणात अत्याचार केले. खेड्यांचा कारभार त्यांनी जमीनदारांकडे सोपविला. जमीनदारांना केंद्रसरकारच्या नियंत्रणाखाली आणले. उमरावाना जादा अधिकारी देण्यासाठी घटनेत बदल केले. ड्युमा व स्थानिक शासनाचे अधिकारी मर्यादित केले. प्रांतांच्या प्रमुखांना जास्त अधिकार दिले. गुप्त अधिकाऱ्यांमध्ये वाढ केली. या सर्व बाबींच्या माध्यमातून झार अलेक्झांडर तिसऱ्याला सत्तेवर नियंत्रण मिळविण्यात यश आले. मात्र त्याच्या धोरणामुळे रशियातील प्रगतीचा वेग मंदावला.याही पेक्षा भयानक म्हणजे त्यांनी रशियन जनतेवर त्यांनी रशियन संस्कृती जबरदस्तीने लादण्याचा प्रयत्न केला. ख्रिश्चन धर्म सर्वांनी स्वीकारावा असा त्यांनी आदेश काढला. रोमन कॅथोलिक सारख्या पंथाचा त्यांनी छळ केला. अनेकांवर रशियन भाषेची सक्ती केली. रशियन भाषा न शिकणाऱ्यांची नोकरीतून हकालपट्टी केली. त्यांनी आपल्या राजवटीत लोकांवर धर्म, चालीरीती व भाषेच्या बाबतीत लोकांवर मोठ्या प्रमाणात बंधने लादल्याने त्याच्याविरोधात मोठ्याप्रमाणात जनमत तयार

झाले. ज्यू लोकांवर त्यांनी मोठ्या प्रमाणात अत्याचार केले. त्याचाच कारकिर्दी भांडवलदार व कामगार यांच्यामध्ये मोठ्याप्रमाणात संघर्ष उद्भवले.

एकंदरीत त्याची राजवट सर्वसामान्य जनतेच्या हिताची नव्हती.

**६) झार निकोलस दुसरा :**

अलेक्झांडर तिसऱ्याच्या मृत्यूनंतर झार निकोलस दुसरा रशियाच्या गादीवर आला. तेंव्हा त्याचे वय २६ वर्षाचे होते. त्याचा स्वभाव उर्मट होता. त्यांनी हुकूमशाही पद्धती अवलंबली होती. त्याच्या राजवटीत झार, झरीना व रासपुटीन या त्रिकुटांची जोडी प्रसिद्ध झाली होती. या सर्वांनी सरकारी तिजोरीची उधळपट्टी मोठ्याप्रमाणात केली होती. रुसीकरण, दडपशाही व अत्याचार या तीन बाबींना अनुसरून त्यांनी आपली राजवट राबविली होती. त्यांनी जनतेचे स्वातंत्र्य पूर्णपणे संपुष्टात आणले होते. त्यांनी त्याच्या राजवटीत महत्त्वाच्या जागांवर प्रतिगामी व अत्याचारी लोकांच्या नियुक्त्या केल्या होत्या. त्यांनी मुद्रण स्वातंत्र्य पूर्णपणे संपुष्टात आणले होते. रशियन भाषेची सक्ती केली होती.भांडवलदार कामगार संघर्ष,१९०४- ०५ रूसो जपान युद्ध या दोन महत्वाच्या बाबी त्याच्याच कारकीर्दीत घडल्या होत्या. परिणामी त्याच्या बद्दल रशियन जनतेच्या मनात विलक्षण राग होता.

**आपली प्रगती तपासा :**

१.रशियातील राजकीय सत्तांची माहिती जाणून घ्या.

## १.३ रशियातील राजकीय पक्ष .

**१) समाजवादी क्रांतिकारी पक्ष : (Social Revolutionary Party)**

शेतकऱ्यांच्या न्याय हक्कांचे संरक्षण करण्याच्या उद्देशाने रशियात समाजवादी क्रांतिकारी पक्ष स्थापन झाला होता. जमीनदारांनी शेतकऱ्यांच्या घेतलेल्या जमिनी शेतकऱ्यांनी हिसकावून घ्याव्यात असे या पक्षाचे ठाम मत होते. तसेच हे काम करत असताना प्रसंगी शेतकऱ्यांनी दहशतवादी मार्गाचा अवलंब करावा असे त्यांना वाटत होते.या विचारसरणीतूनच त्यांनी आपले कार्य सुरू ठेवले होते.

**२) समाजवादी क्रांतिकारी पक्ष : (Social Democratic Party)**

रशियात मजुरांनी आपल्या निरनिराळ्या संघटना स्थापन केल्या होत्या. त्या संघटनाचे नाव होते समाजवादी क्रांतिकारी पक्ष. या पक्षाचा मुख्य उद्देश रशियात क्रांती करून सत्ता परिवर्तन करणे हा होता. मात्र ही क्रांती कोणत्या मार्गाने करावी या बाबत दोन मतप्रवाह निर्माण झाले व यातूनच समाजवादी क्रांतिकारी पक्षात दोन गट निर्माण झाले.

**अ) मेन्शेव्हिक :**

रशियात शांततेच्या मार्गाने संघर्ध करून सत्ता परिवर्तन घडवून आणणे ही या गटाची विचारसरणी होती. या साठी प्रसंगी हा गट इतर पक्षांची मदत घेण्यासाठी तयार होता.

**ब) बोलशेव्हिक गट:**

रशियात हिंसक मार्गाने संघर्ध करून सत्ता परिवर्तन घडवून आणणे ही या गटाची विचारसरणी होती. प्रसंगी श्रमिक जनतेची हुकूमशाही निर्माण झाली तरी चालेल असे या गटाला वाटत होते. या गटाला फक्त कामगारांचे अस्तीत्व मान्य होते.

**आपली प्रगती तपासा:**

१) रशियातील राजकीय पक्षांची माहिती जाणून घ्या.

## १.४ सारांश.

रशियाच्या इतिहासातील राजकीय कारकिर्दी व राजकीय पक्षांच्या माहितीचा अभ्यास करताना आपणास दोन महत्वाच्या बाबी प्रकर्षाने जाणवतात. पहिली बाब म्हणजे रशियन राज्यकर्त्यांची एकाधिकारशाही व हुकूमशाही जी सर्वसामान्य जनतेच्या हिताच्या दृष्टीने मारक ठरते. कारण या एकाधिकारशाही व हुकूमशाहीमुळे सर्वसामान्य जनतेचे जीवन असाह्य होते.

तर दुसरी बाब म्हणजे पीडित सर्वसामान्य जनतेचा असंतोष व त्यातून निर्माण होणारा उद्रेक पक्ष स्वरूपात संघटित होतो. सत्तांतर बदलासाठी संघर्ष करतो व सत्ता परिवर्तन करतो.व समाजाला समाजवादी विचारसरणीचा वारसा देतो.या सर्व बाबी आपण या घटकामध्ये समजून घेतल्या आहेत.

## १.५ प्रश्न :

१. रशियातील राजकीय कारकिर्दीचा आढावा घ्या.

२. रशियातील राजकीय पक्षांची माहिती थोडक्यात लिहा.

## १.६ संदर्भ सूची :

१. विसाव्या शतकातील जग - डॉ. धनंजय आचार्य.

२. आधुनिक जग - डॉ.एन. एस. तांबोळी.

३. आधुनिक जग- पी. जी. जोशी.

४. आधुनिक जग भाग - १ व भाग - २- डॉ. सुमन वैद्य, डॉ. शांता कोठेकर.

५. आधुनिक जगाचा इतिहास- प्राचार्य आर. डी. गायकवाड, प्राचार्य वाय. एन. कदम, प्रा. डी. डी. थोरात.

❖❖❖❖

# २

# बोल्शेव्हिक व मेन्शेव्हिक विचारसरणी

**प्रकरण रचना :**

२.० उद्दिष्टे

२.१ प्रस्तावना

२.२ बोल्शेव्हिक  विचारसरणी

२.३ मेन्शेव्हिक विचारसरणी

२.४ सारांश.

२.५ प्रश्न

२.६ संदर्भ सूची

## २.० उद्दिष्टे :

१) बोल्शेव्हिक व मेन्शेव्हिक गट का निर्माण झाले त्याची पार्श्वभूमी समजून घेणे.

२) रशियातील बोल्शेव्हिक  विचारसरणीचा अभ्यास करणे.

३) रशियातील मेन्शेव्हिक विचारसरणीचा अभ्यास करणे

४) रशियातील बोल्शेव्हिक व मेन्शेव्हिक विचारसरणीचा प्रभाव समजून घेणे.

## २.१ प्रस्तावना :

रशियन सोशल डेमॉक्रॅटिक लेबर पार्टीच्या सैद्धांतिक मतभेदांमुळे बोल्शेव्हिक आणि मेन्शेव्हिक असे दोन गट निर्माण झाले. या दोन्ही गटांचा मुख्य उद्देश रशियात सुरू असणारी अनियंत्रित सत्ता उलथून टाकणे हा होता. मात्र या दोन्ही गटांच्या विचारसरणीमध्ये मात्र टोकाची मतभिन्नता होती. कारण प्रत्येक गटाची विचार प्रणाली व कार्य वेगवेगळ्या स्वरूपाचे होते.या दोन्ही गटाने झार सत्ता व जमीनदार व भांडवलदार यांचे वर्चस्व उलथून टाकण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले.व रशियन राजकारणात आपले अस्तित्व कायमस्वरुपी टिकवून ठेवले अशा या बोल्शेव्हिक व मेन्शेव्हिक विचारसरणीच्या माहितीचा आढावा खालील माहितीच्या आधारे स्पष्ट केला आहे.

## २.२ बोल्शेव्हिक विचारसरणी



**१) बोल्शेव्हिक गटाचा उगम :**

बोल्शेव्हिक हा गट सुरुवातीला अल्पमतामध्ये होता. मार्क्सवादी विचारवंत न्यिकलाय लेनिन (मूळ नाव व्हाद्यीमिर इल्यिच उल्यानफ्स्क) हा या पक्षाचा नेता होता .परिषदेत त्यांनी आपल्या पक्षाची ध्येय, धोरणे, रचना इत्यादींबाबत खूपच आग्रही मते मांडली. एल. मार्तोव्ह या नेत्यानेही टोकाची भूमिका घेतली. त्यावेळी तीव्र मतभेद झाल्यामुळे पक्षात दोन गट निर्माण झाले. याच काळात सोशल डेमॉक्रॅटिक लेबर पार्टीची

मुखपत्र चालविण्यासाठी घेतलेल्या मतदानात लेनिनच्या गटास बहुमत प्राप्त झाले. त्यामुळे लेनिनचे अनुयायी बोल्शेव्हिक म्हणजे बहुमतवाले ठरले म्हणूनच त्यांना बोल्शेव्हिक विचारसरणीचे असे संबोधण्यात येवू लागले.

**२) बोल्शेव्हिक पक्षाची धोरणे :**

१) केंद्रीय संघटना मजबूत करणे.

२) पक्षात कठोर शिस्त निर्माण करणे.

३) केंद्रीय सत्तेवर नियंत्रण ठेवून ती सत्ता मजबूत करणे .

४) क्रांतिकार्यासाठी सर्व प्रकारच्या बलिदानाची तयारी ठेवणे.

५) सत्ता परिवर्तन व सत्ता बदलासाठी उत्सुक असणे.

६) कामगार, शेतकरी, सैन्य यांमध्ये मोठ्या प्रमाणात चळवळ सुरू करण्यासाठी प्रयत्न करणे.

७) रशियातील कामगार वर्गाला भांडवलशाहीविरुद्ध व झारच्या सरंजामी राजवटीविरुद्ध लढा देण्यासाठी तयार करणे.

**३) बोल्शेव्हिक क्रांती :**

१९०५ पासूनच बोल्शेव्हिकांनी दुसऱ्या क्रांतीची तयारी सुरू केली होती. त्यांना पेट्रग्राड आणि मॉस्कोमध्ये समर्थन प्राप्त झाले होते. लेनिनने शेतकऱ्यांना स्वतःची जमीन दिल्यामुळे संपूर्ण रशियाभर बोल्शेव्हिकांचा समर्थक वर्ग तयार झाला होता. त्यांनी कृषकांना स्वतःची जमीन, कामगारांना कारखान्याची मालकी आणि सैनिकांना युद्धबंदीचा विश्वास दिला.

**४) १९१७ च्या बोल्शेव्हिक क्रांतीला तीन पायऱ्यांमध्ये समजून घेण्याची गरज आहे :**

१) १९०५ च्या क्रांतीद्वारे पायाभरणी.

२) १९१७ च्या मार्च क्रांतीने झारच्या राजकीय सत्तेचे झालेले उन्मूलन.

३) नोव्हेंबर १९१७ च्या क्रांतीद्वारे आर्थिक बाबींना अधिक महत्त्वपूर्ण बनविले.

बोल्शेव्हिकांनी प्रावदा (सत्य) या मुखपत्राच्या माध्यमातून आपल्या विचारांचा प्रचार आणि प्रसार सुरू केला. याशिवाय पक्षाची तात्त्विक भूमिका मांडणारी अन्य दोन मासिकेही होती.

१) बोल्शेव्हिक गट सशस्त्र क्रांतीच्या माध्यमातून सत्ताप्राप्तीसाठी योजना बनवत होता.

२) ही योजना कार्यान्वित करण्यासाठी त्यांनी पॉलिटब्यूरो (मुख्य कार्यकारी समिती) स्थापन केली होती.

३) क्यिऱ्येनस्कीने ५ नोव्हेंबर १९१७ ला बोल्शेव्हिक नेत्यांना अटक करण्याचा आदेश दिले.

४) परंतु तत्पूर्वीच बोल्शेव्हिक नेत्यांनी क्रांतीची तयारी सुरू केली होती.

५) ६ आणि ७ नोव्हेंबरच्या रात्री या पक्षाने दूरध्वनी केंद्रे, टपाल कार्यालये, रेल्वेस्थानके आणि बँका यांवर ताबा मिळवला.

६) पंतप्रधान अल्यिक्सांडर क्यिऱ्येनस्की (Alexander Kerensky १८८१–१९७०) राजधानी सोडून पळून गेला.

७) सरकारचे सर्व मंत्री बंदी बनवले गेले.

अशा प्रकारे या पक्षाने रक्तहीन क्रांती करून रशियाच्या राजधानीवर आधिपत्य स्थापित केले आणि रशियामध्ये समाजवादी क्रांती यशस्वी झाली.नोव्हेंबर १९१७ च्या क्रांतीनंतर सत्ता बोल्शेव्हिक नेता लेनिन आणि रशियन क्रांतिकारक नेता लीअन ट्रॉटस्कीच्या हाती आली.

**५) बोल्शेव्हिकांचे उद्दिष्ट व धोरण :**

१) मध्यमवर्गीय व भांडवलदार यांच्या हंगामी सरकारशी कोणत्याही प्रकारे सहकार्य न करणे.

२) संरक्षणात्मक युद्धाच्या नावाखाली चालू असलेले साम्राज्यवादी युद्ध ताबडतोब बंद करणे.

३) गरीब शेतकरी व कामगार यांच्या प्रतिनिधी मंडळाकडे म्हणजे सोव्हिएटच्या हाती सर्व राजकीय सत्ता केंद्रित करणे.

४) शेतजमिनीचे राष्ट्रीयीकरण करणे.

५) राष्ट्रीय उत्पादन व वितरण यांवर सोव्हिएटचे नियंत्रण असणे.

६) बोल्शेव्हिक पक्षाचे साम्यवादी पक्ष असे नामकरण करणे.

७) साम्यवादी आंतरराष्ट्रीय संघटना निर्माण करणे.

**असे त्या कार्यक्रमाचे स्वरूप होते:**

कारखान्यातील कामगारांत जहाल मतवाद्यांचा व बोल्शेव्हिकांचा पगडा झपाट्याने दृढ होत होता. जून १९१७ अखेरी, युद्धबंदीची मागणी करीत निघालेल्या कामगार व सैनिकांच्या मोर्चाच्या वेळी बोल्शेव्हिकांचा प्रभाव स्पष्टपणे प्रत्ययास आला. पाच लक्ष सैनिक-कामगारांचा मोर्चा तौरीद राजवाड्यावर चालून गेला. जुलैचा उठाव पूर्णपणे अपयशी ठरला आणि त्यामुळे बोल्शेव्हिक पक्षाला काही काळ का होईना, चांगलाच हादरा बसला. पक्ष व त्यांचे मुखपत्र प्रावदा यांच्या कार्यालयावर हल्ले झाले. नेते तुरुंगात डांबले गेले.

जुलैमध्ये बोल्शेव्हिक नेत्यांना झालेली अटक, त्यांच्या वृत्तपत्रावर घातलेली बंदी, नेतृत्वाची पोकळी या कारणाने त्यांचा प्रभाव ओसरल्यासारखे वाटत होते; तथापि पेट्रग्राडच्या कामगारवर्गात बोल्शेव्हिकांचा प्रभाव झपाट्याने वाढत होता. रशियन सैन्याचा प्रमुख जनरल लॉव्हर करन्यीलॉव्हचा (Lavr Georgiyevich Kornilov १८७०–१९१८) उठाव दडपल्यामुळे बोल्शेव्हिकांचे कणखर नेतृत्व, खंबीर भूमिका, कामगार वर्गावरील त्यांचा प्रभाव यामुळे जनमत दुबळ्या हंगामी सरकारच्या विरोधात बोल्शेव्हिकांकडे झुकले. ३१ ऑगस्ट रोजी पेट्रग्राड सोव्हिएटच्या झालेल्या निवडणुकीत बोल्शेव्हिक पक्षाला बहुमत मिळाले. सोव्हिएटच्या पुनर्निर्वाचित समितीत १३ बोल्शेव्हिक, ६ सोशॅलिस्ट क्रांतिकारक तर केवळ ३ मेन्शेव्हिक सदस्य होते.

२५ ऑक्टोबर १९१७ च्या मध्यरात्री विंटर राजवाड्याचा ताबा बोल्शेव्हिकांनी घेतला. कमीतकमी रक्तपात होऊन राष्ट्राची सत्तासूत्रे त्यांच्या हाती आली. या राज्यक्रांतीबरोबर केवळ रशियाच्याच नव्हे, तर जगाच्या इतिहासात एका नव्या युगाला प्रारंभ झाला. १९१७ मध्ये बोल्शेव्हिकांनी एक नवीन शासनव्यवस्था स्थापन केली. रशियाच्या या साम्यवादी सरकारचा जगातील इतर देशांवरही व्यापक प्रभाव पडला. १९१८ मध्ये रशियन राज्यक्रांती झाल्यानंतर बोल्शेव्हिकांनी आपल्या पक्षाचे कम्युनिस्ट पार्टी ऑफ सोव्हिएट युनियन (सी. पी. एस. यू.) असे नामांतर केले.

### ६) रशियाचा अंतर्गत गृहकलह :

रशियाच्या गृहकलहातून 'व्हाइट आर्मी' या नावाखाली बोल्शेव्हिकांना विरोध करणारा एक नवीन शत्रू उदयाला आला. बोल्शेव्हिकांच्या लाल आरमाराचे (रेड आर्मी) नेतृत्व क्रांतिकारी नेता लीअन ट्रॉटस्की याने केले. व्हाइट आर्मी आणि लाल फौज (रेड गार्ड्स) यांच्यातील दीर्घकालीन कलहामध्ये बोल्शेव्हिकांना विजय मिळाला. बोल्शेव्हिकांच्या भयंकर कारस्थानांना 'लाल आतंक' असे म्हटले जाते. बोल्शेव्हिकांनी आपल्या विरोधकांचा अंत करण्यासाठी आणि त्यांच्यामध्ये भय पसरविण्यासाठी हिंसेचा आधार घेतला. त्यासाठी 'चेका' नामक एक विशेष न्यायालय स्थापन केले. बोल्शेव्हिकांनी आंतरिक विद्रोहाचे दमन केले. प्रारंभकाळामध्ये बोल्शेव्हिक क्रांती रक्तहीन होती; परंतु नंतरच्या काळातील इतिहासात ती एक भयंकर क्रांती म्हणून सिद्ध झाली.

**आपली प्रगती तपासा:**

१. बोल्शेव्हिक विचारसरणीची माहिती जाणून घ्या.

## २.३ मेन्शेव्हिक विचारसरणी :

रशियात सोशल डेमॉक्रॅटिक पार्टीमध्ये एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात मुख्यत्वेकरून दोन विचारसरणी प्रचलित होत्या. एक बोल्शेव्हिक विचारसरणी तर दुसरी मेन्शेव्हिक विचारसरणी. या पैकी जी मेन्शेव्हिक विचारसरणी होती ती विचारसरणी संवैधानिक शासनाचे समर्थन करणारी होती. रशियन भूमीवर मार्क्सप्रणीत मार्गाने क्रांती घडवून आणणे, हा या पक्षाचा प्रमुख उद्देश होता.मेन्शेव्हिक हा रशियन क्रांतिकारी नेता लीअन ट्रॉटस्कीच्या विचारांना मानणाऱ्या लोकांचा गट होता.

**१) मेन्शेव्हिक गटाचा उगम:**

पक्षाच्या अधिवेशनात लेनिन आणि एल. मार्तोव्ह यांनी परस्परविरोधी मते मांडली.

या मतात मार्तोव्हचे नेतृत्व मानणाऱ्या या गटाला अल्पमते मिळाली.त्यामुळेच मेन्शेव्हिक अल्पमतवाले या नावाने परिचित झाले व यातूनच मेन्शेव्हिक गटाचा उगम झाला.जुलियस मॅरॅव्ह हा या गटाचा संस्थापक होता. त्यांची विचारसरणी मार्क्सवादी विचारावर आधारलेली होती.

**२) मेन्शेव्हिक गटाची धोरणे:**

१) संसदीय लोकशाही शासनपद्धतीच्या माध्यमातून संपूर्ण समाजवादाचे ध्येय प्राप्त करणे.

२) ध्येय प्राप्तीसाठी मध्यमवर्गीय लोकांचे सहकार्य घेणे.

३) उदारमतवादी विचारसरणीवर विश्वास ठेवून सहकार्य करणे.

४) उजव्या विचारसरणीवर विश्वास ठेवून कार्य करणे.

५) जुन्या राज्यप्रणालीमध्ये बदल करण्यासाठी प्रयत्न करणे.

६) लोकशाहीवादी कार्यक्रमांच्या प्रत्येक पायरीवर तडजोड करणे.

७) कार्य करतांना कायदेशीर मार्गांची अंमलबजावणी करणे.

८) कामगार संघटनांबरोबर कार्य करणे.

**३) मेन्शेव्हिक गटाची वाटचाल:**

१९०५ च्या मेन्शेव्हिकांच्या पराभवानंतर ते कायदेशीरपणे विरोधात सामील झाले. १९१४ मध्ये पहिल्या महायुद्धादरम्यान मेन्शेव्हिकांचे दोन गटांत विभाजन झाले. बहुतांश मेन्शेव्हिकांनी युद्धास विरोध केला. त्यांनी छापील पत्रके व तोंडी प्रचाराच्या माध्यमातून युद्धविरोधी वातावरण निर्माण केले होते. तसेच मेन्शेव्हिक-आंतरराष्ट्रवादी असा एक गट त्यांनी स्थापन केला होता. परंतु अल्पसंख्याक मेन्शेव्हिकांनी राष्ट्रीय सुरक्षेच्या नावाखाली युद्धाला समर्थन दिले.

मार्च १९१७ मध्ये मेन्शेव्हिक आणि बोल्शेव्हिक या दोन्ही गटांच्या एकत्रीकरणाचे प्रयत्न सुरू झाले. मार्च १९१७ च्या हंगामी सरकारला मेन्शेव्हिकांनी काही अटींवर पाठिंबा दिला. जून १९१७ च्या पेट्रग्राडच्या संमेलनामध्ये क्रांतिकारी समाजवादी, मेन्शेव्हिक आणि बोल्शेव्हिक असे सर्व गट सामील झाले. या संमेलनावर मेन्शेव्हिक गटाचेच वर्चस्व होते. शहरी कामगारांवर त्यांचा प्रभाव होता. तथापि हंगामी सरकारची निष्क्रियता व दौर्बल्य; जनतेच्या मताविरुद्ध त्यांनी चालू ठेवलेले युद्ध, त्यात झालेली अपार हानी व पराभव यामुळे हंगामी सरकारची व मेन्शेव्हिकांची लोकप्रियता ओसरली. १९१८ मध्ये हा गट साम्यवादी पक्षामध्ये विलीन झाला.

**४) मेन्शेव्हिक क्रांती :**

१) पेट्रोग्राडची क्रांती:८ मार्च १९१७ रोजी पेट्रोग्राड येथे एक लाख कामगारांनी संप पुकारला. आपले प्रश्न सुटल्याशिवाय काम करण्यासाठी त्यांनी नकार दिला. या संपात अनेक स्त्रियांनी भाग घेतला होता. या संपात मास्कोतील कामगार सुद्धा सामील झाले होते. हळूहळू संपाने एवढे उग्र रूप धारण केले की तेथील शासन व सुव्यवस्था कोलमडून पडली झारने ही क्रांती चिरडून टाकण्याकरता आपल्या लष्कराला गोळीबाराचा हुकूम दिला. परंतु आता लष्कर सुद्धा राजाला एकनिष्ठ राहिले नव्हते त्यामुळे लष्कराने गोळीबार करण्याचे नाकारले. एवढेच नव्हे तर संपूर्ण लष्कराने क्रांतिकारकांशी हात मिळवणी केली .ही क्रांती केवळ त्या शहरापुरतीच मर्यादित राहिली नाही.भाकरी मिळविण्याकरिता खेड्यापाड्यातून अनेक शेतकरी आले होते. त्यांनी दंगे करण्यास प्रारंभ केला होता. शेतकऱ्यांनी ही संधी साधून हजारो उमरावांच्या मालमत्तेची जाळपोळ केली. रशियातील संपूर्ण परिस्थिती झारच्या नियंत्रणा बाहेर गेली. तरीसुद्धा त्यांनी ड्युमा बरखास्त झाली आहे असे जाहीर केले. परंतु झारने राज्यत्याग करावा. नाहीतर लष्कराच्या मदतीने झारची सत्ता काढून घेतली जाईल अशी धमकी झारला देण्यात आली. पेट्रोग्राडमध्ये सुरू झालेली ही क्रांती आता मास्को शहरापर्यंत जावून पोहचली .१२ मार्च १९१७ रोजी क्रांतिकारकांनी सरकारी कचेऱ्या आपल्या ताब्यात घेतल्या. सर्व राजकीय कायद्याना मुक्त करण्यात आले. राजवाडा सुद्धा क्रांतीकारांनी आपल्या ताब्यात घेतला. अशा रीतीने परिस्थिती हाताबाहेर गेल्यामुळे शेवटी झारला राज्यत्याग करण्याशिवाय दुसरा पर्याय राहिला नाही.१५ मार्च १९१७ रोजी झार निकोलस दुसरा याने राज्य त्याग केल्याचे जाहीर केले. परंतु जाता जाता त्याने आपला ड्यूक मायकेल यास आपला वारस नेमले. रशियन जनतेला आता झार कुटुंबातील कोणताही व्यक्ती रशियाच्या गादीवर नको होती. जनतेने ड्युक मायकेल यास सिंहासनावर बसू दिले नाही. क्रांतीकारकांनी झार निकोलस दुसरा व त्याचे कुटुंबीय यांना पूर्व रशियातील उरल पर्वताच्या पायथ्याशी असलेल्या एका तुरुंगात रवाना केले .

**२) राजकुमार जॉर्ज एलव्हॉय :**

झार निकोलस दुसरा यांनी राज्य त्याग केल्यामुळे रशियाची सत्ता जनतेच्या हाती आली होती .क्रांती झाल्यानंतर ड्युमाने एका तात्पुरत्या समितीची निवड करून रशियाचा राज्यकारभार तिच्याकडे सोपविला. या समितीचे रूपांतर तात्पुरते हंगामी सरकारात होवून त्याचे नेतृत्व राजकुमार जॉर्ज एलव्हॉय यांच्याकडे देण्यात आले. अस्तित्वात आलेले हे हंगामी सरकार मध्यमवर्गीयांचे सरकार होते. त्यामुळे कोणताही क्रांतिकारी कार्यक्रम

अमलात आणण्याची कुवत या सरकार जवळ नव्हती. हंगामी सरकारात तीन पक्षांचा अंतर्भाव होता राजकुमार जॉर्ज एलव्हॉय हा हा रशियातील सुधारणावादी श्रीमंत वर्गाचा प्रतिनिधी होता. तर परराष्ट्रमंत्री पॉल हा लोकशाही व उदारमतवादी पक्षाचा प्रतिनिधी होता. तर तिसरा प्रतिनिधी कॅरेन्सकी हा फक्त समाजवादी पक्षाचा प्रतिनिधी होता. नवीन सरकारने सत्ता हातात घेतल्यानंतर देशाबाहेरील प्रश्न ताबडतोब सोडविण्याचा प्रयत्न केला. त्यानुसार सर्व राजकीय कायद्यांची ताबडतोब मुक्तता करण्यात आली. युद्धाबाबत आपले धोरण कायम राहील हे सुद्धा नवीन सरकारने ताबडतोब जाहीर केले. रशियन जनतेला सर्व उदारमतवादी घटनेत दिलेले सर्व अधिकार बहाल करण्यात आले. त्यानुसार रशियन जनतेला भाषण, मुद्रण ,संघटन आणि धार्मिक स्वातंत्र्य देण्यात आले. झार निकोलस दुसरा याच्या कारकिर्दीत बाहेरच्या देशात पळून गेलेल्या सर्व क्रांतिकारकांना व देशभक्तांना ताबडतोब परत बोलविण्यात आले. ज्यू लोकांवर लादलेले सर्व नियंत्रण काढून घेण्यात आले.रशियन साम्राज्यातील पोलंड, फिनलॅन्ड सारख्या सर्व राज्यांना अंतर्गत स्वातंत्र्य देण्यात आले. रशियाची नवी घटना तयार करण्यात येणार आहे असे जाहीर करण्यात आले.नवीन सरकारची सुरुवात तशी फारशी चांगली झाली होती.पण या सरकारने पहिल्या महायुद्धातील आपला सहभाग तसाच सुरू ठेवला. रशियाने युद्धातून आपले अंग काढून टाकावे अशी रशियन जनतेची मागणी होती. कारण रशियाचा प्रत्येक आघाडीवर पराभव होत होता. अंतर्गत करातील वाढ, रोगराई ,दुष्काळ व युद्धातील हानी या गोष्टींमुळे रशियन जनता आधीच त्रस्त झाली होती. यातच आता साम्यवादी क्रांतीचे नेते रशियात परत येऊ लागले होते. हंगामी सरकारने राजकीय गुन्हेगारांना सार्वत्रिक माफी दिल्यामुळे लेनिन, ट्रॉटस्कि व स्टॅलिन इत्यादी नेते रशियात परत आले होते. क्रांतीकाळात त्यांना परदेशाचा आश्रय घ्यावा लागला होता. या नेत्यांनी आता सैनिक, कामगार आणि शेतकरी यांच्या संघटना ठीक ठिकाणी स्थापन करण्यास सुरुवात केली होती. या सोव्हिएट संघटनाने नवीन हंगामी सरकारच्या मवाळ धोरणास तीव्र विरोध करण्यास सुरुवात केली .शेवटी मे १९१७ मध्ये हंगामी सरकारचा प्रमुख राजकुमार एलव्हॉय यांनी आपल्या हंगामी पदाचा राजीनामा दिला व त्या ऐवजी यांनी हंगामी सरकारची सूत्रे कॅरेन्सकी यांनी आपल्या हाती घेतली. तो समाजवादी विचारसरणीचा होता. तरी त्याचा मार्ग मात्र मवाळ होता. त्याच्याकडून क्रांतिकारी कार्यक्रमाची अंमलबजावणी होणे शक्य नव्हते असे जनतेच्या लक्षात आले होते.

**३) कॅरेन्सकीचे मेन्शेव्हिक सरकार:**

कॅरेन्सकीचे मेन्शेव्हिक सरकार रशियातील परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न करत होती.

मेन्शेव्हिक पक्षाच्या मदतीने त्याने रशियात अमुलाग्र बदल घडवून आणण्यासाठी प्रयत्न सुरू केले. जनतेनेही त्याला विश्वास दिला. रशिया करता घटना लवकर तयार व्हावी म्हणून त्यांनी घटना समिती ताबडतोब स्थापन केली.परस्परा विरोधी हितसंबंध असणाऱ्या गटांमध्ये जास्तीत जास्त ऐक्य प्रस्थापित करून रशियातील असंतोष नष्ट करून आपण यश मिळू असे त्याला वाटत होते. यासाठी त्यांनी भांडवलदार वर्ग व कामगार वर्ग यांच्यात एकमत घडवून आणण्याचा प्रयत्न केला. परराष्ट्र धोरणात त्यांनी अनेक बदल घडवून आणण्याचा प्रयत्न केला. दोस्त राष्ट्रांनी कोणतीही अट न घालता ताबडतोब युद्ध थांबवावे

आणि जर्मनी व जर्मन गटातील इतर राष्ट्रांशी शांततेचा तह करावा अशी त्यांनी दोस्त राष्ट्रांना विनंती केली. परंतु दोस्त राष्ट्रांनी ही विनंती धुडकावून लावली. त्यामुळे युद्ध सुरू ठेवण्याशिवाय दुसरा मार्ग शिल्लक राहिला नाही .मात्र रशियन सैन्य थकले होते. शिवाय ते बेशिस्त होते. या त्यांच्या विशिष्ट वर्तनाला कॅरेन्सकी  थांबू शकला नाही .आता जर्मनीला एका मागून एक विजय मिळत गेले. त्यामुळे सैनिकांनी रशियाच्या ताब्यातील रीगा हे शहर ३० सप्टेंबर १९१७ रोजी जिंकून घेतले व इस्टोनियात प्रवेश केला .याच वेळी रशियाला गॅलेशिया सुद्धा गमवावा लागला.रशियाचे विविध आघाड्यांवर हे पराभव झाले. त्यांनी करेन्सीची फार मोठी मानहानी झाली. त्याचे सरकार बदनाम झाले . त्यात पुन्हा केरेन्सकी आणि त्याचा विश्वासू सहकारी जनरल कॉर्नीलॉव्ह यांच्यामधे मतभेद निर्माण झाले. जमीनदार व भांडवलदार वर्ग यांच्या मदतीने जनरल कॉर्नीलॉव्ह याने रशियात लष्करी हुकूमशाही प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे रशियातील लोकांचा केरेन्सकी सरकारवरील विश्वास उडाला व रशियातील सर्व कामगार वर्ग बोलशेविक पक्षाभोवती मोठ्या संख्येने जमा झाले. या परिस्थितीचा फायदा घेवून बोल्शेव्हिक पक्षाच्या जहाल समाजवादी लोकांनी क्रांती घडवून आणली व कॅरेन्सकीचे सरकार उलथून टाकले.

**आपली प्रगती तपासा:**

१. मेन्शेव्हिक विचारसरणीचा आढावा घ्या.

## २.४ सारांश :

रशियातील जुलमी झार सत्ता नष्ट करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणारे रशियात दोन गट म्हणजे बोल्शेव्हिक व मेन्शेव्हिक होय.या दोन्ही गटाचे मुख्य उद्दिष्ट हे रशीयाला झारच्या जुलमी व जाचक सत्तेतून मुक्त करणे हे होते. रशियात क्रांती करत असताना बोल्शेव्हिकानी आपली जहाल विचारसरणी कायम चालू ठेवली तर मेन्शेव्हिकानी आपली मावळ विचारसरणी कायम चालू ठेवली.या दोन्ही गटांनी अविरतपणे प्रयत्न करून रशियाला जुलमी झारच्या सत्तेपासून मुक्त केले तसेच जमीनदार , कारखानदार यांच्या पासून सर्वसामान्य जनतेची मुक्तता करून सोव्हिएट संघराज्याची निर्मिती केली. त्यामुळे रशियातील सर्वसामान्य जनतेला खऱ्याथाने स्वातंत्र्याचा अनुभव घेता आला. त्यामुळेच रशियन क्रांती संग्रामात व सत्ता परिवर्तनात या दोन्ही गटांचे योगदान अत्यंत महत्वपूर्ण आहे.

## २.५.प्रश्न :

१) बोल्शेव्हिक विचारसरणीवर थोडक्यात भाष्य करा.

२) मेन्शेव्हिक विचारसरणीवर सविस्तर माहिती लिहा.

## २.६ संदर्भ सूची :

१. विसाव्या शतकातील जग - डॉ. धनंजय आचार्य.

२. आधुनिक जग - डॉ.एन. एस. तांबोळी.

३. आधुनिक जग- पी. जी. जोशी.

४. आधुनिक जग भाग - १ व भाग - २- डॉ. सुमन वैद्य, डॉ. शांता कोठेकर.

५. आधुनिक जगाचा इतिहास- प्राचार्य आर. डी. गायकवाड, प्राचार्य वाय. एन. कदम, प्रा. डी. डी. थोरात.

❖❖❖❖

# ३

# ऑक्टोबर १९१७ ची क्रांती आणि सोव्हिएट युनियनची निर्मिती

**प्रकरण रचना :**


३.० उद्दिष्टे

३.१ प्रस्तावना

३.२ रशियन राज्यक्रांतीची कारणे

३.३ रशियन राज्यक्रांतीची वाटचाल व सोव्हिएट युनियनची निर्मिती.

३.४ रशियन राज्यक्रांतीचे परिणाम.

३.५ सारांश.

३.६ प्रश्न

३.७ संदर्भ सूची


## ३.० उद्दिष्टे :

१) रशियन राज्यक्रांतीची कारणे समजून घेणे.

२) रशियन राज्यक्रांतीची वाटचाल अभ्यासाने.

३) सोव्हिएट युनियनच्या निर्मितीचा आढावा घेणे.

४) रशियन राज्यक्रांतीच्या परिणामांची माहिती जाणून घेणे.

## ३.१ प्रस्तावना :

रशियाच्या इतिहासातील एक महत्त्वपूर्ण क्रांती म्हणजे रशियन राज्यक्रांती होय. या क्रांतीला बोल्शेविक क्रांती असेही म्हटले जाते. ऑक्टोबर १९१७ मध्ये ही क्रांती घडली. ही क्रांती म्हणजे कम्युनिस्ट आदर्शांनी प्रेरित असलेला सर्वहारा- समाजवादी उठाव होता. रशियामध्ये समतावादी आणि न्याय्य समाज स्थापन करण्याचा ह्या क्रांतीचा उद्देश होता. रशियन सोशल डेमोक्रॅटिक लेबर पार्टीच्या नेतृत्वाखालील इतिहासातील ही पहिली समाजवादी क्रांती होती. विशेषत: बोल्शेविकांनी म्हणजेच ती कामगार वर्गाने चालवली होती, ज्यामध्ये शेतकरी वर्गाचा लक्षणीय सहभाग होता.

रशियन क्रांतीने रशियातील कष्टकरी जनतेचे शोषण करणाऱ्या जुलमी सामाजिक आणि राजकीय व्यवस्थेत परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न केला. इतिहासातील हा एक महत्त्वाचा टप्पा होता. ज्याने सोव्हिएत युनियनच्या स्थापनेचा पाया रचला आणि पुढील ७० वर्षांसाठी जागतिक राजकारणावर खोलवर प्रभाव पाडला.

२० व्या शतकाच्या सुरुवातीला रशिया हा एक विशाल साम्राज्य होता. ज्यावर रोमानोव्ह राजवंशाचे राज्य होते आणि  झार निकोलस दुसरा हा  एक हुकूमशहा शासक होता. हा देश असंख्य सामाजिक, आर्थिक आणि राजकीय समस्यांनी त्रस्त होता. ज्यामुळे शेवटी रशियन क्रांती झाली. ही एक महत्त्वाची घटना होती ज्याने जागतिक इतिहासाचा मार्ग बदलला.

## ३.२ रशियन राज्यक्रांतीची कारणे:

१९१७ ची रशियन राज्यक्रांती रशियातील पीटर दि ग्रेट वैभवशाली सम्राट होता.त्याने रशियाला युरोपच्या राजकारणात महत्त्वाचे स्थान प्राप्त करून दिले होते.परिणामी रशियाला जागतिक राजकारणात मान सन्मान मिळाला होता. मात्र नंतरच्या राज्यकर्त्यांच्या अकार्यक्षमतेमुळे रशियाला अनेक राजकीय प्रश्नांना सामोरे जावे लागले. यातूनच पुढे १९१७ च्या रशियन राज्यक्रांतीस पूरक पार्श्वभूमी तयार झाली व पुढे १९१७ ची रशियन राज्यक्रांती घडून आली. अशा या रशियन राज्यक्रांतीस जबाबदार कारणांचा आढावा पुढील माहितीच्या आधारे घेण्यात आला आहे.

**अ) राजकीय कारणे :**

**१) अनियंत्रित राजसत्ता :**

१९१७ च्या राज्यक्रांती पूर्वी रशियावर  रोमन घराण्यातील झार सत्ता प्रचलित होती. ही सत्ता ईश्वरी वरदान सिद्धांतानुसार रशियावर अनियंत्रितपणे राज्य करत होती. झारचा शब्द म्हणजे कायदा अशी परिस्थिती रशियात प्रचलित होती. हे सर्व राज्यकर्ते जुलमी, चैनी व विलासी जीवन  जगत होते.हे सर्व राज्यकर्ते भ्रष्ट होते. हे राज्यकर्ते जनतेच्या हिताकडे लक्ष देत नव्हते. एवढेच नव्हे तर त्यांनी रशियात व्यक्ती स्वातंत्र्य अस्तित्वात ठेवले नव्हते ते मनाला वाटेल तसे राज्य कारभार करत होते. या राज्यकर्त्यांपैकी झार निकोलस दुसरा यांनी तर आपल्या अनियंत्रित सत्तेचे शेवटचे टोक गाठले होते. त्याच्यासोबत त्याची पत्नी झरीना ही सुद्धा मनमानी पद्धतीने वागत होती. ती  सुद्धा सर्वसामान्य जनते पिळवणूक करत होती .हा जाच सर्वसामान्य  जनतेला असह्य झाला होता. म्हणूनच सामान्य जनता या राज्यकर्त्यांच्या विरोधात जाऊ सत्ता परिवर्तनासाठी प्रयत्न करत होती. यातूनच पुढे १९१७ च्या रशियन राज्यक्रांतीस पार्श्वभूमी तयार झाली.

**२) झार झरीना व रासपुटीन :**

१९१७ च्या रशियन राज्यक्रांती  पूर्व कालखंडामध्ये रशियात झार झरीन व रासपुटीन हे त्रिकूट एकत्र आले होते. या तिन्ही लोकांनी सामान्य जनतेचे पिलावणूक करण्यास सुरुवात केले होते. जनतेकडून जबरदस्तीने कर गोला करण्यास सुरुवात केली होती.जनतेवर अत्याचार, जुलूम करून जनतेला विनाकारण त्रास देण्यास  सुरुवात केली होती. जनतेच्या पैशावर उधळपट्टी  करण्यास सुरुवात केली होती.या सर्व गोष्टी या त्रिकुटांनी सुरू ठेवल्या

होत्या. परिणामी जनता या त्रिकुटांच्या जाचाला कंटाळली होती. यातूनच पुढे १९१७ च्या रशियन राज्यक्रांतीस पार्श्वभूमी तयार झाली.

**३) राज्यक्रभारातील भ्रष्टाचार :**

१९१७ च्या रशियन राज्यक्रांती पूर्व कालखंडामध्ये रशियात सर्वच क्षेत्रात भ्रष्टाचार वाढला होता. राजकर्त्यांच्या सोबत भ्रष्टाचारी लोक मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते.अधिकारी वर्ग सुद्धा भ्रष्ट झाले होते. ते भ्रष्ट मार्गाने मोठया प्रमाणात पैसा जमा करू लागले होते. साध्या साध्या कामासाठी हे अधिकारी लाच मागत होते. झाड, झरीना आणि रासपुटीन आशीर्वादमुळे हे अधिकारी मन मानेल त्या पद्धतीने राज्यकारभार करू लागले होते.परिणामी जनता या परिस्थितीला जनता कंटाळली होती. यातूनच पुढे १९१७ च्या रशियन राज्यक्रांतीस पार्श्वभूमी तयार झाली.

**४) रशिया जपान युद्धातील रशियाचा पराभव :**

१९०४- ०५ च्या रुसो-जपान युद्धात जपान सारख्या चिमुकल्या राष्ट्राने रशिया सारख्या बलाढ्य राष्ट्राचा पराभव केला होता. या पराभवामुळे जागतिक राजकारणात रशियाची मोठ्या प्रमाणात मानहानी झाली होती. तसेच रशियाच्या अंतर्गत राजकारणात सुद्धा संभ्रमाची परिस्थिती निर्माण झाली होती. रशियाच्या या पराभवास केवळ राज्यकर्तेच जबाबदार आहेत अशी मनोभावना रशियन जनतेच्या मनात निर्माण झाली.

या पराभवाचे शल्य रशियन जनतेच्या मनात कायमस्वरूपी बिंबले. आणि म्हणूनच असे अकार्यक्षम राज्यकर्ते आपल्याला नको.त्यांची राजवट नष्ट करायला पाहिजे अशा प्रकारची मनोभावना रशियन जनतेच्या मनात निर्माण झाली.यातूनच पुढे १९१७ च्या रशियन राज्यक्रांतीस पार्श्वभूमी तयार झाली.

**५) पहिल्या महायुद्धात झालेला पराभव :**

पहिल्या महायुद्धात रशिया इंग्लंड व फ्रान्सच्या बाजूने युद्धात सहभागी झाला होता. सुरुवातीला रशियाला काही ठिकाणी विजय मिळाला होता. पण १९१५ नंतर मात्र रशियाचा प्रत्येक आघाड्यांवर पराभव झाला. अनेक युद्धातून रशियाला माघार घ्यावी लागली.झारने केलेल्या जुळमामुळे संपूर्ण रशिया आतून पोखरला गेला होता. अशातच प्रचंड वाढलेला युद्ध खर्च, त्याचा भार सहन करणे रशियाला शक्य होत नव्हते. दरम्यानच्याच कालखंडामध्ये रशियात जीवनावश्यक वस्तूंची टंचाई मोठ्या प्रमाणात निर्माण झाली होती.सैनिकांनचे मोठ्या हाल सुरू झाले होते. शेतकरी व कामगारांची परिस्थिती अत्यंत बिकट झाली होती.अनेक सैन्य राणांगणावर मोठ्या प्रमाणात मारले गेले होते. या सर्व गंभीर परिस्थितीला केवळ रशियन राज्यकर्ते जबाबदार आहेत अशी मनोभावना रशियन जनतेच्या मनामध्ये निर्माण झाली.यातूनच पुढे १९१७ च्या रशियन राज्यक्रांतीस पार्श्वभूमी तयार झाली.

**६) मध्यमवर्गाचा उदय :**

इंग्लंड प्रमाणे संपूर्ण युरोपात औद्योगिक क्रांती झाली होती. तशीच औद्योगिक क्रांती रशियात पण झाली होती. यातूनच रशियात मध्यमवर्गाचा उदय झाला. या वर्गातील डॉक्टर, इंजिनिअर, शिक्षक व प्राध्यापक या वर्गाने रशियातील राजकीय व्यवस्थेतील भ्रष्टाचार व अस्थिरता दूर करण्यासाठी क्रांती करणे आवश्यक आहे असे प्रतिपादन करण्यास सुरुवात केली. तसेच त्यांनी भाषण स्वातंत्र्य मुद्रण स्वातंत्र्य, मतदानाचा हक्क व कायद्या समोर सर्व नागरिक समान आहेत या बाबतच्या मागण्या झार समोर मांडण्यास सुरुवात केली. यातूनच पुढे १९१७ च्या रशियन राज्यक्रांतीस पार्श्वभूमी तयार झाली.

**ब) अर्थिक करणे :**

**१) शेतकऱ्यांची बिकट परिस्थिती :**

१९१७ च्या रशियन राज्यक्रांती पूर्व कालखंडामध्ये रशिया कृषिप्रधान देश होता. मात्र राज्यकर्त्यांच्या अकार्यक्षमतेमुळे शेती क्षेत्रात कोणत्याही सुधारणा झाल्या नाहीत. उलट शेतकऱ्यांची आर्थिक पिळवणूक मोठ्याप्रमात झाल्याने त्यांच्या वाट्याला अत्यंत बिकट परिस्थिती आली. त्यामुळे शेतकऱ्यांच्या रोषाला राज्यकर्त्यांना सामोरे जावे लागले.यातूनच पुढे १९१७ च्या रशियन राज्यक्रांतीस पार्श्वभूमी तयार झाली.

**२) सर्वसामान्य जनतेची पिळवणूक :**

१९१७ च्या रशियन राज्यक्रांती पूर्व कालखंडामध्ये रशियन राज्यकर्त्याने रशियन जनतेवर वेगवेगळ्या प्रकारचे कर लादून जनतेची मोठ्या पिळवणूक सुरू केली होती.राज्यकर्त्यांच्या या अन्यायकारक धोरणाला सर्वसामान्य जनता कंटाळली होती.सर्वसामान्य जनतेच्या मनात राज्यकर्त्यांच्या बद्दल प्रचंड असंतोष निर्माण झाला होता.यातूनच पुढे १९१७ च्या रशियन राज्यक्रांतीस पार्श्वभूमी तयार झाली.

**३) सरंजामशाही पद्धत :**

रशियात ज्या प्रमाणे झार, झरीना व रासपुटीचे प्राबल्य होते तसेच प्राबल्य सरंजामदार वर्गाचे होते.१९ व्या शतकाच्या मध्यापर्यंत रशियात सरंजामशाही पद्धती रशियात प्रबळ होती. हे सरंजामदार सामान्य लोकांना गुलामाप्रमाणे वागवत होते. सामान्य लोकांची पिळवणूक करत होते. सरंजामदार वर्गाचे अत्याचार, अन्याय व पिळवणूक सर्वसामान्य जनतेला असाह्य झाली होती. त्यामुळेच सर्वसामान्य वर्ग सरंजामशाही पद्धतीला विरोध करू लागला होता. यातूनच पुढे १९१७ च्या रशियन राज्यक्रांतीस पार्श्वभूमी तयार झाली.

**४) शेतकरी, शेतमजूर व गरिबांची स्थिती :**

रशियन राज्यक्रांती पूर्व कालखंडात रशियातील शेतकरी, शेतमजूर व गरिबांची स्थिती अत्यंत बिकट होती. सरंजामदार आणि शेतकरी, शेतमजूर व गरीब यांच्या उत्पन्नात कमालीची विषमता होती. सरंजामदार प्रचंड श्रीमंत होते तर शेतकरी, शेतमजूर व गरिबांना दोन वेळेचे पुरेसे अन्न मिळत नव्हते.शेतकरी, शेतमजूर व गरिबांना समाजात कोणत्याही प्रकारचे अधिकारी नव्हते, प्रतिष्ठा नव्हती किंवा मानसन्मान नव्हता. आपल्या या

परिस्थितीस केवळ राज्यकर्तेच जबाबदार आहेत अशी मनोभावना या वर्गाच्या मनात निर्माण झाली. यातूनच पुढे १९१७ च्या रशियन राज्यक्रांतीस पार्श्वभूमी तयार झाली.



**क) वैचारिक करणे :**

**१) लिओ टॉलस्टॉय :**

लिओ टॉलस्टॉय हा एक महान विचारवंत होता. त्यांनी क्रांतीपूर्व कालखंडातील तत्कालीन समाज व्यवस्थेचे विदारक चित्रण आपल्या ऍना कॅरेनिना, पॉवर ऑफ डार्कनेस, लिव्हिंग ग्रुप, मास्टर अँड मॅन, वॉर अँड पीस या कादंबऱ्यातून केले. तसेच राज्यकर्त्यांच्या चुकीच्या धोरणामुळे रशियन जनतेचे जगणे कसे असाह्य झाले आहे याची माहिती लोकांपर्यंत पोहचवून लोकजागृती करण्याच्या प्रयत्न केला. यातूनच पुढे १९१७ च्या रशियन राज्यक्रांतीस पार्श्वभूमी तयार झाली.

**२) गॉर्की :**

गॉर्की हा एक महान विचारवंत होता. त्यांनी क्रांतीपूर्व कालखंडात रशियन जनतेला जीवन जगणे किती असाह्य झाले होते याचे विदारक चित्रण आपल्या आई नावाच्या कादंबरीत केले आहे. त्याच्या या कादंबरीत तत्कालीन समाज व्यवस्थेचे हृदयद्रावक चित्रण आहे. याचा प्रभाव सुद्धा रशियन जनतेवर होवून रशियन राज्यक्रांतीस पूरक वातावरण निर्माण झाले व यातूनच पुढे १९१७ च्या रशियन राज्यक्रांतीस पार्श्वभूमी तयार झाली.

**३) इवान टर्जेनिव्ह :**

इवान टर्जेनिव्ह हा एक महान विचारवंत होता. त्यांनी क्रांतीपूर्व कालखंडात रुदीन, ए हाऊस, ऑफ जंटल फ्लॉक, फादर्स अँड चिल्ड्रन्स आणि स्मोक व्हर्जिन स्वाईल या कादंबऱ्या लिहिल्या. त्याच्या या लिखाणाने १८३० ते १८७० या कालखंडामध्ये रशियात उदारमतवादी विचारांचा विकास घडून येण्यास मदत झाली.यातूनच पुढे १९१७ च्या रशियन राज्यक्रांतीस पार्श्वभूमी तयार झाली.

**४) डोस्कोवृस्की :**

डोस्कोवृस्की हा एक महान प्रतिभावान विचारवंत होता. त्यांनी क्रांतीपूर्व कालखंडात इडियट, गॅंबलर, पुअर फ्लॉक, द अंडर ग्राउंड व क्राइम अँड पनिशमेंट या कादंबऱ्या लिहून क्रांतिकारक विचारांचा प्रसार केला. त्यांनी अनेक क्रांतिकारक आंदोलने केली. तसेच त्याला अनेक वेळा तुरुंगात जावे लागले. त्याने निर्माण केलेल्या कामगिरीमुळे पुढे १९१७ च्या रशियन राज्यक्रांतीस पार्श्वभूमी तयार झाली.

**५) कार्ल मार्क्स :**

कार्ल मार्क्स हा एक महान प्रतिभावान विचारवंत होता. त्यांनी आपल्या तत्त्वज्ञानाच्या माध्यमातून मानवी विचार विश्वात क्रांती घडवून आणली. त्याचा दास कॅपिटल हा ग्रंथ ऐतिहासिक ठरला. त्यांनी जाहीर केलेला साम्यवादाचा जाहीरनामा अत्यंत उपयुक्त ठरला. त्यांनी जाहीरनाम्याच्या पहिल्या भागात समाजवादाचा उदय व विकास, दुसऱ्या भागात,

दुसऱ्या भागात साम्यवादी पक्षाची ध्येयधोरणे, तिसऱ्या भागात आपली साम्यवादी विचारसरणी कशी तर्कशुद्ध आहे तर चौथ्या भागात साम्यवादी विचारसरणीचे कार्यक्रम अमलात आणत असताना कोणत्या अडचणी येत असतात व त्या अडचणींचे निवारण कसे करावे याची माहिती नमूद केली आहे. या तत्त्वज्ञानाचा फायदा रशियन जनतेला व राजसत्ते विरुद्ध नेतृत्व करणाऱ्या नेत्यांना झाला व यातूनच पुढे १९१७ च्या रशियन राज्यक्रांतीस पार्श्वभूमी तयार झाली.

**ड) सामाजिक कारणे :**

**१) भांडवलदार व कामगार संघर्ष :**

रशियात औद्योगिक क्रांती झाल्याने मोठ्या प्रमाणात कारखाने निर्माण झाले. परिणामी ग्रामीण भागातील कामगार शहरी भागांकडे येऊ लागले. या कामगारांचे नंतर भांडवलदार शोषण करू लागले परिणामी रशियन राजकीय प्रवाहात भांडवलदार व कामगार संघर्ष सुरू झाला. यातूनच पुढे वर्गकलहाला सुरुवात झाली.यातूनच पुढे १९१७ च्या रशियन राज्यक्रांतीस पार्श्वभूमी तयार झाली.

**२) रशियन जनतेच्या वाट्याला आलेली बिकट परिस्थिती :**

रशियन राज्यकर्ते, अधिकारी वर्ग,भांडवलदार यांच्या हुकूमशाही प्रवृत्तीच्या वागण्यामुळे रशियन जनतेच्या वाट्याला अत्यंत बिकट परिस्थिती आली होती. रशियात सतरा कोटी जनतेसाठी फक्त वीस हजार डॉक्टर्स होते. पाच वर्षा पर्यंत पोहोचणारी २७,%, पेक्षा लहान मुले मृत्यूमुखी पडली होती. रशियातील फक्त २७,% लोकांना सही करण्यापुरते ज्ञान होते. रशियात अज्ञान व अंधकार मोठयाप्रमाणात वाढला होता. अशा या रशियन समाजाच्या उन्नतीसाठी क्रांती शिवाय दुसरा पर्याय नव्हता अशा परिस्थितीतूनच पुढे १९१७ च्या रशियन राज्यक्रांतीस पार्श्वभूमी तयार झाली.

**आपली प्रगती तपासा :**

१. रशियन राज्यक्रांतीच्या कारणांचा आढावा घ्या.

## ३.३ रशियन राज्यक्रांतीची वाटचाल व सोव्हिएट युनियनची निर्मिती :

**१) १९१७ ची क्रांती :**

जर्मन विरुद्धच्या संघर्षात रशिया सतत पराभूत होत होता. रशियाने पोलंड सुद्धा गमावला होता. रशियाची राजकीय परिस्थिती अत्यंत कमजोर झाली होती. रशियाला कोणत्याही देशाचा पाठिंबा शिल्लक राहिला नव्हता. अशा परिस्थितीतच अन्नासाठी जनतेकडून उद्रेक झाला. या उद्रेकाचे रुपांतर पाहता पाहता क्रांतीत झाले.

**२) पेट्रोग्राड शहरात दंगे :**

क्रांतीच्या आरंभी रशियाची राजधानी पेट्रोग्राड या शहरात दंगे सुरु झाले. दरम्यान ९०००० कामगार संपावर गेले. शेतकरी, कामगार व सर्वसामान्य जनतेने सक्रिय सहभाग

घेवून उठाव केला. ठिकठिकाणी दंगली उसळल्या. जमाव हटेना म्हणून पोलिसांनी गोळीबार केला.या गोळीबारात ३०० लोक ठार झाले. त्यामुळे दंगल अधिकच उसळली. क्रांतिकारकांनी सरकारी इमारतींना आगी लावल्या. पोलिसांना जागोजागी अडविण्यासाठी लोकांनी कुंपण घालून अडथळे निर्माण केले.

**३) उठावात सैनिकांचा सहभाग :**

उठाव सुरू असताना १२ लक्ष सैनिकांनी रणांगण सोडले. बंदुका व  मशीनगन्सह सैनिक निदर्शकांना येवून मिळाले. पेट्रोग्राड व क्रोनस्टाट येथील आरमार ठाण्यातील सैनिकांनी खलाशनी संघटित उठाव केला. परिणामी उठावास पाठबळ वाढले.

**४) हंगामी सरकार :**

सैनिक, पेट्रोग्राड व क्रोनस्टाट येथील आरमार ठाण्यातील सैनिक, खलाशी यांच्या बरोबरच झारच्या विश्वासातील  कोसॅक फलटण उठाव करणाऱ्यांच्या बाजूने सामील झाली.या संधीचा फायदा घेवून उठाव करणाऱ्यांनी आक्रमक होवून तुरुंग फोडले झारच्या प्रसादाला आग लावली. ड्यूमाच्या सदस्यांनी अधिकार आपल्या हाती घेतले व प्रिन्स जॉर्जी ल्वोव याच्या नेतृत्वाखाली उदारमतवादी व मावळ समाजवादी हंगामी सरकार स्थापन केले.

**५) वैचारिक द्वंद्व :**

हंगामी सरकारने युद्ध पुढे चालू ठेवण्याचा निर्णय घेतला मात्र सोव्हिएतने शांततेचा प्रसार करण्यास सुरुवात केली.या परिस्थितीवर मात करण्यासाठी केरेनस्कीने ड्यूमाचे नेतृत्व आपल्या हाती घेतले. तरी पण सोव्हिएटला त्याला नियंत्रणात ठेवण्यात यश आले नाही.

**६) लेनिनचा उठाव :**

लेनिनची रशियाची सत्ता हस्तगत करण्याची महत्वाकांक्षा होती. यासाठी त्यांनी रशियन जनतेचा पाठिंबा मिळवण्यास सुरुवात केली. यासाठी सर्व अधिकारी सोव्हिएटला मिळावे अशी गर्जना केली. यासाठी त्यांनी आपल्या पक्षाचा जाहीरनामा तयार केला.या जाहीरनाम्यात युद्धबंदी, जमीनदारांकडून शेतकऱ्यांना जमीनी, कामगारांना कारखान्यात सहभाग व अधिकार, उत्पादन व वितरणावर राष्ट्रीय नियंत्रण, कामगार, शेतकरी व सैनिकांचे राज्य व धनिक वर्गाचे अधिकारी नष्ट आदी बाबींना महत्व देवून हंगामी सरकारच्या विरोधात उठाव केला. मात्र त्याचा तो उठाव फसला.

**७) केरेनस्की कॉर्निलॉव संघर्ष :**

जनरल कॉर्निलॉव हा शिस्तीचा भोक्ता होता. त्यांनी आघाडी सोडून गेलेल्या सैनिकांना धडा शिकवण्यासाठी फासावर लटकविले पाहिजे असा आदेश काढला. त्याचा उद्देश सैन्यात शिस्त निर्माण व्हायला पाहिजे सैन्य नियंत्रणात राहिला पाहिजे असं होता. वास्तविक पाहता राष्ट्रहिताच्या दृष्टिकोनातून त्याचा तो निर्णय बरोबर होता. मात्र केरेनस्कीने त्याच्या आदेशाला महत्व दिले नाही. असे जरी असले तरी या आदेशामुळे कॉर्निलॉवची लोकप्रियता वाढली. त्यामुळे कॉर्निलॉवल आपल्याला डोईजड होईल असे केरेनस्कीनला वाटले.

म्हणूनच केरेनस्कीने कॉर्निलॉवला पदावरून काढून टाकले. पुढे याच वादाचा फायदा लेनिन ट्रॉटस्किने घेण्याचा ठरविला.

**८) ऑक्टोबरची क्रांती :**

केरेनस्की कॉर्निलॉव संघर्षाचा फायदा घेवून बोल्सेव्हिकानी हंगामी सरकार विरुद्ध उठाव करून सत्ता ताब्यात घेण्याचा निर्णय घेतला. ७ नोव्हेंबर १९१७ रोजी सशस्त्र सैनिक व कामगार व सैनिकांनी उठाव करून झारचा विंटर पॅलेस, रेल्वे स्थानके, टपाल व तारयंत्रे, बँका, लष्करी व शासकीय केंद्रे, व महत्त्वाची केंद्रे ताब्यात घेतली. त्याच रात्री ऑल रशियन काँग्रेस ऑफ सोव्हिएटचे अधिवेशन घेण्यात आले. याच अधिवेशनात अध्यक्ष म्हणून लेनिनची निवड करण्यात आली. परराष्ट्र व युद्धखाते ट्रॉटस्किकडे देण्यात आले. व गृहमंत्री म्हणून स्टॅलिनची नियुक्ती करण्यात आली.

**९) युनियन ऑफ सोव्हिएट सोशालिस्टाची स्थापना :**

१० जुलै १९१८ रोजी सोव्हिएटच्या पाचव्या अधिवेशनात अधिवेशनात रशियन सोव्हिएट सोशालिस्ट रिपब्लिकची घटना मान्य झाली.

आली या घटनेनुसार १८ वर्षावरील सर्व स्त्री पुरुष कामगार व शेतकरी यांना मतदानाचा अधिकार देण्यात आला. झार कालखंडातील जमीनदार,अमीर उमराव, वरिष्ठ अधिकारी चर्चेचे अधिकारी व कर्मचारी आणि झारशाहीशी निगडित असलेल्या अन्य गटांना मताधिकार नाकारण्यात आला. प्रथम स्थानिक शेतकऱ्यांच्या व कामगारांच्या सोव्हिएट करिता प्रतिनिधी निवडले जात. त्यातून जिल्हा सोव्हिएट नंतर प्रादेशिक सोव्हिएट आणि त्यातून शेवटी ऑल रशियन काँग्रेस ऑफ सोव्हिएटच्या प्रतिनिधींची निवड होईल ऑल रशियन काँग्रेस ऑफ सोव्हिएटसच्या प्रतिनिधींची निवड होई. ऑल रशियन काँग्रेस ऑफ सोव्हिएटसचे अधिवेशन दोन वर्षातून एकदा भरत असे.आणि एक हजाराहून अधिक प्रतिनिधीतून ४०० सदस्यांच्या केंद्रीय कार्यकारी समितीची नियुक्ती होई. केंद्रीय कार्यकारी समितीतून प्रेसिडियम करता ४० सभासद निवडले जात या प्रेसिडियमला रशियन मंत्रिमंडळाच्या कामकाजावर देखरेख नियंत्रण, मार्गदर्शन व देखरेख करण्याचा अधिकार देण्यात आला होता.१९२२ मध्ये युक्रेन, व्हाईट रशिया, ट्रान्सकॉकेशिया व सोवियत सोशालिस्ट रिपब्लिक ऑफ रशिया यांचा एक संघ स्थापन होऊन युनियन ऑफ सोव्हिएट सोशालिस्ट रिपब्लिकची घोषणा करण्यात आली. तथापि ही सारी रचना म्हणजे सोव्हिएट शासन यंत्रणेची फक्त चौकट होती. खरी सत्ता कम्युनिस्ट पक्षाच्या हाती होती. कम्युनिस्ट पक्षाच्या सभासदांनाच राज्यकारभारातील लहान मोठ्या जागांवर नेमले जात असे व कम्युनिस्ट पक्षाची सहा जणांची पॉलिटी ब्युरो या नावाची समिती सर्वोच्च स्थानी होती.लेनिनच्या नेतृत्वाखालील पॉलिटी ब्युरो हीच खऱ्या अर्थाने रशियात सर्व सत्ताधारी शक्ती केंद्र होती. सोव्हिएटस, कम्युनिस्ट पक्ष, चेका, आणि लाल सेना या चार घटकांवर आधारित रशियाची साम्यवादी राजवट चालू होती.सोव्हिएट रशियाच्या एकूण भागापैकी ९०% भाग आणि एकूण लोकसंख्येपैकी ७०,% लोकसंख्या बोलशेव्हिक रशियातच होती.

**आपली प्रगती तपासा :**

१. रशियन राज्यक्रांतीची वाटचाल व सोव्हिएट युनियनची निर्मिती कशी झाली त्याची माहिती जाणून घ्या.



## ३.४ रशियन राज्यक्रांतीचे परिणाम :

**१) अनियंत्रित झार सत्तेचा शेवट:** रशियन क्रांतीने रशियातील शतकानुशतके चाललेल्या झार सत्तेचा शेवट झाला. परिणामी रशियन जनतेची झार सत्तेच्या जाचातून सुटका झाली.

**२) खाजगी मालमत्तेचे उच्चाटन :** रशियन क्रांती नंतर बोल्शेविकांनी जमीन, कारखाने आणि बँकांसह उत्पादन साधनांची खाजगी मालकी रद्द केली. या मालमत्तांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले परिणामी या मालमता खाजगी हातात न राहता त्या सरकारी मालकीच्या झाल्या.

**३) जमीनदारशाहीचे उच्चाटन :** नोव्हेंबर १९१७ मध्ये जमीनदारशाही रद्द करून जमीन हुकूम लागू करण्यात आला. शेती संसाधनांमध्ये अधिक समान प्रवेश सुनिश्चित करण्यासाठी, वंशपरंपरागत वापरासाठी जमिनीचे शेतकऱ्यांना पुनर्वितरण करण्यात आले.

**४) केंद्रीकृत नियोजन:** समाजवादाच्या काळात, रशियन लोकांना देशाच्या संसाधनांचे आणि अर्थव्यवस्थेचे समान लाभार्थी बनले. केंद्रीय नियोजनामुळे समाजाच्या सर्व प्रदेशांमध्ये आणि घटकांमध्ये समन्वित विकास शक्य झाला.

**५) खाजगी मालमत्ता नष्ट केल्या:** रशियन क्रांतीने सामाजिक न्यायाचे समर्थन केले. उत्पादन साधनांमधील खाजगी मालमत्ता नष्ट करून, क्रांतीने सामाजिक असमानतेची मुळे देखील नष्ट केली. तिने वर्गविहीन समाजाची पायाभरणी केली .

**६) सेवा सुविधा उपलब्धता:** नवीन संविधानाने मोफत वैद्यकीय सेवा, सर्वांना मोफत आणि समान शिक्षण, बेरोजगारी भत्ता आणि संस्कृती आणि सांस्कृतिक प्रगतीमध्ये समान प्रवेशाची हमी दिली.

**७) महिलाना समान संधी:** या क्रांतीनंतर प्रस्थापित शासनाने महिलांना समान संधी दिली. सामाजिक आणि राजकीय जीवनात त्यांचा समान सहभाग शक्य करण्यासाठी अनेक उपाययोजना देखील केल्या गेल्या, जसे की प्रसूती रजा, सार्वजनिक कॅन्टीन, कामाच्या ठिकाणी मोफत पाळणाघरे इत्यादी.

**८) शेतकऱ्यांना सक्षम :** शेतकऱ्यांना सक्षम बनविण्यासाठी प्रचलित शासनाने जमीन सुधारणेला चालना दिली.

**९) समान संधी:** क्रांतीनंतर पारंपारिक पदानुक्रमांना आव्हान दिले आणि समानतेचा पुरस्कार केला. कर्तृत्वानुसार लोकांना समान संधी दिली.

**१०) प्रेरणा:** रशियन राज्यक्रांती भांडवलशाही आणि साम्राज्यवादाने त्रस्त असलेल्या सर्व लोकांसाठी प्रेरणा ठरली.

**११) नवीन राजकीय व्यवस्थेचा स्वीकार:** शाही सरकार उलथल्यामुळे हुकूमशाहीची जागा नवीन राजकीय व्यवस्थेने घेतली.

**१२) सर्वहारा वर्गाच्या हुकूमशाहीची संकल्पना:** रशियन क्रांतीमुळे कामगार वर्गाचे राज्य स्थापन झाले, जे "सर्वहारा वर्गाची हुकूमशाही" या संकल्पनेत अंतर्भूत होते. त्यात हे मान्य करण्यात आले की क्रांतीचे विरोधक अजूनही लोकांच्या हितांना कमकुवत करू शकतात.

**१३) लोकशाही राज्य:** हे राज्य बुर्जुआ देशांच्या राज्यांपेक्षा अधिक लोकशाहीवादी होते कारण ते क्रांतीपूर्व रशियामध्ये विशेषाधिकारप्राप्त अल्पसंख्याकांवर बहुसंख्य (कामगार लोक) यांचे राज्य सुनिश्चित करत असे.

**१४) समाजवादी राजवट स्थापन :** क्रांतीने राजकीय परिस्थिती आमूलाग्र बदलली, कामगारांचे नियंत्रण आणि सामूहिक निर्णय घेण्यावर भर दिला.बोल्शेविक पक्षाने एकपक्षीय समाजवादी राजवट स्थापन केली.

**१५) आंतरराष्ट्रीय पैलू :** रशियन क्रांतीचे लहरी परिणाम रशियाच्या सीमा ओलांडून खूप दूरपर्यंत पसरले आणि जागतिक राजकारण आणि विचारसरणीचा मार्ग निश्चित केला.

**१६) वसाहतवादविरोधी प्रेरणा :** रशियन क्रांतीने जगभरातील वसाहतविरोधी चळवळींना प्रेरणा दिली. वसाहतग्रस्त राष्ट्रांना जुलमी राजवटी उलथवून टाकण्यात आशा दिसली.

**१७) भांडवलशाहीला आव्हान देणे :** बोल्शेविक विजयाने भांडवलशाहीच्या स्थापित कल्पनेला आव्हान दिले. युएसएसआरच्या समाजवादी मॉडेलने भांडवलशाही अर्थव्यवस्थेला पर्याय म्हणून उभे केले.

**१८) समाजवादी विचारांचा प्रसार :** या क्रांतीमुळे समाजवादी विचारसरणीचा जागतिक प्रसार झाला, ज्यामुळे युरोपातील इतर देश आणि जगाच्या इतर भागांमधील डाव्या चळवळी आणि बुद्धिजीवींवर प्रभाव पडला.

**१९) जागतिक व्यवस्थेत बदल :** क्रांतीनंतर एक प्रमुख शक्ती म्हणून यूएसएसआरचा उदय झाल्याने भू-राजकीय संतुलन बदलले.कम्युनिस्ट ही प्रमुख विचारसरणी बनली आणि सोव्हिएत युनियन भांडवलशाहीची प्रतिस्पर्धी शक्ती बनली.

**२०) इतर देशांना प्रेरणा:** चीन, क्युबा आणि युगोस्लाव्हिया सारख्या देशांनी सामाजिक परिवर्तनाच्या त्यांच्या शोधात रशियन क्रांतीपासून प्रेरणा घेतली.

**२१) रशियन क्रांतीचे भारतावर परिणाम:** ब्रिटिश साम्राज्यवाद आणि त्याच्या शोषणकारी व्यवस्थेने निर्माण केलेल्या सामाजिक परिस्थितीमुळे प्रेरित भारतीय राष्ट्रीय चळवळीवर जागतिक प्रवाहांचाही लक्षणीय परिणाम झाला. यामध्ये, रशियन क्रांतीचे प्रतीक असलेल्या समाजवादाच्या शक्तींनी महत्त्वाची भूमिका बजावली.

**२२) प्रेरणा आणि प्रेरणा:** १९०५ ची रशियन क्रांती आणि त्यानंतर १९१७ ची बोल्शेविक क्रांती ही भारतीय नेत्यांसाठी आणि भारतीय राष्ट्रीय चळवळीसाठी एक मोठी प्रेरणा होती.रशियन क्रांतीच्या यशाने हे दाखवून दिले की जनसंघर्ष आणि क्रांतिकारी संघर्षाच्या माध्यमातून एकाधिकारशाही राजवट उलथवून टाकणे शक्य होते.

**२३) भारतीय नेतृत्वावर प्रभाव:** रशियन क्रांतीमुळे भारतात समाजवादी विचारांचा प्रसार आणि प्रसार झाला.

जवाहरलाल नेहरू, सुभाष बोस आणि भारतातील कम्युनिस्टांसह अनेक भारतीय नेते सोव्हिएत युनियनच्या साम्राज्यवादविरोधी आग्रहाने आणि समाजवादाच्या आदर्शांनी खोलवर प्रभावित झाले होते.या काळात भारतीय नेत्यांच्या राजकीय शब्दसंग्रहात "समाजवाद" हा शब्द व्यापक झाला.स्वातंत्र्यानंतर, पंचवार्षिक योजना आणि जड उद्योग तसेच बहुउद्देशीय प्रकल्पांवर लक्ष केंद्रित करून नेहरूंच्या आर्थिक नियोजन धोरणांमध्ये हा प्रभाव स्पष्ट दिसून आला.

**२४) भारतातील कम्युनिस्ट चळवळीचा उदय:** रशियन क्रांतीमुळे भारतात कम्युनिस्ट चळवळीची स्थापना झाली. पहिले भारतीय कम्युनिस्ट सोव्हिएत रशियामध्ये प्रशिक्षित झाले होते.ए.के. गोपालन आणि ईएमएस नंबूदिरीपाद सारख्या नेत्यांनी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसपासून वेगळे होऊन भारतीय कम्युनिस्ट पक्षाची स्थापना केली.

**२५) राष्ट्रीय चळवळीचे कट्टरतावाद:** कम्युनिस्ट चळवळीच्या वाढीमुळे आणि मार्क्सवादाच्या प्रभावामुळे भारतीय राष्ट्रीय चळवळीचे कट्टरतावाद वाढले.

भारतीय भांडवलदार वर्गाविरुद्ध कामगारांच्या संघर्षांसह वर्ग संघर्ष, भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा एक अविभाज्य भाग बनला.

सोव्हिएत युनियनच्या नेतृत्वाखालील साम्राज्यवादाविरुद्धच्या जागतिक संघर्षाचा भारतीय राष्ट्रीय चळवळ एक भाग बनली.

**२६) ब्रिटिश धोरणावर परिणाम:** ब्रिटिशांनी रशियन क्रांतीचा प्रभाव आणि "बोल्शेविक धोका" भारतातील त्यांच्या राजवटीसाठी धोका म्हणून पाहिले.१९१७ मध्ये त्यांनी मोंटेगू घोषणापत्र जारी केले , ज्यामध्ये हळूहळू स्वराज्याचे आश्वासन देण्यात आले, अंशतः बोल्शेविक हुकुमाचा शांततेवरील परिणामाला प्रतिसाद म्हणून.

राष्ट्रवादी उठावांना "बोल्शेविक षड्यंत्र" म्हणून समजून ब्रिटिश अधिकाधिक दडपशाही करू लागले .

**आपली प्रगती तपासा :**

१. रशियन राज्यक्रांतीचे परिणाम जाणून घ्या.

## ३.५ सारांश :

रशियाच्या इतिहासातील एक अत्यंत महत्वपूर्ण घटना म्हणजे १९१७ ची राज्यक्रांती होय. या क्रांतीने रशियात प्रचलित असणाऱ्या अनियंत्रित अशा झार सत्तेचा शेवट केला. तसेच जमीनदार व भांडवलदारांचे रशियाच्या राजपुरवाहातील वर्चस्व नष्ट केले. त्याच बरोबर शेतकरी, कामगार व पीडित रशियन समाजाला त्यांचे न्याय हक्क मिळवून देण्याची महत्वपूर्ण कामगीरी केली. या क्रांतीलढ्यात लेनिन ट्रॉटस्कि व

स्टॅलिन या नेतृत्वाचे योगदान महत्वपूर्ण ठरले. परिणामी रशिया राजसत्तेचा शेवट होवून सोव्हिएट युनियनची निर्मिती झाली.या क्रांतीचे दूरगामी परिमाण केवळ रस्त्यावरच नव्हे तर संपूर्ण जगावर घडून आले. या क्रांतीच्या माध्यमातून रशियाला साम्यवादी विचारसरणी व राजप्रवली जागतिक राजकारणात रुजविण्यात बऱ्याच प्रमाणात यश आले. याच बदलत्या राजप्रणाली व विचार प्रणालीच्या माध्यमातून रशिया पुढे जागतिक राजकारणात रशिया एक प्रबळ राष्ट्र ठरला.

## ३.६ प्रश्न :

१. रशियन राज्यक्रांतीच्या कारणांचा थोडक्यात आढावा घ्या.

२. रशियन राज्यक्रांतीच्या वाटचालीवर भाष्य करा.

३. सोव्हिएट युनियनच्या निर्मितीवर सविस्तर माहिती लिहा.

४. रशियन राज्यक्रांतीचे परिणाम थोडक्यात विषद करा.

## ३.७ संदर्भ सूची :

१. विसाव्या शतकातील जग - डॉ. धनंजय आचार्य.

२. आधुनिक जग - डॉ.एन. एस. तांबोळी.

३. आधुनिक जग- पी. जी. जोशी.

४. आधुनिक जग भाग - १ व भाग - २- डॉ. सुमन वैद्य, डॉ. शांता कोठेकर.

५. आधुनिक जगाचा इतिहास- प्राचार्य आर. डी. गायकवाड, प्राचार्य वाय. एन. कदम, प्रा. डी. डी. थोरात.

❖❖❖❖

# ४

# रशियन क्रांती आणि पाया (१९१७-१९२७)
# रशियन राज्यक्रांतीतील व्लादिमीर लेनिनचे योगदान (१८७०-१९२४)

**प्रकरण रचना**

४.१. उद्दिष्टे

४.२. प्रस्तावना

४.३. रशियन क्रांती आणि पाया (१९१७-१९२७)

४.४. रशियन राज्यक्रांतीतील व्लादिमीर लेनिनचे योगदान (१८७०-१९२४)

४.५. सारांश

४.६. प्रश्न

४.७. संदर्भ सूची

## ४.१. उद्दिष्टे :

१. रशियन राज्यक्रांती काळातील घटना अभ्यासणे.

२. रशियन राज्यक्रांतीतील व्लादिमीर लेनिनचे योगदान समजून घेणे.

३. नवीन आर्थिक धोरणाचा आढावा घेणे.

## ४.२. प्रस्तावना :

विसाव्या शतकाच्या सुरुवातीला रशियन साम्राज्य एका तीव्र सामाजिक, आर्थिक आणि राजकीय संकटातून जात होते. झारशाहीची दडपशाही, सामंतशाही व्यवस्थेतील विषमता, कृषी आणि औद्योगिक क्षेत्रातील मागासलेपण, यामुळे सामान्य जनतेमध्ये असंतोष वाढला होता. या पार्श्वभूमीवर १९१७ मध्ये घडलेल्या रशियन क्रांतीने जगाच्या राजकीय इतिहासाला एक नवे वळण दिले. ही क्रांती केवळ एका राजघराण्याच्या समाप्तीपुरती मर्यादित नव्हती, तर तिने एक नवे राज्य, नवीन विचारधारा-साम्यवाद आणि एक नवीन जागतिक घडामोडींचा प्रवाह सुरू केला. रशियन क्रांतीचे दोन मुख्य टप्पे होते – फेब्रुवारी क्रांती (झारच्या सत्तेचा अंत) आणि ऑक्टोबर क्रांती (बोल्शेविक पक्षाचे सत्ताग्रहण). या क्रांतीचा पाया १९१७ ते १९२७ दरम्यानच्या राजकीय, सामाजिक आणि आर्थिक

घडामोडीत घातला गेला. या कालखंडात नव्या सोविएत राज्याची स्थापना, याद्वारे रशियातील सर्वशक्तिमान झारशाहीचा पूर्णविराम, आणि कामगार-शेतकरी यांच्या आधारे नवीन राज्यरचनेची मांडणी करण्यात आली.या ऐतिहासिक परिवर्तनामध्ये व्लादिमीर लेनिन या विचारवंत, क्रांतिकारी आणि नेता यांचे योगदान अत्यंत मोलाचे होते. मार्क्सवादी विचारांचा प्रभाव घेऊन लेनिनने रशियन समाजवादी चळवळीला एक सुसंगत दिशा दिली. त्याच्या नेतृत्वाखाली बोल्शेविक पक्षाने क्रांती घडवून आणली आणि नंतरच्या काळात सोविएत रशियाच्या स्थापनेचा पाया घातला. लेनिनने "अर्थव्यवस्थेवर राज्याचे नियंत्रण", "भूमिहीनांना जमीन", आणि "युद्धबंदी" यासारख्या क्रांतिकारक घोषणा दिल्या, ज्यामुळे त्याला सामान्य जनतेचा पाठिंबा मिळाला. रशियन राज्यक्रांतीचे यश आणि नव्या साम्यवादी राज्याची उभारणी यामागे लेनिनचे विचार, रणनीती, आणि कृती या त्रिसूत्रीचा महत्त्वपूर्ण वाटा होता. त्यामुळे रशियन क्रांतीचा अभ्यास करताना लेनिनच्या योगदानाचे विश्लेषण अत्यावश्यक ठरते. या प्रकरणात आपण रशियन क्रांतीच्या पायाभूत घटकांचा अभ्यास करून, त्यामधील व्लादिमीर लेनिनच्या क्रांतिकारी भूमिकेची करणार आहोत.

## ४.३. रशियन क्रांती आणि पाया (१९१७-१९२७) :

१९१७ मध्ये झालेली क्रांतीची सुरवात ते १९२७ दरम्यान अनेक महत्वाच्या घटना रशियात घडून आल्या. त्या पुढीलप्रमाणे :-

**पेट्रोग्राडची क्रांती :**

१९१७ मध्ये रशियामध्ये दोन टप्प्यात क्रांतीं घडून आली. पहिल्या टप्प्यातील क्रांतीची सुरुवात अन्नाच्या कमतरतेवरून संप आणि दंगलींनी झाली. ही क्रांती प्रामुख्याने ७ मार्च ते १५ मार्च १९१७ या कालखंडात घडली. रशियाच्या वायव्येस बाल्टिक समुद्रावर वसलेले पेट्रोग्राड १९१४ पर्यंत सेंट पीटर्सबर्ग म्हणून ओळखले जात असे. नंतर त्याचे नामांतर पेट्रोग्राड असे करण्यात आले. कामगार वर्गाचे निकृष्ट दर्जाचे राहणीमान आणि कामाच्या परिस्थितीमुळे निर्माण झालेला असंतोष उफाळून आला. पहिल्या महायुद्धामुळे रशियाच्या अर्थव्यवस्थेत मोठा अडथळा निर्माण झाला आणि शेतकरी , कामगार वर्ग , मध्यमवर्ग आणि उच्च वर्गाकडून निकोलस दुसरा याला मिळणारा पाठिंबा कमी झाला. १९१६-१७ च्या हिवाळ्यात रशिया अन्न आणि इंधनाच्या टंचाईने त्रस्त होता. जानेवारी १९१७ पर्यंत, रशियन सैन्याचे मनोबल खूपच खालावले होते, १९१६ मध्ये १२ लक्ष सैनिक पळून गेले. ९ मार्च रोजी मॉस्को आणि पेट्रोग्राडमध्ये मोठे संप झाले. आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा करण्यासाठी एक मोठा मोर्चा काढण्यात आला, परंतु या मोर्चाचे रुपांतर आंदोलनामध्ये घडून आले. ९ मार्च पर्यंत पेट्रोग्राडमध्ये २ लक्ष लोक संपावर होते. ११ मार्च रोजी निकोलस दुसरा याने कामगारांनी आपापल्या कारखान्यातून कामावर रुजू व्हावे व चौथ्या ड्यूमाला बंद करण्याचे आदेश दिले असून ड्युमा सदस्यांनीही स्वतःच्या घरी जावे असा जरी करण्यात आला, परंतु त्यांनी नकार दिला. अशावेळी ११ मार्च रोजी निकोलस दुसरा याने सैन्याला निदर्शकांवर गोळ्या घालण्याचे आदेश दिले. पेट्रोग्राड सैन्याच्या ६६,००० सैनिकांनी गोळीबारास नकार दिला आणि बंड केले आणि त्याऐवजी निदर्शकांमध्ये सामील झाले. पेट्रोग्राड सोव्हिएत किंवा कामगार परिषद स्थापन करण्यात आली. १२ मार्च रोजी पेट्रोग्राड सोव्हिएतने ऑर्डर क्रमांक १ जारी केला ज्यामध्ये असे

म्हटले होते की सशस्त्र दलांनी फक्त सोव्हिएतच्या आदेशांचे पालन करावे. त्याच दिवशी क्रोनस्टॅडमधील खलाशांनी बंड केले. यावेळी निकोलस दुसरा यांना पदत्याग करण्यास सांगण्यात आले. १४ मार्च रोजी चौथ्या ड्युमा समितीने सार्वभौम अधिकार आपल्या हाती घेऊन प्रिन्स जॉर्जी ल्वोव याच्या नेतृत्वाखाली उदारमतवादी व समाजवादी यांचे हंगामी सरकार स्थापन केले. परिस्थिती पूर्णपणे हाताबाहेर गेलेली आहे हे पाहून १५ मार्च १९१७ रोजी झार निकोलस दुसरा याने राज्यत्याग केला. त्याने आपला भाऊ ड्यूक मायकेल याच्याकडे सत्ता सोपवून झार निकोलस याने राज त्याग केला. त्यानंतर ६ दिवसांनी झारला आणि त्याच्या कुटुंबीयांना अटक करून पूर्व रशियातील उरल पर्वताच्या पाथ्याशी असलेल्या तुरुंगात पाठविण्यात आले. अशारीतीने पहिल्या टप्यात क्रांतीकारकांना महत्वपूर्ण यश मिळाले.

**प्रिन्स जॉर्जी ल्वोव याचे सरकार (१५ मार्च ते २१ जुलै १९१७) :**

१६ मार्च रोजी मिखाईल रोडझिअंको या ड्युमा अध्यक्षाच्या नेतृत्वाखाली जुलमी राजसत्तेच्या विरुद्ध क्रांतीचे नेतृत्व करण्यासाठी एक समिती नेमण्यात आली. या समितीकडे तात्पुरत्या स्वरुपात रशियाचा राज्यकारभार सोपविण्यात आला. या समितीने तात्पुरत्या स्वरूपाचे नेतृत्व प्रिन्स जॉर्जी ल्वोव याच्याकडे देण्यात आले. अस्तित्वात आलेले हे तात्पुरते हंगामी सरकार मध्यमवर्गाचे प्रातिनिधिक स्वरूपाचे होते. त्यामुळे कोणताही क्रांतिकारी कार्यक्रम अंमलात आणण्याची कुवत या सरकारमध्ये नव्हती. नवीन हंगामी सरकारात तीन पक्षांचा अंतर्भाव होता. राजकुमार एलव्हॉव हा रशियातील सुधारणावादी श्रीमंत वर्गाचा प्रतिनिधी होता तर परराष्ट्रमंत्री पॉल मिल्युकॉव्ह हा लोकशाही वे उदारमतवादी पक्षाचा प्रतिनिधी होता. ह्यात तिसरा प्रतिनिधी केरेन्स्की हा फक्त समाजवादी पक्षाचे प्रतिनिधीत्व करीत होता. इंग्लंड व फ्रान्स, या राष्ट्रांच्या शासन प्रणालीच्या धर्तीवर उदारमतवादी जबाबदार सरकार स्थापन करण्याचे त्यांचे उद्दिष्ट होते. रशियाच्या सर्व समस्यांची सनदशीर मार्गांनी उकल करणे, इंग्लंड व फ्रान्स या राष्ट्रांशी पूर्ण सहकार्य करून युद्ध चालू ठेवणे, असे हंगामी सरकारचे धोरण होते. मात्र पेट्रोग्रॅड सोविएतच्या अट्टाहासामुळे भाषण, मुद्रण, संघ, व धार्मिक स्वातंत्र्य, सर्व राजबंद्यांची मुक्तता, फिनलंड व पोलंड यांना स्वायत्त शासन, या संबंधीचे आदेश हंगामी सरकारने जारी केले. झारशाहीने हद्दपार केलेल्या सर्व देशभक्तांना देशात परतण्याचे आवाहन करण्यात येऊन, सार्वत्रिक मताधिकाराद्वारा घटना समिती प्रस्थापित करण्याचे आश्वासन दिले गेले. ज्यू लोकांवर आतापर्यंत जी नियंत्रणे लादण्यात आली होती ती सर्व काढून घेण्यात आली व रशियाची राज्यघटना घटना तयार करण्यात येईल असे जाहीर करण्यात आले.

सर्वप्रथम अमेरिकेने रशियाच्या या हंगामी सरकारला मान्यता दिली. पाठोपाठ इंग्लंड व फ्रान्स ह्यांचीही मान्यता आली. क्रांतीचा भडका झाला त्यावेळी लेनिन स्वित्झर्लंडमध्ये, ट्रॉट्स्की न्यूयॉर्कमध्ये, तर स्टॅलिन सैबेरियात हद्दपारीची शिक्षा भोगीत होता. क्रांतीचे वेळी पेट्रोग्रॅडमध्ये मेनशेव्हिक किंवा बोलशेव्हिक गटाचा एकही नामांकित समाजवादी पुढारी हजर नव्हता. मात्र क्रांतीची बातमी कळताच हे नेते घाईघाईने पेट्रोग्रॅड येथे परत आले. स्टॅलिन मार्चमध्येच पेट्रोग्रॅडला पोहचला. जर्मनी व स्वीडन या मार्गे १६ एप्रिलला लेनिन रशियाच्या राजधानीत येऊन पोहोचला. न्यूयॉर्कमधून निघालेल्या ट्रॉट्स्कीला न्यूफौंडलंड येथे

ब्रिटिशांनी अडविले होते. परंतु केरेन्स्कीच्या मध्यस्थीने त्याची सुटका होऊन तो मे मध्ये रशियात पोहचला.

नवीन सरकारचे धोरण युद्धाला अनुकूल होते परंतु युद्धात रशियाचा वारंवार पराभव होऊ लागल्याने रशियन जनता, युद्धातून रशियाने आपले अंग काढून घ्यावे अशी मागणी करु लागली. अंतर्गत करातील वाढ, रोगराई, दुष्काळ व युद्धातील हानी ह्यामुळे रशियन जनता अगोदरच त्रस्त झालेली होती. नवीन हंगामी सरकारने जी राजकीय गुन्हेगारांना सार्वत्रिक माफी दिलेली होती त्याचा फायदा घेऊन लेनीन, ट्रॉटस्की, स्टॅलिन इत्यादी नेते आता रशियात परतले. क्रांतिकाळात त्यांनी परदेशात आश्रय घेतलेला होता. त्या नेत्यांनी आता सैनिक, कामगार आणि शेतकरी यांच्या संघटना ठिकठिकाणी प्रस्थापित करण्यास प्रारंभ केला. ह्या 'सोव्हिएट' संघटनांनी नवीन हंगामी सरकारच्या मवाळ घोरणास तीव्र विरोध करण्यास सुरुवात केली. शेवटी मे १९१७ मध्ये हंगामी सरकारचा प्रमुख प्रिन्स जॉर्जी ल्वोव याने आपल्या पदाचा राजीनामा दिला व त्याच्याऐवजी केरेन्स्की याने हंगामी सरकारची सूत्रे आपल्या हाती घेतली.

**केरेन्स्कीचे मेन्शेव्हिक सरकार (जुलै १९१७ ते नोव्हेंबर १९१७) :**

हंगामी सरकारचा पंतप्रधान प्रिन्स जॉर्जी ल्वोव याने राजीनामा दिल्याने त्याच्याच सरकारमध्ये युद्धमंत्री म्हणून काम करणारा मेन्शेव्हिक गटाचा नेता केरेन्स्कीकडे सरकारचे प्रमुख पद देण्यात आले. रशियातील अस्थिर परिस्थिती आटोक्यात आणण्याचा केरेन्स्कीने अटीतटीने प्रयत्न चालविला. मेन्शेविक पक्षाच्या मदतीने त्याने रशियात आमूलाग्र सुधारणा घडवून आणण्याचे जनतेला आश्वासन दिले. रशियाकरिता घटना लवकर तयार व्हावी म्हणून त्याने घटना समिती ताबडतोब प्रस्थापित केली. परस्परविरोधी हितसंबंध असणाऱ्या गटात जास्तीतजास्त मतैक्य प्रस्थापित करु शकू असा त्याला विश्वास वाटत होता याकरिता त्याने भाडवलदार वर्ग व कामगार वर्ग ह्यांच्यात मतैक्य घडवून आणण्याचा प्रयत्न केला. परंतु शेतकरी, कामगारांना केरेन्स्की हा क्रांती विरोधक वाटू लागला. इंग्लंड आणि फ्रान्सच्या आग्रहामुळे केरेन्स्कीने पहिल्या महायुद्धातील सहभाग सुरु ठेवला. ह्यातच आता युद्धआघाडीवर जर्मनीला एकामागून एक विजय प्राप्त होऊ लागले. ३ सप्टेंबर १९१७ जर्मन सैन्याने रिगा शहर जिंकून घेतले व इस्टोनियात प्रवेश केला. ह्याचवेळी रशियाला गॅलेशियासुद्धा गमवावा लागला. रशियाचे जर्मनीविरुद्ध मोठ्या प्रमाणात चढाई करण्याचे सर्व प्रयत्न अपयशी ठरले. रशियाचे विविध आघाड्यांवर हे जे पराभव झालेत त्यामुळे केरेन्स्की सरकारची फार मोठी मानहानी झाली व केरेन्स्की सरकार जनतेमध्ये अतिशय अप्रिय झाले. त्यातच केरेन्स्की आणि त्याचा विश्वासू सहकारी जनरल कोर्नीलॉव्ह यांच्यात मतभेद निर्माण झाले. जमीनदार व भांडवलदार वर्ग यांच्या मदतीने जनरल कोर्नीलॉव्ह याने रशियात लष्करी हुकूमशाही प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे रशियात केरेन्स्की सरकारवरचा विश्वास उडाला व रशियातील सर्व कामगार वर्ग बोल्शेविक पक्षाभोवती मोठ्या आशेने गोळा झाला. या परिस्थितीचा फायदा घेऊन बोल्शेविक पक्षाच्या जहाल समाजवादी नेत्यांनी क्रांती घडवून आणली व केरेन्स्कीचे सरकार उलथून पाडले.

**बोल्शेविक क्रांती (७ नोव्हेंबर १९१७) :**

बोल्शेविकांनी ७ नोव्हेंबर १९१७ या दिवशी सरकारी कचेऱ्या, पोस्ट, टेलिग्राफ, रेल्वे, बँका अशी शासकीय महत्वाची केंद्रे स्वतःच्या ताब्यात घेतली व केरेन्स्की सरकारच्या सदस्यांना अटक करण्यात आली आणि त्याला सत्ता त्याग करण्यास भाग पाडण्यात आले. बोल्शेविक पक्षाचा नेता लेनीन याला केरेन्स्की सरकारचे मवाळ धोरण पसंत नव्हते. झारच्या पाडावा पसून ते नोव्हेंबर १९१७ मधील बोल्शेविक गटाच्या विजयापर्यंत रशियाचा इतिहास म्हणजे उदारमतवादी आणि मवाळ पक्षाने आपल्या सनदशीर मार्गानी परिस्थितीत बदल घडवून आणण्याचा अपयशी प्रयत्न केला. ८ नोव्हेंबर १९१७ ला लेनिनने अध्यक्षपदाची सूत्रे आपल्या हातात घेतली. परराष्ट्रमंत्री म्हणून ट्रॉट्स्की, शिक्षणमंत्री म्हणून लुनाचरस्की, गृहमंत्री म्हणून रिकोव्ह तर अल्पसंख्याक गटांचे मंत्री म्हणून स्टॅलिन यांना कार्यभार देण्यात आला. अशा रीतीने रक्तपात न होता बोल्शेविकाच्या हातात सत्ता आली.

**आपली प्रगती तपासा.**

१. पेट्रोग्राडची क्रांती.
२. बोल्शेविक क्रांती

## ४.४. रशियन राज्यक्रांतीतील व्लादिमीर लेनिनचे योगदान (१८७०-१९२४) :

आधुनिक जगाच्या इतिहासाला वळण देणाऱ्या काही मोजक्या जागतिक नेत्यांत लेनिनची गणना केली जाते. मार्क्सच्या समाजवादाच्या सिद्धांताला त्याने रशियात मूर्त स्वरूप दिले. त्याने समाजवादी तत्त्वप्रणालीची पायाभरणी करून आधुनिक रशियाला राजकीय, आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक स्तरावर जीवनावर जागतिक स्तरावर नावलौकिक मिळवून दिला. व्लादिमीर लेनिनचा जन्म २२ एप्रिल १८७० रोजी रशियात एका सुसंस्कृत व मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. लेनिनमध्ये असामान्य बुद्धिमत्ता, जबर इच्छाशक्ती, ध्येयनिष्ठा, चिकाटी, आत्मविश्वास, जिद्द, वक्तृत्व, संघटनकौशल्य इ. गुण होते. त्यामुळेच तो प्रभावी नेता होऊ शकला. त्याशिवाय प्रामाणिकपणा, योग्य व्यक्तीची योग्य पारख करून त्यांच्या कुवतीनुसार योग्य ती कामे त्यांच्याकडून करवून घेणे, अवघड विषय सोप्या शब्दात मांडणे, त्यागवृत्ती, तर्कशुद्ध विचारपद्धती वगैरे गुणही होते. विद्यार्थी दशेत लेनिन हा अत्यंत अभ्यासू व हुशार विद्यार्थी होता. त्याला लहाणपणापासूनच वाचण्याचा विलक्षण छंद होता. त्याने रशियातील अनेक थोर साहित्यिकांचे वाङ्मय वाचून काढले होते. रशियातील हुकूमशहांच्या राजवटी, जमीनदार व भांडवलदारांकडून होणारे जनतेचे शोषण, शेतकरी व कामगारवर्गाची वाईट अवस्था इ. मुळे लेनिनच्या मनात शोषकांबद्दल द्वेष व शोषित समाजाबद्दल सहानुभूतीची भावना निर्माण झाली होती.

इ.स.१८६६ मध्ये त्याच्या पित्याचा झालेला मृत्यू व त्याच्या पुढील वर्षी त्याचे श्रद्धास्थान असलेला थोरला भाऊ अलेक्झांडर याला राजद्रोहाच्या आरोपावरून झालेला मृत्यूदंड या दोन घटना लेनिनच्या जीवनाची दिशा बदलून टाकणाऱ्या ठरल्या. थोरल्या भावाला झालेल्या मृत्युदंडाच्या शिक्षेच्या निषेधार्थ त्याने आयोजित केलेल्या विद्यार्थ्यांच्या निषेध मोर्चामुळे त्याची कझान विद्यापीठातून हकालपट्टी केली. त्यामुळे त्याचे शिक्षण बंद झाले.

मात्र त्यानंतर तो देशाची चिघळती परिस्थिती पाहून त्यावर चिंतन, मनन करू लागला. मार्क्सच्या 'Das Capital' या ग्रंथाचा त्याने सखोल अभ्यास केला. रशियाच्या समस्यावर मार्क्सवादी विचार हाच एकमेव तोडगा आहे असे त्याचे मत बनले. इ.स. १८८५ मध्ये तो पीटसबर्ग येथील क्रांतिकारी गटाचा सदस्य बनला. देशातील प्रचलित परिस्थितीच्या संदर्भात मार्क्सवादी विचार प्रसारित करण्यास त्याने प्रारंभ केला. त्यामुळे झारशाहीने त्यास इ.स. १८९७ मध्ये सैबेरियात हद्दपार केले. इ.स.१९१७ पर्यंत तो रशियाबाहेर राहूनच रशियातील क्रांतीकार्याला दिशा व गती देत होता. इ.स.१९०३ मध्ये Social Democratic Party मध्ये फूट पडल्यानंतर बोल्शेव्हिक (जहाल) गटाचे नेतृत्व त्यांच्याकडे आले.

लेनिन हा मूलगामी विचारवंत होता. त्याचे Imperialism, The Last Stage of Capitalism व State and Revolution ग्रंथ जगप्रसिद्ध आहेत. २ मार्च १९१७ मध्ये रशियात क्रांती झाली तेव्हा लेनिन स्वित्झर्लंडमध्ये, ट्रॉटस्की न्यूयॉर्कमध्ये तर स्टॅलिन सैबेरियात हद्दपारीची शिक्षा भोगत होते. मात्र पेट्रोगार्ड येथील क्रांतीची वार्ता समजताच हे नेते रशियात एकत्र आले. लेनिनसारखा प्रभावी क्रांतिकारक नेता रशियात गेला तर क्रांतीचा भडका उडेल, तेथे अराजक व गोंधळ निर्माण होईल, जर्मनीशी युद्ध चालू ठेवणे अशक्य होईल असा जर्मनीचा अंदाज होता. म्हणूनच चिलखती गाडीतून लेनिनला रशियात आणून सोडण्यास जर्मन सरकारने मदत केली होती. लेनिन रशियात आल्यावर ४ एप्रिल इ. स. १९१७ रोजी पेट्रोगार्डच्या भव्य चौकात त्याने लक्षावधी कामगारांपुढे केलेल्या भाषणात म्हटले होते, "हंगामी सरकार हे मोठ्या भांडवलदारांचे व मोठ्या जमीनदारांचे आहे. ते उपेक्षित वर्गाचे प्रश्न सोडवू शकत नाही. म्हणून पेट्रोगार्ड सोव्हिएटने हंगामी सरकारला दिलेला पाठिंबा काढून घ्यावा व सत्तासूत्रे आपल्या हाती घ्यावीत." लेनिनने मांडलेली ही तत्त्वे 'एप्रिल सिद्धांत' म्हणून ओळखली जातात.

केरेन्स्कीच्या नेतृत्वाखालील हंगामी सरकारला रशियापुढील प्रश्न सोडविण्यात अपयश आल्याने जुलै १९१७ मध्ये कामगारांनी उठाव केले. पण या उठावामागे बोल्शेव्हिकांची चिथावणी आहे असे वाटून वोल्शेव्हिकांना अटक झाली. लेनिन आपल्या काही सहकाऱ्यांसह भूमिगत झाला होता. केरेन्स्कीने काही Socialist Revolutionary Party च्या सदस्यांचा व मेन्शेव्हिक सदस्यांचा मंत्रिमंडळात अंतर्भाव केला; परंतु केरेन्स्कीने आपले युद्ध धोरण बदलले नाही. बोल्शेव्हिक हे युद्धबंदीसाठी कामगारांना चिथावणी देत आहेत असे वाटून केरेन्स्कीने बोल्शेव्हिकांविरुद्ध शस्त्र उगारले. युद्धाला असलेला विरोध मोडून काढण्यासाठी त्याने सेनापती कोर्निलोव याच्या हाती सरकारचा ताबा दिला; पण त्याने बोल्शेव्हिकांविरुद्ध लढण्याऐवजी राजधानीचाच ताबा घेण्याचे कारस्थान रचले. तेव्हा बोल्शेव्हिक पक्षाच्या प्रभावाखालील कामगार व सैनिकांनी आपली सशस्त्र दले उभारून केर्निलोव व त्याच्या सैन्यास पराभूत केले व केरेन्स्कीचे हंगामी सरकार उलथवून लावण्यात यश मिळविले.

**रशियन सोशलिस्ट फेडरेटिव्ह सोव्हिएत रिपब्लिक (RSFSR) नामकरण :**

ऑक्टोबर क्रांतीमध्ये रशियन हंगामी सरकार उलथवून टाकल्यानंतर लगेचच, ७ नोव्हेंबर १९१७ रोजी सोव्हिएत राजवट पहिल्यांदा सत्तेवर आली . २५ जानेवारी १९१८ रोजी

ऑल-रशियन काँग्रेस ऑफ सोव्हिएट्सच्या तिसऱ्या बैठकीत, मान्यता नसलेल्या राज्याचे नाव 'सोव्हिएत रशियन रिपब्लिक' असे ठेवण्यात आले. पुढे हे नाव बदलून १० जुलै १९१८ रोजी, १९१८ च्या रशियन संविधानानुसार देशाचे नाव 'रशियन सोशलिस्ट फेडरेटिव्ह सोव्हिएत रिपब्लिक' (R.S.F.S.R.) असे ठेवले. नंतर १९२२ हेच नाव 'युनियन ऑफ सोव्हिएत सोशॅलिस्ट रिपब्लिक' (U.S.S.R.) असे करण्यात आले.

**ब्रेस्ट लिटोव्हस्कचा तह (३ मार्च १९१८) :**

समाजवादी तत्त्वप्रणालीच्या आधारावर रशियाची अर्थव्यवस्था उभारण्याकरिता आणि रशियाचे राजकीय व सामाजिक जीवन स्थिरावरून सर्वांगीण प्रगती होण्याकरिता लेनिन आणि त्याच्या सहकारी बोल्शेविकांना सर्व आघाड्यांवर शांततेची नितांत गरज भासत होती. त्यामुळे सत्तेवर येताच लेनिनच्या नेतृत्वाखालील बोल्शेविकांनी युद्धबंदी करण्याचा निर्णय घेतला. क्रांतीपूर्वीच जाहीर केलेल्या 'शांततेसाठी त्वरित वाटाघाटी' या घोषणेनुसार लेनिनने २२ नोव्हेंबर १९१७ मध्ये जर्मनीसोबत युद्धविरामाबाबत बोलणी सुरू केली. रशिया आणि जर्मनीमध्ये २ डिसेंबर १९१७ मध्ये युद्धविराम अंमलात आला. तहाची कलमे ठरविण्याकरिता २२ डिसेंबरला रशिया आणि जर्मनी यांच्यातील वाटाघाटींना प्रारंभ झाला. या वाटाघाटी सुमारे तीन महिने रेंगाळल्या. जर्मनीने रशियावर कठोर कलमे लादण्याचा प्रयत्न केला, त्यामुळे बोल्शेविकांनी तहामध्ये शक्य तितकी दिरंगाई करण्याचा प्रयत्न केला. रशियावर दबाव आणण्यासाठी १८ फेब्रुवारी १९१८ मध्ये जर्मन सैन्याने रशियावर चढाई केली. अशा परिस्थितीत कोणताही अन्य पर्याय उपलब्ध न राहिल्यामुळे बोल्शेविकांनी तहाला मान्यता दिली. ३ मार्च १९१८ रोजी जर्मनी आणि रशिया यांच्यात ब्रेस्ट लिटोव्हस्क येथे तह झाला. या तहातील कलमे पुढील प्रमाणे होती.

१) रशियाने आपल्या ताब्यातील पूर्व पोलंड, लिथुएनिया, लाटविया, एस्टोनिया, कार्स, आर्दाहान आणि बाटूम या प्रदेशावरील अधिकार सोडावे.
२) फिनलँड, इस्थोनिया, लिव्होनिया आणि आलॅंड बेटातून रशियाने आपली सेना काढून घ्यावी.
३) युक्रेन, जॉर्जिया या रशियन साम्राज्यातील महत्त्वाच्या प्रदेशांना स्वातंत्र्य द्यावे.
४) युक्रेनमधून रशियन सेना मागे घेऊन जर्मनीने युक्रेनशी केलेल्या तहास मान्यता द्यावी.
५) जर्मनी-ऑस्ट्रियाच्या प्रदेशात साम्यवादी क्रांतीचा प्रसार रशियाने थांबवावा.
६) युद्धखंडणीपोटी रशियाने जर्मनीला १ कोटी डॉलर्स युद्धदंड द्यावा.

१९१४ सालापासून सुरू झालेल्या महायुद्धात रशियाची प्रचंड जीवित आणि वित्तहानी झाली होती. या तहाने रशियाला ६ कोटी ६० लाख लोकसंख्या आणि ५ लक्ष चौरस मैलचा विस्तार असलेला प्रचंड मोठा भूभाग गमवावा लागला. जो प्रदेश रशियाला या तहात गमवावा लागला तो रशियातील बऱ्यापैकी विकसित प्रदेश होता. रशियामधील एकूण लागवडीखालील शेतजमिनीपैकी २७% जमीन, २६१% लोहमार्ग, ७३१% लोहउद्योग, ७५१% कोळशाच्या खाणी या करारामुळे रशियाच्या ताब्यातून जर्मनीकडे गेल्या. ब्रेस्टलिटोव्हस्कच्या तहामुळे रशियाचे प्रचंड नुकसान झाले असले तरी रशिया समोर अन्य कोणताही मार्ग उपलब्ध नव्हता रशियातील अस्थैर्य, आर्थिक हलाखी आणि अंतर्गत अशांतता यावर मात करण्यासाठी बोल्शेविकांना हा तह स्वीकारावा लागला.

**चेका व रेड आर्मीची स्थापना :**

रशियन सरकारने आपल्या समाजवादी धोरणे कडकपणे राबविल्यामुळे प्रस्थापित वर्गाला धक्का बसून त्यांच्यामध्ये असंतोष निर्माण झाला. दरबारी मंडळी, अमीर, उमराव, जमीनदार, भांडवलदार, कारखानदार, उद्योगपती, व्यापारी इ. वर्ग संतप्त झाला. कारण त्यांना आता या नव्या व्यवस्थेत या वर्गास किंमत नव्हती. म्हणून या वर्गाने साम्यवादी क्रांतीच्या विरोधी कारवाया सुरू केल्या. त्याशिवाय परकीय भांडवलदारांनी व सरकारांनी रशियात गुंतवलेले भांडवल सोव्हिएट सरकारने मोबदल्याशिवाय जप्त केल्यामुळे ते सोव्हिएट सरकारवर नाराज होते. त्यामुळे रशियातील प्रतिक्रांतिकारी शक्तींना मदत करून सोव्हिएट सरकारच नष्ट करण्याचा निर्णय भांडवलशाही राष्ट्रांनी घेतला. त्यानुसार झारच्या या लष्करातील काही लष्करप्रमुखांनी लष्कर संघटित करून मॉस्कोवर आक्रमण करण्याची योजना आखली. त्याशिवाय ८-१० राष्ट्रांनी आपल्या फौजा रशियात पाठवल्या. परंतु नव्या सरकारने या परिस्थितीस खंबीरपणे तोंड दिले. प्रतिक्रांतिकारकांचा शोध घेऊन त्यांचा बीमोड करण्यासाठी ‘चेका’ ही गुप्तहेर संघटना स्थापन करण्यात आली. त्याशिवाय ट्रॉटस्कीच्या नेतृत्वाखाली ‘लाल सेना’ उभी करण्यात आली. प्रतिक्रांतिकारकांच्या सेनेला ‘धवल सेना’ या नावाने ओळखली जात असे. सोव्हिएट सरकारवर निष्ठा असलेले ५ लक्ष लाल सैनिक प्रतिकारार्थ रणांगणात उतरले. परकियांनी धवल सेनेला पैसा, युद्धसाहित्य पाठवले व लष्करी तज्ज्ञही पाठवले होते. धवल सेनेच्या लष्करी तुकड्या डेनिकिन, रँगल, युडेचिन अशा अनेक झारकालीन लष्करप्रमुखांच्या नेतृत्वाखाली युक्रेन, क्रिमिया, बाल्टिक क्षेत्र अशा निरनिराळ्या भागात ब्रिटीश, अमेरिकन, फ्रेंच, जपानी, इटालियन सैन्य तुकड्या रशियात आगेकूच करीत होत्या. परंतु लाल सेनेने प्रतिक्रांतीकारकांचा पराभव केला. त्यामुळे १९२० च्या अखेरीस पासून परकियांनी हळूहळू आपले सैन्य मागे घेतले. एकंदरीत लेनिन व ट्रॉटस्कीचे प्रभावी नेतृत्व, योजना कौशल्य, लालसेनेने दिलेला लढा यामुळे शेवटी अंतर्गत विरोध नष्ट झाले. परकीय शक्तीचे रशियन साम्यवादी क्रांतीला असलेले आव्हानही नष्ट झाले व शेवटी रशियन क्रांती यशस्वी झाली.

**आपली प्रगती तपासा.**

४. ब्रेस्ट लिटोव्हस्कचा तह यावर थोडक्यात लिहा.

२. चेका व रेड आर्मीची स्थापना

**लेनिन सरकारची धोरणे (Policy of Lenin) :**

लेनिन सरकारने कार्ल मार्क्सच्या विचारधारेवर आधारित रशियात समाजवादी शासन प्रस्थापित करण्यासाठी खालील धोरणे अल्पावधीत राबवले.

१) जमिनीचे व देशातील सर्व नैसर्गिक संपत्तीचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. खासगी संपत्तीचा हक्क काढून घेतला गेला. इ.स. १९१८ पर्यंत चर्च, सरकार व उमराव यांच्या ताब्यातील ३७ कोटी ५० लक्ष एकर जमीन शेतकऱ्यांना वाटून टाकण्यात आली.

२) प्रत्येक रशियन नागरिकाने जीवन निर्वाहासाठी काम केलेच पाहिजे, ऐतखाऊंना उपाशी मरावे लागेल असे घोषित केले.

३) धर्मसंस्थांच्या ताब्यातील मालमत्ता कोणताही मोबदला न देता काढून घेण्यात आली व धर्मसंस्थेला सरकारकडून दिले जाणारे द्रव्यसाहाय्य द्रव्य बंद केले. राज्य व चर्च यांची फारकत केली. चर्च या धर्मसंस्थेचे वर्चस्वच नष्ट करण्यात आले.

४) रशियाची राजधानी पेट्रोगार्ड ऐवजी मॉस्को येथे हलवण्यात आली.

५) क्रांतिकाळात प्रचलित असलेली ज्युलियन दिनदार्शिका रद्द करून त्याऐवजी युरोपात प्रचलित असलेली ग्रेगेरियन दिनदर्शिका स्वीकारली.

६) रशियात उद्योगधंद्यांचे व बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले.

७) उत्पादन व वितरण कार्यात समन्वय साधण्यासाठी सर्वोच्च राष्ट्रीय अर्थव्यवस्था समिती स्थापन करण्यात आली.

८) शेतकऱ्यांना जमिनीचे समान वाटप करण्यासाठी नियम करण्यात आले.

९) युद्धपूर्वकाळात झारने घेतलेली कर्जे रद्द करण्यात आली.

१०) नोंदणी न झालेले विवाह बेकायदेशीर ठरविले गेले. जन्माची नोद करण्याची सक्ती केली व घटस्फोटाच्या कायद्यात दुरुस्ती केली.

११) शैक्षणिक सोयीचा विस्तार करून ग्रंथालयांच्या विकासासाठी अनेक सवलती जाहीर केल्या

१२) साम्यवादी पक्ष हा एकच पक्ष मान्य करून इतर पक्षांवर बंदी घातली.

**लेनिनचा आक्रमक साम्यवाद :**

रशियन क्रांती यशस्वी झाल्यावर लेनिनने आपल्या स्वप्नातीत समाजवाद सत्यात उतरविण्यासाठी पावले उचलली. लेनिनच्या नीतीनुसार सर्व जमीन राष्ट्राच्या मालकीची असून ती केवळ कसण्यापुरतीच शेतकऱ्यांच्या स्वाधीन करण्यात आलेली होती. प्रत्येक शेतकरी कुटुंबातील माणसांची संख्या व गरजा लक्षात घेऊन जमिनीचे वाटप करण्यात आलेले होते. मात्र सामान्य शेतकऱ्याला लेनिनचा विरोधविकासाचा सिद्धांत किंवा समाजवादी तत्वज्ञान समजत नव्हते. शतकानुशतके दुःख दारिद्र्याने पीडिलेल्या भूमीहीन शेतकऱ्याला जमिनी मिळाल्याने जमिनीवर व त्यातून त्याच्या कष्टाने पिकणाऱ्या अन्नधान्यावर आपलाच हक्क आहे, असेच वाटत होते. जास्तीचे धान्य सरकारच्या स्वाधीन करण्याची शेतकऱ्यांची मुळीच तयारी नव्हती. निदान त्याची किमत तरी सरकारकडून मिळावी अशी त्यांची अपेक्षा होती. परदेशांतून पक्क्या मालाची आयात सोविएत सरकारने बंद केल्याने व रशियातील ओद्योगिक उत्पन्न त्यावेळी फारच घटले असल्याने, धान्याच्या मोबदल्यात पक्का माल पुरेशा प्रमाणात शेतकऱ्यांना पुरविणेही सरकारला शक्य होत नव्हते. परंतु शहरवासियांना अन्नधान्य पुरविणे अगत्याचे असल्याने जबरीने, प्रसंगी सशस्त्र स्वयंसेवकांच्या तुकड्या खेड्यांत पाठवून धान्य ताब्यात घेण्यास

सरकारने सुरुवात केली. त्यामुळे शेतकरी वर्गात असंतोष भडकला. सरकारच्या अपरोक्ष, शेतकरी धान्य साठवून ठेऊ लागले. परंतु त्याचाही उपयोग होत नाही असे दिसताच स्वतःच्या गरजेपुरतेच धान्य पिकेल एवढीच जमीन ते लागवडीखाली आणू लागले. त्यामुळे शहरी नागरिकांना धान्य पुरवठा होणे कठीण झाले. १९२१ मध्ये रशियाचे कृषि उत्पादन १९१४ च्या जेमतेम ४०% उरले. लोकांना झारशाहीत मिळत होते तेवढेही अन्न मिळेनासे झाले. लक्षावधी रशियन लोकांची उपासमार होऊ लागली.

लेनिनने मार्क्सच्या आर्थिक सिद्धांताचा अवलंब सत्तासूत्रे हाती आल्यानंतर कामगार नियंत्रण नीती सुरू केली. त्यानुसार कारखान्याच्या कामकाजात व नियंत्रणात पूर्वीच्या मालकांच्या बरोबरीने त्यातील कामगारांना हक्क देण्यात आले. साडेतीन वर्षांचे महायुद्ध, क्रांतीमुळे निर्माण झालेली अस्थिरता व अराजक, यादवी युद्ध, परकीय हस्तक्षेप, यामुळे रशियाचे आर्थिक जीवन पूर्णपणे विस्कळीत झालेले होते. उत्पादन वाढणे अत्यंत निकडीचे होते. परंतु पूर्वीचे मालक व कामगार यांच्या संबंधातील पूर्वीच्या कटुतेमुळे त्यांच्यात सहकार्य शक्य होईना. सतत खटके उडून कामात अडथळे निर्माण होऊ लागले. शिवाय कामगारांना व्यवस्थापनाच्या कार्याचा अनुभवही नव्हता. त्यामुळे रशियाचे औद्योगिक उत्पादन थंडावले. १९२१ मध्ये ते झारकालीन रशियाच्या १९१४ च्या तुलनेत, जेमतेम १३% होते. बरेच कारखाने बंद पडले. लोखंड व पोलाद उत्पादनावर तर विशेष विपरित परिणाम झाला. १९२१ मध्ये कच्च्या लोखंडाचे उत्पादन १९१४ च्या ३% वर आले. मीठ, रॉकेल, पादत्राणे, सर्पण, साबण अशा बऱ्याच जीवनावश्यक वस्तूंचा तीव्र तुटवडा निर्माण झाला. दळणवळणही पूर्णपणे विस्कळीत झाले. आवश्यक धातूंचे साठे संपले. झारकालीन शासकीय अधिकारी असहकार करीत होते. त्यामुळे बोल्शेविकांनी क्रांतीकाळात दिलेल्या वचनांची पूर्ती होत नाही असे दिसताच जनतेचा साम्यवादावरील विश्वास हळूहळू डळमळू लागला.

**नवे आर्थिक धोरण (New Economic Policy-NEP) (१५ मार्च १९२१) :**

सोव्हियत शासनाविरूद्धच्या असंतोषाचे मूळ कारण नष्ट करण्याच्या हेतूने १५ मार्च १९२१ मध्ये कम्युनिस्ट पक्षाच्या १० व्या परिषदेत लेनिनने नव्या आर्थिक धोरणाचा कार्यक्रम मांडला. लेनिनची नवी आर्थिक नीति म्हणजे समाजवादी आणि खाजगी अर्थव्यवस्था यांत घडवून आणलेली तडजोड होती. शेतकरी, कामगार व मध्यमवर्गीय यांच्यासंबंधी सोव्हियत शासनाने आखलेल्या धोरणात नव्या आर्थिक धोरणामुळे मोठ्या प्रमाणात बदल होणार होते. नव्या आर्थिक धोरणामुळे भांडवलशाही अर्थव्यवस्थेपुढे शरणागती पत्करल्या प्रमाणे होईल असे वाटून पोथीनिष्ठ जहाल डाव्या सदस्यांनी त्याला विरोध करण्याचा प्रयत्न केला. मात्र, लेनिनने आपल्या प्रभावी मांडणीने त्यांना वास्तववादाचे भान देऊन त्यांचा विरोध मोडून काढला. रशियातील तत्कालीन परिस्थिती विचारात घेता काही काळाकरिता सीमित भांडवलशाही अर्थव्यवस्था मान्य करण्याशिवाय गत्यंतर नसल्याचे लेनिनने पक्षाच्या दहाव्या परिषदेच्या लक्षात आणून दिले नवे आर्थिक धोरण म्हणजे क्रांतीशी द्रोह नसून संक्रमणाची अवस्था असल्याची मांडणी लेनिनने केली. लेनिनच्या नव्या आर्थिक धोरणानुसार संपूर्ण धान्य वसुलीची पद्धत रद्दबातल करण्यात येऊन त्याऐवजी सरकारने शेतकऱ्यांवर ठराविक कर बसविला हा कर शेतकऱ्याने सरकारला रोख पैशाच्या स्वरूपात अथवा धान्याच्या स्वरुपात द्यायचा होता. हा कर चुकता करून राहिलेले उत्पादन हे

शेतकरी खुल्या बाजारात विकू शकतो. अशी तरतूद करण्यात आली. जमिनीची मालकी ही सरकारची राहिली आणि जमीन फक्त कसण्याकरिता शेतकऱ्याना देण्यात आली.

औद्योगिक क्षेत्रात देखील नव्या आर्थिक धोरणामुळे बरेच बदल घडून आले साम्यवादी तत्वानुसार मोठे आणि आवश्यक उद्योग हे सरकारच्या मालकीखाली ठेवण्यात आले. या उद्योगाचे एकूण उद्योगधंद्यातील प्रमाण ८५ टक्के इतके होते. त्याचप्रमाणे एकूण कामगारांपैकी ८० टक्के कामगार हे याच मोठ्या उद्योगधंद्यात काम करत होते. या मोठ्या उद्योगधंद्यांच्या व्यवस्थापनासाठी विश्वस्त संघ नेमण्यात आले. ज्यात सरकारनियुक्त अनुशासक मंडळ आणि प्रबंधक काम पाहतील, अशी व्यवस्था करण्यात आली. वीस किंवा त्यापेक्षा कमी कामगार असलेल्या छोट्या उद्योगाचे राष्ट्रीयकरण रद्द करण्यात येऊन ते खाजगीरित्या किंवा सहकारी संस्थांच्या माध्यमातून चालवण्याची मोकळीक दण्यात आली. उद्योगांना लागणारा कच्चा माल हा खुल्या बाजारातून विकत घ्यावा आणि कामगारांना त्याच्या कामानुसार वेतन देण्यात यावे असे निश्चित केले. खुल्या बाजारातील खरेदी विक्रीमुळे चलनाची आवश्यकता भासू लागली. कृषी, उद्योग व व्यापार यांच्या विकासाकरिता नोव्हेंबर १९२१ मध्ये स्टेट बैंक उघडण्यात आली. जुने चलन रद्द करून स्टेट बँकेला चलन काढण्याचे अधिकार देण्यात आले. अल्पकालीन आणि दीर्घकालीन भांडवल पुरवण्याचे अधिकार देखील या बँकेला मिळाले. या बँकेच्या शंभरच्यावर शाखा वर्षभरात उघडल्या गेल्या. खुल्या बाजारपेठा सुरु झाल्याने व उपभोक्त्यांनी त्या बाजारातून माल विकत घ्यावयाचा असल्याने सरकारी वितरण पद्धती बंद करण्यात आली. सहकारी संस्थाना मोठ्या प्रमाणात प्रोत्साहन देण्यात आल्यामुळे लक्षावधी शेतकरी कृषी सहकारी सस्थामध्ये सामील झाले.

**नव्या आर्थिक धोरणाचे परिणाम :**

नवीन आर्थिक धोरण लागू झाल्यानंतर, कृषी उत्पादनात मोठ्या प्रमाणात वाढ झाली. आर्थिक वाढीला चालना देण्यासाठी, बोल्शेविकांनी शेतकऱ्यांना त्यांच्या पिकांचा काही भाग सरकारला आर्थिक भरपाईच्या बदल्यात विकण्याची संधी दिली. शेतकऱ्यांना आता त्यांच्या काही उत्पादनांची विक्री करण्याचा पर्याय होता, ज्यामुळे त्यांना अधिक धान्य उत्पादन करण्यासाठी वैयक्तिक आर्थिक प्रोत्साहन मिळाले. या प्रोत्साहनामुळे, अर्ध-सरंजामी जमीनदारांच्या विघटनासह, कृषी उत्पादन क्रांतीपूर्वीच्या पातळीपेक्षा जास्त झाले. कृषी क्षेत्र लहान कुटुंब-शेतींवर अधिकाधिक अवलंबून झाले, तर जड उद्योग, बँका आणि वित्तीय संस्था राज्य-मालकी आणि नियंत्रणाखाली राहिल्या. यामुळे अर्थव्यवस्थेत संतुलन निर्माण झाले. कृषी क्षेत्र जड उद्योगांपेक्षा खूप वेगाने वाढू लागले. त्यांचे उत्पन्न टिकवून ठेवण्यासाठी कारखान्यांनी किंमती वाढवल्या. उत्पादित वस्तूंच्या वाढत्या किमतीमुळे, शेतकऱ्यांना या ग्राहकोपयोगी वस्तू खरेदी करण्यासाठी जास्त गहू उत्पादन करावे लागले, ज्यामुळे पुरवठा वाढला आणि त्यामुळे कृषी उत्पादनांच्या किमती कमी झाल्या. कृषी वस्तूंच्या किमतीत झालेली ही घसरण आणि औद्योगिक उत्पादनांच्या किमतींमध्ये झालेली तीव्र वाढ याला ट्रॉटस्कीने " कात्री संकट " असे नाव दिले. शेतकऱ्यांनी जास्त किमती मिळतील या अपेक्षेने त्यांचे अधिशेष रोखून ठेवण्यास सुरुवात केली. कम्युनिस्ट पक्षाच्या अनेक सदस्यांना हे शहरी ग्राहकांचे शोषण वाटले. ग्राहकोपयोगी वस्तूंच्या किमती कमी करण्यासाठी, राज्याने महागाई कमी करण्यासाठी उपाययोजना केल्या आणि

कारखान्यांच्या अंतर्गत पद्धतींमध्ये सुधारणा केल्या. कात्रीच्या परिणामाला आळा घालण्यासाठी सरकारने किंमती देखील निश्चित केल्या.

**सोव्हिएत युनियनची स्थापना (Union of Soviet Socialist Republic-USSR) :**

लेनिनच्या नव्या आर्थिक धोरणानुसार देशाचे आर्थिक चित्र बदलू लागले. राजकीय परिवर्तन करण्यास ही योग्य वेळ आहे असे पाहून लेनिनने १९२२ मध्ये देशाच्या मूलभूत घटनात्मक कायद्यात सुधारणा घडवून आणल्या. ३० डिसेंबर १९२२ साली रशियन प्रजासत्ताकाच्या पहिल्या परिषदेत पक्षाचा चिटणीस जोसेफ स्टॅलिन याने मूलभूत कायद्यांसंबंधी पहिला प्रस्ताव जाहीर केला, लेनिनने त्यास मान्यता दिली. सोव्हिएत रशियातील सर्वच गणराज्य ६ जुलै १९२३ रोजी एकत्रित करून 'युनियन ऑफ सोव्हिएत सोशलिस्ट रिपब्लिक' (USSR) ची नवीन घटना तयार करण्यात आली. या विस्तृत संघराज्यात १७ स्वायत्त गणराज्य आणि अल्पसंख्यांक राष्ट्र गटांचा अंतर्भाव होता. या संघराज्यात युक्रेन, व्हाईट रशिया, ट्रान्सकॉलेशिया, जॉर्जिया, अर्मिनिया व अझर्वेझानया इ. गणराज्याचा समावेश होता. या संघात एक वर्षानंतर मध्य आशियातील उजबेकिस्तान, तुर्कमेनिया, तजाकिस्थान, कझाकिस्थान व किर्गिझिया ही राष्ट्र समाविष्ठ झाली. परंतु ट्रान्स कॉकेशिअस मधील जॉर्जिया, अर्मेनिया, अझरबैजन ही गणराज्य वेगळी करण्यात आली. ही सर्व ११ गणराज मिळून 'युनियन ऑफ सोव्हिएत सोशलिस्ट रिपब्लिक' ची स्थापना झाली. या संघराज्यामुळे सर्व प्रकारचे प्रांतीय भेद नष्ट झाले. सर्व घटक राज्यांकरिता समान परराष्ट्र धोरण, परराष्ट्र व्यापार, आर्थिक नियोजन, लष्करी दिवाणी व फौजदारी विधिनियम, शिक्षण, आरोग्य इत्यादी बाबतीत एकसंध धोरण मंजूर करण्यात आले. सर्वोच्च अधिकार कार्यकारी समितीकडे सोपविण्यात आले. ही समिती १९ सभासदांचे एक प्रेसिडियम स्वरूप (Presidium) निवडली गेली आणि कार्यकारी सत्ता मंत्रिमंडळाच्या हाती ठेवण्यात आली.

**लेनिनचे निधन :**

लेनिनला आपल्या नव्या आर्थिक धोरणाचा परिपाक पूर्णतः पहाण्याची संधी दुर्दैवाने लाभली नाही. १९१७ साली बोल्शेव्हिक पक्षाने सत्ता हाती घेतल्यापासून पक्षनेता व अध्यक्ष या नात्याने लेनिनने अविस्मरणीय अशी कामगिरी केली आहे. देशाला संकटाच्या खाईतून वाचविण्यासाठी त्याला अविश्रांत मेहनत करावी लागल्यामुळे त्याच्या प्रकृतीवर त्याचा अधिक परिणाम झाला. १९१८ मध्ये एका माथेफिरूने त्याचा गोळी घालून खून करण्याचा प्रयत्न केला होता. १९२२ पासून त्याची प्रकृती ढासळू लागली आणि गॉर्की येथे २१ जानेवारी, १९२४ रोजी सकाळी ६ वाजून ५० मिनिटांनी मेंदूतील रक्तस्त्रावामुळे त्याचा दुःख अंत झाला. २१ जानेवारीच्या रात्री साम्यवादी पक्षाच्या केंद्रीय समितीने लेनिनला अत्यंत भावपूर्ण शब्दांत श्रद्धांजली वाहिली. पक्षाच्या केंद्रीय समितीने लेनिनला भावपूर्ण शब्दांत श्रद्धांजली वाहताना लेनिनच्या कार्याचे महत्त्व पुढील शब्दांत व्यक्त केले, "ज्याच्या नेतृत्वाखाली आपल्या पक्षाने लढाईच्या धुराने कुंद झालेल्या वातावरणात सबंध देशभर ऑक्टोबर क्रांतीचा लाल झेंडा खंबीर हाताने फडकाविला, शत्रूचा प्रतिकार उधळून लावला आणि पूर्वकालीन झारशाहीच्या रशियामध्ये राबणाऱ्या जनतेचे वर्चस्व प्रस्थापित केले तो पुरुष कालवश झाला आहे. कम्युनिस्ट इंटरनॅशनलचा संस्थापक, जागतिक

साम्यवाद्धचा नेता, आंतरराष्ट्रीय कामगार वर्गाचे प्रेमनिधान व अभिमानबिंदू, रशियन कामगारांच्या सर्वाधिकारी सत्तेचा अग्रणी नाहीसा झाला आहे." २३ जानेवारी रोजी लेनिनचा देह गॉर्कीतून मॉस्कोला आणण्यात आला आणि ट्रेड युनियन संघटनेच्या गृहातील स्तंभगृहात अंत्य दर्शनासाठी ठेवण्यात आला. पाच दिवसपर्यंत अहोरात्र कडक्याच्या धुक्याला न जुमानता लक्षावधी लोकांची महान लेनिनला अखेरचा निरोप देण्यासाठी स्तंभगृहात सतत रीघ लागली होती. २७ जानेवारी रोजी दुपारी ४ वाजता अंतयात्रा निघाली. क्रेमालिन राजबाड्याच्या तटाजवळ खास बांधण्यात आलेल्या समाधीगृहात त्याची शवपेटिका ठेवण्यात आली. मार्क्सवादाला व्यवहारवादाची जोड देण्याचे महान कार्य लेनिनने केले. लेनिनसारखा नेता रशियाला लाभला नसता तर राज्यक्रांतीनंतर साम्यवादाचा शेवटच झाला असता. रशियन जनतेचे अलोट प्रेम त्यास मिळाले. त्याच्या मृत्यूनंतर पेट्रोगार्ड शहराचे नामकरण लेनिनग्राड असे करण्यात आले. त्याच्या नेतृत्वाची स्मृती लोकांना कायम राहावी म्हणून त्याचा पार्थिव देह मॉस्कोच्या लाल चौकातील लेनिन स्मारकात ठेवला आहे व हे स्मारक रशियन लोकांसाठी आजही एक श्रद्धास्थान आहे.

## ४.५. सारांश :

रशियन क्रांती (१९१७–१९२७) ही केवळ एका सत्तांतराची घटना नव्हे, तर ती एक राजकीय, सामाजिक आणि आर्थिक परिवर्तनाची सुरुवात होती. झारशाहीच्या दडपशाहीविरुद्ध, असमानतेविरुद्ध आणि युद्धामुळे निर्माण झालेल्या दुःखांमुळे रशियन जनतेत असंतोष वाढत गेला. याच पार्श्वभूमीवर, १९१७ मध्ये दोन क्रांती झाल्या – फेब्रुवारी क्रांतीने झारचा अंत केला, तर ऑक्टोबर क्रांतीत बोल्शेविक पक्षाने सत्तेचा ताबा घेतला. या क्रांतीमधून सोव्हिएत संघराज्याची (USSR) स्थापना झाली. १९१७ ते १९२७ या दशकात नव्या राज्यघटनेची मांडणी, कामगार-किसान सत्तेचे बळकटीकरण, आणि भांडवलशाहीविरोधी साम्यवादी व्यवस्था निर्माण झाली. हा कालखंड रशियाच्या सामाजिक आणि राजकीय पायाभरणीचा काळ ठरला. या सगळ्या क्रांतीमागे आणि राज्यपुनर्रचनेत व्लादिमीर लेनिन (१८७०-१९२४) यांचे महत्त्वपूर्ण योगदान होते. लेनिनने मार्क्सवादावर आधारित विचारधारा समाजात रुजवली. त्यांनी बोल्शेविक पक्षाची स्थापना करून जनतेला संघटित केले. "शांती, अन्न आणि जमीन" ही लेनिनची घोषणा क्रांतीची प्रमुख प्रेरणा ठरली. युद्धातून बाहेर पडण्यासाठी ब्रेस्त-लिटोव्ह्स्क तह केला, जमिनींचे पुनर्वाटप केले, नवीन आर्थिक धोरण (NEP) राबवले आणि राज्याची शक्ती केंद्रीत करून साम्यवादी पक्षाची अधिष्ठानभूत भूमिका निर्माण केली. त्याचे विचार, धोरण आणि नेतृत्वामुळे रशियन राज्यक्रांती यशस्वी झाली आणि आधुनिक साम्यवादी राज्याचा पाया रचला गेला.

## ४.६. प्रश्न :

४. रशियन क्रांतील महत्वपूर्ण घटनांची चर्चा करा.

२. लेनिन वर टिपण लिहा.

३. नवीन आर्थिक धोरण यावर सविस्तर लिहा.

## ४.७. संदर्भ सूची :

१. रशियाच्या विकासातील स्टॅलिन याच्या योगदानावर भाष्य करा.

२. रशियाच्या आर्थिक विकासातील पंचवार्षिक योजनांचे महत्व विशद करा.

३. दुसऱ्या महायुद्धातील रशिया-जर्मन संघर्षावर चर्चा करा.

४. पॉट्सडॅम परिषदेवर टिपण लिहा.

५. दुसऱ्या महायुद्धकालीन रशियामधील युद्धजन्य परिस्थितीचा मागोवा घ्या.

**संदर्भ :**

१. कदम य. ना. आधुनिक जग: भाग-२, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २०१०.

२. वैद्य सुमन, आधुनिक जग भाग-१, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती, १९९७.

३. गायकवाड आर. डी., कदम य. ना., थोरात डी. डी., आधुनिक जगाचा इतिहास : भाग-२, १९२०-१९७५, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, १९९७.

४. कोलारकर श. गो., युरोप (१७८९-१८७०) आधुनिक युरोप (१८७१-१९६५), श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, २००५.

५. गाठाळ एस. एस., आधुनिक जागतिक इतिहासातील स्थित्यंतरे, कैलास प्रकाशन, औरंगाबाद, २०१५.

६. गाडगीळ पां. वा., रशियातील राज्यक्रांती, प्रकाशक : यशवंत गोपाळ जोशी, पुणे.

७. जोशी पी. जी., विसाव्या शतकाचा इतिहास, विद्या प्रकाशन, नागपूर, २००३.

८. तळवलकर गोविंद, सोव्हिएत साम्राज्याचा उदय व अस्त खंड:१ व २, मौज प्रकाशन गृह, पुणे, १९९८.

९. उदगावकर म. न., राऊत गणेश, आधुनिक जग, डायमंड पब्लिकेशन, पुणे, २००८.

❖❖❖❖

# ५

# जोसेफ स्टॅलिन (१९२७-५३)
# दुसरे महायुद्ध व सोव्हिएत संघ (१९३९-४५)

**प्रकरण रचना**


५.१ उद्दिष्टे

५.२ प्रस्तावना

५.३ जोसेफ स्टॅलिन (१९२७-५३)

५.४ दुसरे महायुद्ध व सोव्हिएत संघ (१९३९-४५)

५.५ सारांश

५.६ प्रश्न

५.७ संदर्भ सूची


## ५.१ उद्दिष्टे :

१. जोसेफ स्टॅलिनचे पूर्वचरित्र जाणून घेणे.
२. जोसेफ स्टॅलिनच्या कार्यकाळातील विविध घटनांचा अभ्यास करणे.
३. जोसेफ स्टॅलिनच्या नेतृत्वाखालील सोव्हिएत रशियाचा आर्थिक विकास जाणून घेणे.
४. दुसऱ्या महायुद्धकालीन सोव्हिएत रशियातील राजकीय घडामोडींचा आढावा घेणे.

## ५.२ प्रस्तावना :

लेनिन च्या मृत्यूनंतर स्टॅलिन व ट्रॉटस्की यांच्यामध्ये सत्तास्पर्धेला सुरुवात झाली. दोघांच्या साम्यवादी विचारसरणीमध्ये तफावत असल्याने दोघांमधील वितुष्ट कमालीचे वाढले. यातूनच पुढे स्टॅलिनने लेनीनच्या मृत्युनंतर सत्तेवर आल्यावर ट्रॉटस्कीला सरकारमधून काढून टाकले. एवढेच नाही तर त्याला रशियातून हद्दपार करून रशियात स्वतःचे सरकार स्थिरस्थावर केले. स्टॅलिनने पक्षातील इतर व्यक्तींचा विरोध मोडून कडून पक्षशुद्धीची मोहीम यशस्वी केली. या काळात कम्युनिस्ट पक्षा व्यतिरिक्त कोणताही दुसरा राजकीय पक्ष नव्हता. अन्य कोणत्याही संघटना नव्हत्या. पक्षाचा प्रमुख स्टॅलिन, सैन्य पोलीस प्रचार यंत्रणा व पक्षाचे सदस्यत्व हे सर्व त्यांच्या हाती केंद्रित झाले होते. सोव्हिएत रशियातील सर्वेसर्वा म्हणजे स्टॅलिन गणला जाऊ लागला. पाश्चिमात्य राष्ट्रांचे विचार सोव्हिएत सरकारबाबत सुरुवातीपासूनच अविश्वास, द्वेष, धास्ती अशा. प्रकारचे होते. सोव्हिएत सरकारमुळे भांडवलशाही राष्ट्रांना धोका निर्माण झाला आहे, अशी खात्री पाश्चिमात्य राष्ट्रांची होती. तर सोव्हिएत रशियाला यादवी युध्दाच्या काळातील परकीय

हस्तक्षेप यामुळे रशियन नेत्यांच्या मनात पाश्चिमात्य राष्ट्रांविषयी अविश्वास निर्माण झाला होता. रशियाची सर्व सूत्रे स्टॅलिनने आपल्या हाती घेतल्यावर देशाचा आर्थिक विकास झपाट्याने करण्यासाठी पंचवार्षिक योजनांचे आयोजन करून रशियाला जागतिक महासत्ता बनविण्याचे महान कार्य स्टॅलिनने केले.

## ५.३ जोसेफ स्टॅलिन (१९२७ ते १९५३) :

### जोसेफ स्टॅलिनचा पूर्ववृतान्त :

जोसेफ स्टॅलिन याचा जन्म जॉर्जिया प्रांतातील गोरी या गावी एका सामान्य कुटुंबात १८ डिसेंबर, १८७८ साली झाला. स्टॅलिन यांचे वडील व्यवसायाने चांभार होते. तर आई एकातेरिना जॉर्जियायेव्हाना या गृहिणी होत्या. स्टॅलिन याचे पूर्ण नाव 'जोसेफ व्हीसारीओनोविक जुगाश्विली जोसेफ स्टॅलिन' असे होते. स्टॅलिन या शब्दाचा अर्थ 'पोलाद' असा होतो. त्याला चार भावंडे होती. त्यापैकी तीन भावंडे दारिद्र्य व रोगराईमुळे लहानपणीच दगावली. त्याच्या आईने जोसेफच्या त्याला धर्मसंस्थेत शिक्षण घेऊन धर्मोपदेशक बनावे, या हेतूने त्याला चर्च मिशनरीमध्ये शिक्षणास पाठविले. त्याला वयाच्या सहा वर्षानंतर 'तिफ्लीस' येथील धर्मशास्त्रीय उच्च शिक्षण केंद्रात पाठविण्यात आले. या ठिकाणी स्टॅलिनने पाच वर्ष शिक्षण घेतले. या काळात जोसेफ स्टॅलिन याने हुशार व चाणाक्ष विद्यार्थी म्हणून नावलौकिक मिळवला. त्याचा ओढा हा क्रांतिकारक घटनांकडे जास्त असल्याने स्टॅलिनमध्ये बंडखोर प्रवृती वाढली. शिक्षण सोडून क्रांतिकारी संघटनेशी त्याचे संबंध असल्याचे लक्षात येताच १८९८ मध्ये स्टॅलिनला या संस्थेतून बाहेर हाकलण्यात आले. त्याच्या सखोल वाचनामुळे सन १९०० पर्यंत स्टॅलिन मार्क्सवादाचा कट्टर समर्थक बनला होता. सन १९०२ मध्ये एका संपात सहभागी झाल्याचा आरोपवरून त्यास अटक झाली. अठरा महिन्यांचा कारावासाची शिक्षा भोगण्याकरिता त्यास सैबेरियात हद्दपार करण्यात आले होते. स्टॅलिनने 'रशियन सोशल डेमोक्रेटिक लेबर पक्षाचे' सभासदत्व पत्करून सन १९०३ मध्ये बोल्शेविक गटात सामील झाला. सन १९०४ नंतरच्या दशकातील त्याचे जीवन म्हणजे निरनिराळ्या नावाखाली अविरत चाललेले भूमिगत क्रांतिकार्य होते. अशाच एका प्रसंगी त्याने स्वीकारलेल्या 'स्टॅलिन' या नावाने तो त्यानंतर ओळखला जाऊ लागला. याच काळात सुमारे दहा वर्षे भूमिगत राहून आपले नाव व वेश बदलून आपले क्रांतिकार्य सुरूच ठेवले. त्याच्या या क्रांतीकार्याबद्दल त्यास एकूण आठ वेळा पकडण्यात आले. त्यापैकी सात वेळा त्यास हद्दपारीची शिक्षा ठोठावण्यात आली. सन १९०५ साली पहिल्यांदा स्टॅलिन याची लेनिनशी भेट झाली. मार्क्सवादावरील लेनिनच्या लिखाणामुळे स्टॅलिन अत्यंत प्रभावी झाला होता. सन १९१२ मध्ये स्टॅलिनला बोल्शविक पक्षाच्या केंद्रीय समितीचा सदस्य म्हणून पक्षात महत्त्वाचे स्थान देण्यात आले. सन १९१३ पर्यंत लेनिनचा सहकारी म्हणून ट्रान्स कॉकेशिया या भागात क्रांतिकारकांच्या गुप्त संघटनेचे कार्य त्याने केले. सन १९१७ मध्ये रशियात झालेल्या क्रांतीच्या वेळी स्टॅलिन हद्दपारीची शिक्षा भोगत होता. समाजवादाच्या दबावापुढे सैबेरियात असलेल्या कैद्यांची सुटका करण्यात आली होती. सन १९१७ मध्ये प्रथमच अनौपचारिकपणे प्रस्थापित झालेल्या पक्षाच्या पॉलिटब्युरोचा स्टॅलिन सदस्य झाला. सन १९१७ मध्ये 'प्रवदा' या पक्षाच्या मुखपत्रात संपादक म्हणून काम करण्यास त्याने सुरुवात केली.

नोव्हेंबर १९१७ मध्ये स्थापन झालेल्या रशियात सोव्हिएत सरकारमध्ये स्टॅलिनची मंत्रिमंडळात अल्पसंख्याक मंत्री म्हणून नेमणूक करण्यात आली होती. सन १९१८ मध्ये सोव्हिएत रशियात यादवी युद्ध काळात स्टॅलिनला संरक्षण समितीचा व मंत्रीमंडळाच्या कार्यकारी समितीचा सदस्य म्हणून नियुक्त करण्यात आले होते. परकीय सैन्याच्या विरुद्ध झारीस्तीन भागाचा बचाव करण्याची जबाबदारी स्टॅलिनवर सोपवण्यात आली होती. त्यांनी या जबाबदारीत झारीस्तीनवर मिळविलेल्या विजयाचा गौरव म्हणून या शहराचे नाव 'स्टॅलिनग्राड' असे नामकरण करण्यात आले होते. सन १९१९ मध्ये स्थापन झालेल्या थर्ड इंटरनॅशनलच्या 'कोमिन्टर्न' या पक्षाच्या संस्थापक सदस्यांपैकी स्टॅलिन हा एक सदस्य होता. सन १९१९ मध्ये कामगार शेतकरी निरीक्षक मंत्री म्हणून स्टॅलिनची नेमणूक करण्यात आली. १९२२ मध्ये स्टॅलिनला सोव्हिएत युनियनच्या कम्युनिस्ट पक्षाचे महासचिव पद देण्यात आले होते. लेनिननतर सोव्हिएत संघाचे नेतृत्व ट्रॉटस्की किंवा स्टॅलिन याच्यापैकी कोणाकडे द्यावे असा प्रश्न उपस्थित झाला होता. लेनिनच्या मृत्यूच्या काळात स्टॅलिनने पक्षावर आपली भक्कम पकड बसवली होती त्यामुळेच स्टॅलिन सोव्हिएत संघाचा राष्ट्राध्यक्ष झाला. सन १९२८ ते १९५३ पर्यंत सोव्हियत संघाचे नेतृत्व स्टॅलिनकडे होते. स्टॅलिनने अवघ्या २५वर्षाच्या काळात राष्ट्राची पुनः उभारणी केली. त्यामुळे सोव्हियत रशिया जागतिक महासत्ता म्हणून उदयास आला.

**स्टॅलिन व  ट्रॉट्स्की सत्तासंघर्ष :**

लेनिनच्या काळापासूनच साम्यवादी पक्षातील लिओ ट्रॉट्स्की व जोसेफ स्टॅलिन यांच्यात मतभेदाला सुरुवात झाल्याने त्याचे पर्यवसान उघड सत्तास्पर्धेत होणार असल्याची लक्षणे दिसू लागली होती. जानेवारी १९२४ मध्ये लेनिनचे निधन झाल्याने पक्षांतर्गत मतभेद व संघर्ष यांना वाचा फुटली. त्यांच्यात प्रथमपासूनच व्यक्तित्वाचा व राजकीय मतांचा संघर्ष होता. युक्रेनमध्ये एका ज्यू कुटुंबात जन्माला आलेला ट्रॉट्स्की हा साम्यवादाचा अत्यंत कडवा उपासक व क्रांतीचा आग्रही पुरस्कर्ता होता. विद्यापीठीय शिक्षण घेतलेल्या, अत्यंत चोखंदळ व बुद्धिवान ट्रॉट्स्कीची एका उत्तम लेखक व प्रभावी वक्ता म्हणून गणना होत होती. स्टॅलिन हा धर्मसंस्थेत शिक्षण घेतलेला  असल्याने स्वभावाने तो तत्वनिष्ठ व धर्मनिष्ठ होता. स्टॅलिन व ट्रॉट्स्की यातील कटुता उभयबाजूंनी सारखीच तीव्र होती. ट्रॉट्स्कीला लेनिनचे नवे आर्थिक धोरणच सर्वस्वी नापसंत होते. लेनिनच्या हयातीत तो उघड विरोध करू शकला नाही. परंतु लेनिनच्या मृत्यूनंतर मात्र सुखवस्तु जमीनदारांचे दमन करून मजूरांना महत्व दिले जावे, मजूर-संघटनांच्या हाती जास्त सत्ता दिली जावी असा त्याने आग्रह धरला. परंतु मजूरांच्या हितसंबंधांना महत्व देण्याला स्टॅलिनचा विरोध नव्हता. मतभेदाचा दुसरा मुद्दा होता तो असा की, रशियाची प्रगती त्वरेने साधावयाची असेल तर त्याकरता परकीय भांडवलाचीही मदत गरजेनुसार घ्यावी असे स्टॅलिनचे मत होते, तर ट्राट्स्कीला तो साम्यवादी तत्वप्रणालीशी तडजोड मान्य नव्हती. तिस-या मुद्याबाबत तर दोघात असलेल्या मत-भेदाचे स्वरूप जास्त तीव्र होते. जगात साम्यवादी कांती घडून आणून सर्व जगातील भांडवलशाहीचे समूळ उच्चाटन झाल्याशिवाय एकट्या रशियात साम्यवादाचा प्रयोग कधीच यशस्वी होऊ शकणार नाही असे ट्रॉट्स्कीचे मत होते. स्टॅलिनचा ह्या विचारांना पूर्ण विरोध होता. रशियातील बोल्शेविक क्रांती कायम टिकविल्याशिवाय इतर ठिकाणी क्रांतीचा विचार करणे योग्य नाही असे स्टॅलीनला वाटत होते. स्टॅलिनने लेनीनचीच विचारसरणी उचलून धरली होती. स्टॅलिनचा युक्तिवाद जास्त व्यवहार्य व दूरदर्शी होता. स्टॅलिन व ट्रॉटस्की

संघर्ष साधारणतः दोन वर्ष चालला व या संघर्षात शेवटी स्टॅलीनचा विजय झाला. लेनीनच्या मृत्युनंतर सत्तेवर आल्यावर ट्रॉटस्कीला सरकारमधून काढून टाकण्यात आले. १९२५ च्या प्रारंभी परराष्ट्र व युद्धमंत्र्याच्या पदावरून आणि त्याचबरोबर कामगार व संरक्षण समितीतूनही ट्रॉट्स्कीची हकालपट्टी करण्यात आली. तसेच कामेनोव्ह व झिमोनोव्ह या त्याच्या अनुयायांनाही सरकरमधून दूर करण्यात आले. पक्षनिर्णयापुढे मान न तुकविण्याच्या ट्रॉटस्कीच्या वृत्तीमुळे १९२७ मध्ये त्याला पक्षातूनही हद्दपार करण्यात आले. १९३७ पर्यंत युरोपच्या निरनिराळ्या राष्ट्रांत विजनवास भोगून शेवटी तो मेक्सिकोत स्थायिक झाला. पुढे २४ मे १९४० रोजी त्याचा हस्तकांकडून खून घडवून आणला गेला. पुढे स्टॅलिनने या खुनात आपला हात नसल्याचे जाहीर केले.

**१९३६ ची नवी राज्यघटना :**

'ऑल रशियन ऑफ सोविएत' च्या मार्गदर्शनाखाली शासकीय व राजकीय यंत्रणेवर प्रत्यक्षपणे जनतेचे नियंत्रण असावे या दृष्टीने ६ फेब्रुवारी १९३५ मध्ये पंतप्रधान मोलोटोव याने नवीन राज्यघटनेचा मसुदा तयार केला. त्यानुसार घटनादुरुस्तीचे स्वरूप निश्चित करण्याकरता स्टॅलिनच्या अध्यक्षतेखाली एका घटना समितीची नियुक्ती केंद्रीय कार्यकारी मंडळाने केली. या समितीने तयार केलेल्या घटनेला ५ डिसेंबर १९३६ मध्ये मान्यता देण्यात आली. या घटनेनुसार 'ऑल रशियन काँग्रेस ऑफ सोविएत' विसर्जित करून त्याऐवजी सोवियत रशियाचे सर्वोच्च कायदेमंडळ म्हणून 'सुप्रीम सोविएत'ची निर्मिती करण्यात आली. 'कौन्सिल ऑफ युनियन' व 'कौन्सिल ऑफ नॅशनॅलिटी' असे ते द्विगृही कायदेमंडळ होती. कोणत्याही विधेयकाला कायद्याचे स्वरूप येण्याकरता दोन्ही गृहांची बहुमत संमती आवश्यक असे. प्रत्येक युनियन गणराज्याचे २५, प्रत्येक स्वायत्त गणराज्याचे ११, प्रत्येक स्वायत्त प्रांताचे ५ तर प्रत्येक प्रादेशिक क्षेत्राचा १ असे प्रतिनिधी 'कौन्सिल ऑफ नॅशनॅलिटी' मध्ये असत. 'कौन्सिल ऑफ युनियन' च्या प्रतिनिधित्वाच्या प्रमाणात व मतदानाच्या पद्धतीत महत्वाचे बदल करण्यात आले. पूर्वीच्या घटनेनुसार शहर विभागात दर २५००० ला एक तर ग्रामीण विभागात दर १२५,००० ला एक, असे प्रतिनिधित्व होते. नव्या घटनेनुसार दर ३ लक्षाला एक असे प्रमाण दोन्ही विभागात सारखेच लागू करण्यात आले. प्रत्यक्ष व गुप्त मतदानाची पद्धती सुरू करण्यात आली. २३ वर्षावरील कोणत्याही व्यक्तीला उमेदवार म्हणून निवडणुकीला उभे राहण्याचा अधिकार होता. १८ वर्षे वयावरील सर्व स्त्री-पुरुषांना मतदानाचा अधिकार देण्यात आला. पूर्वीच्या घटनेनुसार मतदानाचा अधिकार नाकारण्यात आलेलेल्या अमीर उमराव, चर्चचे अनुयायी व प्रतिक्रांतीकारक यांना मतदानाचा अधिकार देण्यात आला. तसेच उमेदवार म्हणून निवडणुका लढविण्याचा अधिकारही त्यांना देण्यात आला. वंश धर्म, पंथ किवा आर्थिक दर्जा या आधारावर कोणताही भेदभाव न ठेवता सर्वांना समान अधिकाराची हमी देण्यात आली. नागरिकांचे आर्थिक व राजकीय हक्क आणि त्याचबरोबर कर्तव्ये नमूद करण्यात आली. तसेच मुद्रण, भाषण व सभा स्वातंत्र्य, एवढेच नव्हे तर घटक राज्याबा संघराज्यांतून फुटुन निघण्याचा अधिकारही तत्वतः मान्य करण्यात आला. या घटनेच्या लोकशाही स्वरूपाची ग्वाही वारंवार देण्यात आलेली असली तरी अमेरिका किवा ब्रिटनसारख्या राष्ट्रांत रूढ झालेल्या लोकशाहीपेक्षा रशियातील लोकशाहीचे स्वरूप फार भिन्न होते. एक पक्ष पद्धतीमुळे साम्यवादी पक्ष, आणि मजूर संघटना, सहकारी संस्था व अशा पक्षांच्या सहवर्ती संस्थांकडूनच उमेदवार उभे केले जात. त्यामुळे निवड करण्याचा

प्रश्नच मतदारांपुढे विशेष उद्भवत नसे. या घटनेनुसार अस्तित्वात आलेल्या पहिल्या सुप्रीम सोविएतच्या एकूण ११४३ सदस्यापैकी ८५५ सदस्य रशियाच्या साम्यवादी पक्षाचे सदस्य व कार्यकर्ते होते.

**आपली प्रगती तपासा.**

१. स्टॅलिनच्या जीवन वृत्तांतावर टिपण लिहा.
२. स्टॅलिनची राज्यघटना यावर भाष्य करा.

**स्टॅलिनची पक्षशुद्धीची मोहीम :**

सोव्हिएत रशियातील सन १९३४-१९३७ या काळातील सोव्हिएत सरकारने केलेली पक्षशुध्दी ही त्या दशकातील महत्त्वपूर्ण घटनांपैकी एक महत्त्वाची मानली जाते. या पक्षशुध्दी मोहिमेची कारणे तत्कालीन आंतरराष्ट्रीय परिस्थिती व त्यामुळे सोव्हिएत रशियाला भेडसावणारे संकटे या सर्व गोष्टींचा संबंध पक्षशुध्दी घटनेशी होता. स्टॅलिन, मालोटॉँव इत्यादीना रशियातील शत्रूंना हद्दपार करण्यासाठी अत्यंत निघृण उपाय केले पाहिजेत ही त्यांची भूमिका होती. यासाठी स्टॅलिनला त्याच्या पदावरून पदच्युत करण्याची हाक रिउतीन याने दिली. यामुळेच स्टॅलिनने आपला सहकारी किरोवच्या मदतीने रिउतीन याला पक्षातून बाहेर काढले. यावरून पक्षात शुध्दीकरणाची आवश्यकता असल्याचे केंद्रीय समितीने मान्य केले. सन १९३३-१९३४ या दोन वर्षात ११ लक्ष ४० हजार सदस्य पक्षातून बाहेर काढण्यात आले. साम्यवादी पक्षाने फुटीर किंवा विरोधी गट व पक्षाच्या निर्णयाविरुध्द प्रचार करणाऱ्यांना बेकायदेशीर ठरवले. पक्षात राहून ट्रॉटस्की, कोमोनेव, झिनोविव यांच्या कारवाया या पक्षाचा विरोधी आहे असे पक्षाच्या निदर्शनात आल्याने पुढील विरोधांना सामोरे जाण्यासाठीही पक्षशुध्दी करण्यात आली होती. सन १९३४ मध्ये 'कम्युनिस्ट युथ' संघटनेचा सदस्य असलेला लीनोविद निकोत्सेव याने १ डिसेंबर १९३४ रोजी किरोवची हत्या केली. यापूर्वीही अनेक साम्यवादी नेत्यांचा मृत्यू संशयास्पद स्थितीत घडून आला होता. ऑगस्ट १९३६ मध्ये झिनोविव, कोमेनेव व कटाचे आणखी ११ नेते यांचे खटले सुप्रीम कोर्टाच्या लष्करी कोर्टापुढे ठेवण्यात आले. या विरोधकांनी किरोव शिवाय स्टॅलिनच्या हत्येचाही कट रचला होता हे उघड झाले होते. झिनोविव, कोमेनेवसह अनेकांना देशद्रोहाच्या आरोपाखाली मृत्युदंडाच्या शिक्षा ठोठावण्यात आल्या, याचबरोबर परकीय सत्तांशी हातमिळवणी करून लष्करी व महत्वाच्या गुप्त बातम्या परकीयांना पुरविण्याच्या आरोपावरून मार्शल तुखाचवस्की व लाल लष्करातील सात अधिकाऱ्यांना कठोर शिक्षा दिल्या गेल्या.

या पक्षशुध्दी मध्ये १०३ जनरल व ८१ ॲडमिरल यांना मृत्यूदंड देण्यात आला. साम्यवादाला विरोध करणाऱ्या ३० लाख लोकांना सैबेरियातील गुलाग प्रांतात पाठवण्यात आले. त्यातील साडेसात लाख लोकांना मारण्यात आले. पक्षाच्या उच्च अधिकारीय मध्यवर्ती समितीत सन १९३४ मध्ये सभासदांची संख्या ७१ होती. सन १९३९ मध्ये ती २६ राहिली. त्यापैकी पक्षाविरुध्द कारवाया केल्याच्या आरोपांखाली नऊ सदस्यांना उघड फासी व बारा सदस्यांना पक्षातून बाहेर काढण्यात आले, तर २४ सदस्य कुठेतरी हरवले म्हणून सांगण्यात आले. सन १९३३ व ३४ या दोन वर्षात ११ लक्ष ४०,००० सदस्यांना पक्षाच्या बाहेर काढण्यात आले, त्यातील अनेकांना कारावासात टाकण्यात आले. केंद्रीय

समितीत मतदानाचा अधिकार असलेले १३९ सभासदांपैकी पुढील पाच वर्षांच्या आत त्यातील १०८ जणांची हत्या करण्यात आली. पॉलिट ब्युरोच्या सभासदांपैकी ५० टक्के सभासदांची चार वर्षात हत्या करण्यात आली. स्टॅलिनने किरोवच्या खुनाचे धागेदोरे उकलून काढण्याच्या निमित्ताने अटकसत्र सुरू केले. देशभर अनेक लोकांना अटक करून तुरुंगात घालून लगेच ठार मारण्यात आले. स्टॅलिनग्राड मधील लष्करी विद्यालयातील ३७ जणांना फाशी देण्यात आली. मॉस्कोत हा आकडा ३३ होता. किएव मेये या कट्टर स्टॅलिनवादी न्यायाधीशास उलरीख येथे पाठविण्यात आले. त्याने युक्रेनमधील २८ जणांना गोळ्या घालण्याच्या शिक्षा दिल्या. यातील अनेक जण लेखक होते. यांच्यावर सोव्हिएत सरकार विरुध्द परदेशात जाऊन कट केल्याचा आरोप होता.

**आर्थिक नियोजनाचा कार्यक्रम :**

**पहिली पंचवार्षिक योजना (१९२८-१९३२) :**

सन १९२८ च्या सुरुवातीला राष्ट्रीय नियोजन मंडळाने पहिली पंचवार्षिक योजना सादर करून 1 ऑक्टोबर १९२८ रोजी पहिल्या पंचवार्षिक योजना कार्यान्वित करणे सुरु केले. पहिल्या पंचवार्षिक योजनेची उद्दिष्टे ५. भांडवलशाहीचे समुळ उच्चाटन करणे, २. उद्योगधंदे यांचे राष्ट्रीयीकरण करणे, ३. औद्योगिकरणावर आधारित अर्थव्यवस्थेची उभारणी करणे, ४. उद्योगधंदे, दळणवळण, कृषी विकास व अवजड उद्योग धंद्यावर भर देणे, ५. विद्युत-रासायनिक धातू संशोधन उद्योगसंघ निर्माण करणे, ६. सामूहिक शेती पध्दती अमलात आणून कृषी उत्पादनात वेगाने वाढ करणे. ही उद्दिष्टे निर्धारित करण्यात आली होती. या पंचवार्षिक योजनेबद्दल जनतेला माहिती मिळावी यासाठी मोठ्याप्रमाणात जनजागृती करण्यात आली. पहिल्या पंचवार्षिक योजनेतकरिता ५१०० कोटी रुबल्स रशियाने खर्च केले. पंचवार्षिक योजना सिध्दीस नेण्याकरिता आवश्यक असलेले तंत्रज्ञ व यंत्रशास्त्रज्ञ पाश्चिमात्य राष्ट्रातून बोलवावे लागले. पहिल्या पंचवार्षिक योजनेनुसार सन १९३२ पर्यंत रशियात फार मोठ्या प्रमाणात उद्योगधंद्यांचा विकास घडून आला. त्याचबरोबर कृषी क्षेत्रातही क्रांती घडून आली. पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या अंतर्गत कृषी क्षेत्रात दोन पध्दती कार्यान्वित करण्यात आल्या. एक 'कलखोज' म्हणजे शेतकरी कुटुंबे एकत्रित येऊन सामूहिक प्रक्षेत्र तयार करत असत. तर दुसरी 'सवखोज 'म्हणजे प्रत्यक्ष सरकारद्वारा चालवण्यात येत असलेले प्रक्षेत्र होय. परंतु सामुदायिक शेतीला मोठ्याप्रमाणात विरोधास सामोरे जावे लागले.

सन ३१ डिसेंबर, १९३२ रोजी पहिल्या पंचवार्षिक योजनेची पाच वर्ष संपण्याच्या आठ महिने पूर्वीच योजना पूर्ण झाल्याची घोषणा सरकारने केली. पहिल्या पंचवार्षिक योजनेत ठरविलेली उद्दिष्टे जवळपास पूर्ण झाली होती. काही क्षेत्रात थोड्या प्रमाणात तफावत राहिली असली तरी योजना कल्पनेपलीकडे यशस्वी ठरली. १९३३ मध्ये मॅग्निटोगोरस्क विशाल पोलाद कारखाना उभारण्यात येऊन पोलाद उत्पादनाला प्रारंभ झाला. उरल व पश्चिम सैबेरियातील स्वयंपूर्ण ठरणाऱ्या उद्योगधंद्याचा पाया या कारखान्याने घातला गेला. कारंगदा व कुझनेस्त येथे फार मोठ्या प्रमाणावर कोळसा खाण कामाला प्रारंभ झाला. खार्कोव व स्टॅलिनग्राड येथे मोठ-मोठे ट्रॅक्टर्स, गोर्की, रोस्त्व, चेलीयाविन्स, स्तलीन्सक येथे कृषी क्षेत्राला लागणारी आवशक सामग्री, मॉस्को येथे बॉलबेअरिंग व रबर कारखाने सुरू

झाले. पंचवार्षिक योजनेच्या काळातला सर्वात महत्त्वपूर्ण व पूर्णत्वास गेलेला व रशियन जनतेला अभिमानास्पद वाटणारा एक मोठा प्रकल्प म्हणजे सन १९३२ मध्ये निपर नदीवरील प्रचंड धरण होय. यावर ९ लक्ष अश्वशक्तीचे जल विद्युत उत्पादक केंद्राच्या उभारण्याचे कार्य ऑक्टोबर १९३२ मध्ये पूर्ण झाले. रशियातील बेकारीचे उच्चाटन झाले. उत्तर कोलेशिअरमधील ग्रोन्जी पासून काळ्या समुद्रावरील तुआप्सेपर्यंत करण्यात आलेला खनिज तेल पाईपलाईन मार्ग तयार झाला. सन १९३० मध्ये ११०० मैल लांबीचा तुर्कस्थान सैबेरिया रेल्वे मार्ग तयार करण्यात आला.

**दुसरी पंचवार्षिक योजना (१९३३-१९३७) :**

दुसरी पंचवार्षिक योजना १ जानेवारी १९३३ रोजी घोषित करण्यात आली. या योजनेसाठी १४०० कोटी रुबल्स निधी उभारण्यात आला होता. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचे उद्देश ५. रशियातील औद्योगिक उत्पादन ४३ दशकोटी रुबल्स वरून ९३ दशकोटी रुबल्स पर्यंत वाढविणे, २. नव्या उद्योगधंद्याचे दृढीकरण करणे, ३. रेल्वेमार्ग बांधणे, ४. दैनंदिन उपयोगाच्या वस्तू निर्मितीवर विशेष भर देणे, ५.शहरी कामगारांच्या संख्येत वाढ झाल्याने त्यांच्याकरिता घरे, उद्याने, क्रीडांगणे, नाट्यगृह, सिनेमागृह अशा इमारती बांधणे ही उद्दिष्टे निश्चित करण्यात आली. काळात कुझनेत्स व सैबेरिया येथे उपलब्ध असलेल्या कोळसा आणि उरल विभागात असलेली खनिज द्रव्ये यांचा लोखंड-पोलाद उत्पादनाचा एक संकुल तयार केला. उरल पोलाद केंद्राजवळ कजाकस्थान, कारंगदा येथे येथे कोळशाचे समृध्द साठे सापडले. कुझनेत्स क्षेत्रात धातुशोधनाचे कारखाने उभारण्यात आले. अशाच प्रकारे ट्रॅक्टर, मोटारी, रेल्वे इंजिन, टबॉजनरेटर व अन्य यंत्रसामग्री निर्माण करण्याचे कारखाने मास्को, खाकॉव, स्टॅलिनग्राड, गोर्की, उफा, स्वर्दलोव अशा शहरातून सुरू झाले. मॉस्को येथील सुप्रसिध्द भुयारी मार्ग बाधण्यात आला. रशियाची पूर्व-पश्चिम टोके जोडणारा ट्रान्स सैबेरियन रेल्वे मार्गाला समांतर एक नवा लोहमार्ग पूर्ण केला गेला. तुर्कस्थानहून दक्षिणेकडे कोळसा घेऊन जाणाऱ्या ७०० मैल लांबीच्या रेल्वे मार्गाच्या कामाला सुरुवात झाली. स्टॅलिनने रशियातील शेतकऱ्यांना सामूहिक शेतीतील काही नियम शिथिल करून १९३५ मध्ये 'स्टॅलिन कोड' नावाची पद्धत सुरु केली. यानुसार जास्तीची जमीन लागवडीखाली आणावी, जमिनीची मालकी सरकारकडे असली तरी त्या जमिनीचा ताबा नेहमीसाठी 'कलखोजकडे' राहील, कलखोजच्या ताब्यामुळे सामूहिक श्रमशक्तीचा फायदा कलखोजलाच मिळणार, १/४ ते १ हेक्टर जमीन कलखोज मधील शेतकऱ्यांना खाजगी जमीन मिळवून देण्यात येईल, स्वकष्टाने स्व-इच्छित पिक काढावे व ते खुल्या बाजारात विकण्यास परवानगी देण्यात आली., शेतकऱ्यांना स्वतःसाठी एक-दोन गाय, ठराविक संख्येने डुक्करे, मेंढ्या, कोंबड्या इत्यादी पालन करण्याची अनुमती देण्यात आली.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेने मोठे यश सध्य केले. अवजड उत्पादन कारखाना, ट्रॅक्टर कारखाना इत्यादी मोठ्या कारखाण्याच्या उभारणीचे कार्य पूर्ण होऊन त्या कारखान्यातून उत्पादनाला सुरुवात झाली. सन १९३३च्या तुलनेत १९३४ मध्ये रेल्वे दळणवळण व मालाची ने-आण यात दहा टक्के वृध्दी झाली होती. दोनेत्स कोळसा क्षेत्राला जोडणारा रेल्वेमार्ग, तुर्कस्तानची महत्त्वाची उद्योगकेंद्र उरल क्षेत्राला जोडणारा तुर्कस्थान सैबेरिया रेल्वेमार्ग पहिल्या दोन वर्षातच तयार झाला. श्वेत समुद्र कालव्यांने बाल्टिक समुद्राला जोडणारी योजना सन १९३३ या वर्षीच पूर्ण झाली होती. दोन वर्षांनी ८० मैल लांबीच्या

मॉस्को बोल्गा कालव्याचे काम पूर्ण झाले. यामुळे मास्को या बंदराचा उपयोग सुरू झाला. हा जलमार्ग प्रवासी व माल यांच्या वाहतुकीच्या दृष्टीने फायदेशीर ठरला.

**तिसरी पंचवार्षिक योजना (१९३८-१९४१) :**

तिसरी पंचवार्षिक योजना सन १९३८ मध्ये घोषित करण्यात आली. या योजनेसाठी १९२०० रुबल्स निधी उभारण्यात आला होता. दुसऱ्या महायुद्धाच्या आगळीकेने आंतरराष्ट्रीय परिस्थिती अधिकाधिक चिंताजनक होत चालली होती. त्यामुळे संरक्षणाच्या प्रश्नावर प्रामुख्याने लक्ष केंद्रित करणे आवश्यक होते. रशियाच्या सीमेत खनिज तेल व अन्य खनिजांचे संशोधन करण्यासाठी विज्ञान व श्रमशक्ती याकडे वळविण्यात आली. याचा परिणाम पश्चिम क्षेत्रात नव्याने स्थापन झालेल्या तेल विहिरीतून खनिज तेलाचे उत्पादन होऊ लागले. युरोपातील युद्धजन्य परिस्थितीमुळे लष्करी शिक्षणाला या योजनेत अधिक प्राधान्य देण्यात आले. देशभर लष्करी प्रशिक्षण केंद्रे उघडण्यात आली. याशिवाय लष्करी भरती होण्यासाठी २१ वर्ष ऐवजी १८ वर्षे वयोमर्यादा करण्यात आली. सन १९४१ पर्यंत रशिया मनुष्यबळ, नेतृत्व, लष्करी साहित्य आणि इतर साहित्यामुळे परकीय आक्रमणाविरुध्द स्वतःचे संरक्षण करण्यास सज्ज झाला होता. सन १९२७ ते १९४१ या काळात सुमारे एक कोटी दहा लक्ष लोकांना शिस्तबध्द लष्करी प्रशिक्षण देण्यात आले.

सन १९२८ ते १९४१ पर्यंत तिसऱ्या पंचवार्षिक योजनेने महत्वपूर्ण यश प्राप्त केले. पंचवार्षिक योजनांनी सोव्हिएत संघाच्या अर्थव्यवस्थेचा मजबूत पाया केला. रशियाचे राष्ट्रीय उत्पन्न मोठ्या प्रमाणात वाढले. सन १९४० पर्यंत झालेल्या या प्रगतीमुळे रशिया जगातील दुसऱ्या क्रमांकाचे औद्योगिक राष्ट्र गणले जाऊ लागले. रेल्वे इंजिन व डबे, मालवाहतूक, मोटारी, ट्रॅक्टर्स, शेतीची यांत्रिक उपकरणे यात रशियाने युरोपीय राष्ट्रांवर मात केली होती. एकट्या रशियाचे सर्व युरोपीय राष्ट्रांच्या एकूण खनिज तेल उत्पादन जास्त होते. जर्मनी वगळता फास्फेट, तांबे, लोखंड यांच्या उत्पादनात व पोलाद उत्पादनात रशियाचा पहिला क्रमांक लागत होता. कृषिप्रधान अर्थव्यवस्थेएवजी उद्योगप्रधान अर्थव्यवस्था दृढमूल करण्याचे कार्य फार मोठ्या प्रमाणात साध्य झाले होते. शेतकरी व कामगार यांच्या जीवनातील तफावत जवळजवळ नाहीशी झाली.

**चौथी पंचवार्षिक योजना १९४६-१९५१ :**

दुसऱ्या महायुध्दाच्या काळात रशियाची झालेली हानी भरून काढून औद्योगिक पुनर्रचना करणे गरजेचे होते. यासाठी राष्ट्राचे लष्करी व औद्योगिक सामर्थ्य वाढविणे, अवजड उद्योगावर विशेष भर देणे, दळणवळणाच्या साधनांच्या वृध्दीवर विशेष भर देणे व नष्ट झालेल्या उद्योगांची परत उभारणी करणे आवश्यक होते. त्यानुसार ६००० जुन्या-नव्या मोठ्या कारखान्यातून उत्पादनाला सुरुवात झाली. कच्चे लोखंड पोलाद, विद्युतशक्ती व कोळसा याचे उत्पादन दुपटीपेक्षाही अधिक वाढले. दुसऱ्या महायुध्दामुळे रशियाच्या कृषिक्षेत्रावर जबरदस्त आघात झाला होता. कृषी उत्पादनात वृध्दी व्हावी या दृष्टीने प्रयत्न करण्यात आले. सन १९४७ मध्ये सामूहिक प्रक्षेत्र यांची संख्या २ लक्ष २२००० होती. ती १९५० पर्यंत २ लक्ष ५४००० झाली. सामूहिक प्रक्षेत्रातील धान्य जमा करण्याकरता आता 'इंपेकटोरेट ऑफ हार्वेस्ट इल्ड' या नव्या शासकीय संस्थेची स्थापना करण्यात आली. सन १९४० ते १९५२ या काळात औद्योगिक उत्पादनात २.३ पटीने व कृषी

उत्पादनात १० पटीने वाढ झाली. उद्योग उत्पादन वृध्दीच्या लोकसंख्या वृध्दीच्या प्रमाणात कृषी उत्पादन वृध्दी असमाधानकारक असल्यामुळे या योजना काळात अपेक्षित यश मिळाले नाही.

**स्टॅलिनचे निधन (१९५३) :**

दुसऱ्या महायुद्धातील यशामुळे स्टॅलिनची महान सेनापतींत गणना केली जाऊ लागली. अंतर्गत विरोध मोडून काढण्यासाठी स्टॅलिनने पक्षशुद्धीची मोहीम आखून आपले शासन स्थिरस्थावर केले. ज्यावेळी स्टॅलिन सत्तेवर आला त्यावेळी रशियाची आर्थिक स्थिति बिकट होती. परंतु १९२८-१९५३ या काळात साम-दाम-दंड-भेद याचा वापर करून रशियाला जगाच्या नकाशात जागतिक महासत्ता म्हणून नावारूपास आणले. दुसऱ्या महायुद्धात पीछेहाट होत असताना आपल्या जिद्द आणि चिकटीच्या जोरावर जर्मनीच्या विरोधात विजयश्री खेचून आणली. ५ मार्च १९५३ रोजी मेंदूत मोठ्या प्रमाणात रक्तस्राव झाल्याने त्यांचे निधन झाले. त्याच्या मरणानंतर त्याच्या विरुद्ध काहूर उठले. स्टॅलिनची विचारसरणी, प्रभाव नाहीसी करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

**आपली प्रगती तपासा.**

१. स्टॅलिनच्या पक्षशुद्धीवर चर्चा करा.
२. रशियाच्या आर्थिक विकासातील पंचवार्षिक योजनांचे योगदान विशद करा.

## ५.४ दुसरे महायुद्ध व सोव्हियत संघ :

सन १९३८-३९ या वर्षात युरोपियन राष्ट्रात दुसऱ्या महायुध्दाचे ढग दाटू लागले होते. दुसऱ्या महायुध्दाची टांगती तलवार ही म्युनिक कराराने पूर्वेकडील राष्ट्रांकडे वळेल अशी युरोपीय राष्ट्रांची समजूत होती, परंतु पोलंडच्या विजयानंतर हिटलर युरोपकडे वळला. सन १९३९ च्या ऑगस्ट मध्ये सोव्हिएत रशिया व जर्मनी या दोन देशात अनाक्रमणाचा करार होऊन सोव्हिएत रशियाने आपल्यावर होणाऱ्या संभाव्य हल्ल्याला थोपवून धरण्यात यश मिळवले. या काळात सोव्हिएत रशियाने युध्दाला सामोरे जाण्यासाठी तयारी सुरू केली होती. अनाक्रमणाच्या करारामुळे पश्चिम युरोपीय राष्ट्र व सोव्हिएत रशिया यांच्यात अधिकच कटुता निर्माण झाली.

सोव्हिएत रशियाने जर्मनीशी केलेला अनाक्रमणाचा करार म्हणजे शत्रुत्वाच्या पायावर निर्माण झालेली मैत्री होती. ही दोन्ही राष्टे परस्परांच्या हालचालीवर बारीक नजर ठेवन होती. आपल्यावर एक दिवस जर्मनीचा नाझी हल्ला होईल, याची जाणीव सोव्हिएत नेत्यांना होती. त्यामुळे युध्दाला तोंड लागताच सोव्हिएत रशियाने आपल्या लष्करी सज्जतेला व सीमेवरील तटबंदीला बळकटी देण्यास प्रारंभ केला. रशियाने जर्मनीचा हुकूमशहा हिटलरचे पश्चिमेकडील युध्दतंत्र अभ्यासून त्या युध्दतंत्राविरुध्द उपाययोजनांचा विचार करायला सुरुवात केली.

**सोव्हिएत रशियाच्या सीमांचे मजबुतीकरण :**

१९२०-१९२१ साली पोलंडने सोव्हिएत रशियाचा काही प्रदेश गिळंकृत केला होता. या प्रदेशात लक्षावधी श्वेत रशियन व युक्रेनियन लोकाची वस्ती होती. पोलंडमध्ये असलेल्या श्वेत रशियन, युक्रेनियन व बायलो रशियन लोकांच्या संरक्षणासाठी सोव्हिएत रशियाने पोलंड वर आक्रमण केले. सोव्हिएत रशियातील पोलंडमधील लाल सैन्य व जर्मनी नाझी सेना यांच्यात संघर्ष होऊ नये असे हिटलरला वाटत असल्याने हिटलर व स्टॅलिन यांच्यात 'सीमा मैत्री करार' २९ सप्टेंबर १९३९ रोजी करण्यात आला. सन १९२० मध्ये इंग्लंडने सुचविलेली 'कर्झन रेषा' सीमारेषा म्हणून घोषित केली गेली. दुसऱ्या महायुध्दाच्या भडक्यात आपल्या सारख्या छोट्या राष्ट्रांचे अस्तित्व टिकणार नाही, म्हणून २८ सप्टेंबर, ५ ऑक्टोबर, ९ व १० ऑक्टोंबर रोजी अनुक्रमे एस्टोनिया, लाटविया, लिथुआनिया यांनी सोव्हिएत रशियासोबत परस्पर मदतीचे करार केले. या करारामुळे बाल्टिक क्षेत्रावर सोव्हिएत रशियाचे वर्चस्व प्रस्थापित झाले. पश्चिमेकडे फ्रान्सचा पराभव झाल्यावर ऑगस्ट १९४० मध्ये एस्टोनिया, लाटविया, लिथुआनिया ही राष्ट्र सोव्हिएत रशियाची घटक राज्य म्हणून समाविष्ट झाली. बेसअरेबियाचा प्रदेश रशियन वर्चस्वाखाली असला पाहिजे अशी आग्रही भूमिका लेनिन व नंतर स्टॅलिनची होती. फ्रान्सच्या पाडावानंतर जर्मनीच्या आक्रमणाचा धोका सोव्हिएत रशियाला वाटू लागल्याने सोव्हिएत रशियाने युक्रेनियन लोकवस्ती असलेल्या उत्तर ब्रूकोविना प्रदेशाची मागणी केली. २८ जून, १९४० रोजी सोव्हिएत रशियाच्या फौजानी बेसअरेबिया व ब्रूकोवीनाच्या प्रदेशात सैन्य कारवाई करून हा प्रदेश आपल्या देशात समाविष्ट केला.

**जर्मनीशी अनाक्रमणाचा करार (२३ ऑगस्ट १९३९) :**

पूर्व युरोपातील इंग्लंड व फ्रांस रशियाला एकटे पाडण्याचा डाव रचत असल्याचा संशय आल्यामुळे स्टॅलिन अस्वस्थ झाला होता. आपल्याला युरोपात कोणीच मित्र राहिला नाही याची स्टॅलिनला प्रकर्षाने जाणीव झाली त्यामुळे आपल्या धोरणात बदल करण्याचे ठरवून आपली पश्चिम सीमा सुरक्षित ठेवण्यासाठी स्टॅलिनने, आणि पश्चिम युरोपशी होऊ घोतलेल्या संभाव्य युद्धात पूर्व सीमेवर शांतता ठेवण्यासाठी हिटलरने गुप्त बोलणी करून २३ ऑगस्ट, १९३९ रोजी रशिया-जर्मनी अनाक्रमणाचा करार करून जगाला धक्का दिला. रशियाने २८ सप्टेंबर १९३९ रोजी जर्मनीशी आणखी एक गुप्त करार करून आपली बाजू आणखीच बळकट केली. या करारान्वये रशियाच्या हितसंबंधास जर्मनीने बाधा आणू नये हे हिटलरने मान्य केले. सप्टेंबर १९३९ मध्ये हिटलरने दोस्त राष्ट्रांविरुद्ध युद्धाची तुतारी फुंकली होती.

**रशिया-फिनलंड युध्द :**

सोव्हिएत रशियाने पश्चिम सीमेची डागडुजी केल्यानंतर रशियाची नजर फिनलंडकडे वळली. रशिया पासून फिनलंडची सीमा अवघ्या २० मैलावर होती. सोव्हिएत रशियाच्या आक्रमणाचा अंदाज ओळखून फिनलंडने सुध्दा या सीमेवर भक्कम तटबंदी उभारली होती. पाश्चिमात्य राष्ट्रांच्या मुख्यतः जर्मनीच्या दृष्टीने फिनलंड हे राष्ट्र रशियात घुसण्याचे प्रवेशद्वार होते. एकदा फिनलंड जर्मनीच्या ताब्यात आले तर स्टॅलिनग्राड मार्गे मास्को पर्यंत पोहोचणे कठीण नव्हते. हा धोका सोव्हिएत रशियाला सुध्दा जाणवत होता. ही परिस्थिती

पाहता सोव्हिएत रशियाने फिनलंड समोर ऑक्टोबर १९३९ पासून हांगो आखाती प्रदेश सोव्हिएत रशियाला ३० वर्षांच्या भाडेतत्त्वावर द्यावा व विबॉर्ग समोरची चार बेटे व कारेलीयनया प्रदेशाचा भाग द्यावा, या आपल्या मागण्या मांडल्या. तसेच या प्रदेशाच्या मोबदल्यात सोव्हिएत रशियाचा फिनलंडला वरील प्रदेशाच्या दुप्पटीपेक्षाही अधिक क्षेत्रफळ असलेला लेक लगोदा व मध्यम कारेलीयाच्या उत्तरेकडील प्रदेश देईल. असे ठरले. परंतु रशियाची वरील बोलणी फिनलंडने उधळून लावल्याने ३० नोव्हेंबर १९३९ रोजी रशियन फौजा फिनलंडमध्ये घुसविल्या. या युध्दात फिनिश लोकांनी सोव्हिएत रशियाच्या आक्रमणाचा कडवा प्रतिकार केला. परंतु बलाढ्य सोव्हिएत रशियाविरुध्द आपला इलाज चालत नाही याची जाणीव फिनलंडला झाली. फिनलंडने लगेच तहाची बोलणी सुरू केली. व १२ मार्च १९४० रोजी रशिया फिनलंड याच्यात तह घडून आला. या तहानुसार-

१. फिनलंडने विबोर्गचा प्रदेश, लेक-लगोदचा पश्चिम व उत्तर किनार्याचा प्रदेश सोव्हिएत रशियाला दिला.

२. हांगो बेटाचा प्रदेश ३० वर्षांच्या भाडेपट्टीवर सोव्हिएत रशियाला देण्यात आला.

३. सोव्हिएत रशियाने वार्षिक ३० हजार डॉलर्सची रक्कम फिनलंडला देण्याचे ठरविण्यात आले.

या तहातून सोव्हिएत रशियाला पेत्सेनोया प्रदेशातून स्वीडन व नार्वेकडे जाणारा मार्ग खुला झाला.

सोव्हिएत रशियाने पश्चिमेकडील गमावलेले सर्व प्रदेश आपल्या अधिकार क्षेत्रात जोडले होते. या कारणामुळे हिटलर अत्यंत अस्वस्थ होता. बळकट सोव्हिएत रशिया जर्मनीला नको होता.

**सोव्हिएत रशिया व जपान करार (१३ एप्रिल, १९४१) :**

जर्मनी-इटली-जपान या अक्ष राष्ट्रांच्या संयुक्त आक्रमणाला एकाच वेळी तोंड देणे रशियाला शक्य नव्हते. जर्मनी सोव्हिएत रशियाला गिळंकृत करायला बसला होता. यावेळी पॅसिफिक महासागरात वर्चस्व प्रस्थापित करण्याच्या अनुषंगाने जपान-अमेरिका यांच्यातील संघर्ष स्पष्ट दिसत होता. अशावेळी जपानची पश्चिम आघाडी शांत रहावी असे जपानलाही वाटत होते. यातूनच १३ एप्रिल १९४१ रोजी जपान व सोव्हिएत रशिया या देशांत करार घडून आला. या करारात खालील तरतुदी पुढील प्रमाणे.

१) सोव्हिएत रशिया-जपान संबंध मैत्रीचे व शांततेचे असावे.

२) परस्परांच्या प्रादेशिक स्वातंत्र्याचा सन्मान राखला जावा.

३) दोन्हीपैकी कोणतेही राष्ट्र तिसऱ्या राष्ट्रसोबत युध्दात गुंतले तर या संपूर्ण काळात मित्रराष्ट्रांनी तटस्थता बाळगावी.

४) उत्तर साखलीन बेटातील जपानच्या सर्व सवलती सहा महिन्याच्या आत रद्द व्हाव्यात.

५) सर्व खनिज तेलाच्या विहिरी उपकरणे व साहित्यसह युध्दानंतर जपानने सोव्हिएत रशियाच्या स्वाधीन करावे.

६) सोव्हिएत रशियाने मोबदला म्हणून जपानला दरवर्षी ५०,००० टन खनिज तेल व पाच दशलक्ष रुबल्सची रक्कम द्यावी.

या करारावर ३१ मे १९४१ रोजी सोव्हिएत रशिया व जपान तर्फे शिक्कामोर्तब झाले. हा करार म्हणजे रशियन राजनीतीचा एक विजय मानला गेला. या कराराने सोव्हिएत रशिया व जपान या राष्ट्रांनी आपापल्या एक आघाड्या शांत करून दुसऱ्या आघाड्यांवर लक्षकेंद्रित करण्यासाठी सज्ज झाले.

**जर्मनीचे सोव्हिएत रशियावर आक्रमण** :

दुसऱ्या महायुध्दात जर्मनीने सोव्हियत संघावर केलेल्या आक्रमण मोहिमेचे सांकेतिक नाव 'ऑपरेशन बारबॅरोसा' हे होते. सुरवातीला हिटलरने फ्रान्सला पराभूत केल्यावर ब्रिटनला नमवणे सहज शक्य आहे असे हिटलरला वाटत होते. परंतु ही त्याची अपेक्षा यशस्वी होवू शकली नाही. ब्रिटन सहजासहजी आपल्या हाती येणार नाही हे पाहून जर्मनीने आपली मोहीम सोव्हिएत रशियाकडे वळवली. परंतु याच काळात सोव्हिएत रशियाने हिटलरच्या आक्रमणाचा अंदाज घेऊन आपले सामर्थ्य वाढविणे सुरूच ठेवले होते. हिटलरने ब्रिटनसोबत तडजोडीचे धोरण सुरू करण्यासाठी १० मे १९४० रोजी आपला ब्रिटन समोर एक प्रस्ताव ठेवला. जर्मनीचा या प्रस्तावावर कितपत विश्वास ठेवावा याबद्दल इंग्लंडला धास्ती होती. ब्रिटिश लोकमत सुध्दा या प्रस्तावाच्या विरोधी होते. त्यामुळे ब्रिटनची अनिश्चितता लक्षात घेऊन हिटलर सोव्हिएत रशियाकडे वळला. युरोपवर प्रभुत्व प्रस्थापित करण्यासाठी सोव्हिएत रशियाला नेस्तनाबूत करणे आवश्यक आहे असे हिटलरचे मत होते. २२ जून १९४१ रोजी जर्मनीने सोव्हिएत रशियावर आकस्मिक हल्ला केला. जर्मनीने सोव्हियत संघावर केलेल्या आक्रमण मोहिमेचे सांकेतिक नाव 'ऑपरेशन बारबॅरोसा' हे होते.

**सोव्हिएत रशिया-ब्रिटन सामंजस्य करार:**

सोव्हिएत रशिया विरुध्दच्या युध्दात जर्मनीचा पराभव होणे आवश्यक होते हे ब्रिटनला वाटत होते. म्हणूनच सोव्हिएत रशियाच्या साम्यवादाला ब्रिटनचा कडाडून विरोध असला तरी स्वतःच्या राष्ट्राच्या संरक्षणासाठी सोव्हिएत रशियाला जर्मनी विरुध्द इंग्लंड सर्वोतपरी मदत करील अशी घोषणा २२ जुलै १९४१ रोजी आकाशवाणीवरून ब्रिटनचे पंतप्रधान विस्टन चर्चिल यांनी केली. लंडन व मास्को यांच्यात १२ जुलै १९४१ रोजी जर्मनीविरुध्द परस्पर मदतीचा प्राथमिक स्वरूपाचा करार झाला. ब्रिटन पाठोपाठ भांडवलशाही अमेरिकेनेही साम्यवादी सोव्हिएत रशियाला २४ जून १९४१ रोजी मदतीचे वचन देण्याची घोषणा केली. त्यानुसार अमेरिकेने रशियाला ३० ऑक्टोबर १९४१ रोजी 'लॅंडलीज' म्हणजे उधार उसनवार योजने अंतर्गत एक अब्ज डॉलरची लष्करी साहित्याची मदत पाठवली.

**सोव्हिएत रशिया-जर्मनी युध्द:**

रशियाला जर्मनीचे आक्रमण २१ व २२ जुलै १९४१ रोजी होणार अशी बातमी रशियन हेरांकडून मिळाली होती. परंतु सोव्हिएत रशिया सरकारची नाझी आक्रमणाला तोंड देण्याची तयारी त्यावेळी झालेली नव्हती. जर्मनीच्या हिटलरने आपल्या सर्व प्रकारच्या अध्ययावत लष्करी शस्त्रास्त्रांसह रशियावर दक्षिण दिशा-काळा समुद्र, उत्तर दिशा-बाल्टिक समुद्र प्रदेशातून स्टॅलिनग्राडच्या दिशेने व  मध्य विभागातील मास्कोच्या रोखाने तीन दिशांनी आक्रमण केले. सुरुवातीला सोव्हिएत रशियावरील जर्मनीच्या आक्रमणाची वाटचाल प्रचंड वेगाने झाली. परंतु ही परिस्थिती फार काळ सोव्हिएत रशियाच्या प्रतिउत्तरासमोर टिकाव धरू शकली नाही. रशियाची युध्दनिती निर्धारित करण्याचे कार्य रशियन लष्कराचा सरसेनापती मार्शल जोसेफ स्टॅलिन यांच्या अध्यक्षतेखाली सर्वोच्च संरक्षण समितीकडे सोपवण्यात आले होते. जर्मन सैन्याने २ ऑक्टोंबर रोजी मास्को विरुध्द हल्यास प्रारंभ केला. हिटलरला असा विश्वास होता की थोड्याच दिवसात मास्को शहर नाझी फौजांच्या वर्चस्वाखाली असेल. जर्मन सैन्य आता क्रेमलिन या शहरापासून केवळ पाच मैल दूर होते. स्टॅलिनने मास्को पूर्णपणे जर्मनी फौजेच्या वेड्यात सापडलेले आहे अशी घोषणा १९ ऑक्टोबरला केली. मास्कोला पडलेल्या वेढ्यामुळे मॉस्को येथील सरकार क्युबिशेव येथे हलवण्यात आले. परंतु सर्वोच्च समितीचा प्रमुख म्हणून स्टॅलिन क्रेमलिन येथेच राहिला. या ठिकाणी आता मास्कोला वाचविण्यासाठी सोव्हिएत लष्कराचा निर्धार, शौर्य व त्यांनी दिलेला निकराचा लढा, केवळ यामुळेच रशियाचे रक्षण झाले. एवढेच नव्हे तर नाझी सैन्याला सोव्हिएत रशियाच्या लष्करी सामर्थ्याचा पहिला प्रत्यय मॉस्को संघर्षातच आला. मास्कोच्या संरक्षणाची जबाबदारी जॉजी झुकोव याच्यावर देण्यात आली. त्याच्या मदतीसाठी जपानच्या आघाडीवर असलेले पूर्वेकडील ताज्या दमाचे सैन्य देण्यात आले व सर्व सिध्दता झाल्यावर ७ डिसेंबर रोजी झुकोवने जर्मनीवरील प्रतिहल्ल्यास प्रारंभ केला. रशियन सेनेने या आक्रमणासाठी टी-३४ या रणगाड्याचा प्रथमच मारा जर्मन तोफांवर सुरू केला. याचवेळी हात पायांना बधिर करणारा रशियन हिवाळा रशियन लष्करास वरदान व जर्मनांसाठी शाप ठरला. जर्मन लष्करास हिवाळ्यात आवश्यक असलेली गरम कपडे व बूट पुरवण्याची आवश्यकता हिटलरला वाटली नाही. अशा परिस्थितीत रशियन लष्कराने चढविलेला प्रतिहल्ला पूर्णपणे यशस्वी ठरला. सोव्हिएत रशियाच्या मरणप्राय हिवाळ्यात व रशियन सैनिकांच्या प्रतीहल्लूयात १/४ जर्मन सैनिक मृत्युमुखी पडले. क्लीन व कालिनीन ही शहरे १६ डिसेंबर १९४१ पर्यंत रशियन लष्कराने परत जिंकून घेतले मध्य आघाडीवरील जर्मन सैन्य ५० ते २०० मैल मागे घेण्यात रशियन सैन्याला यश आले व अशा पध्दतीने रशियन लष्कराने मास्को शहरास वाचविले.

**स्टॅलिनग्राडचा लढा आणि विजय:**

नाझी जर्मनी व सोव्हिएत रशिया या दोन्ही राष्ट्रांचे भवितव्य ठरविणारा निर्णायक व घनघोर लढा म्हणजे स्टॅलिनग्राडचा संघर्ष होय. स्टॅलिनग्राड हे शहर वोल्गा नदीवर वसलेले आहे. जर्मन लष्कराच्या सहाव्या तुकडीचा सेनापती फिल्ड मार्शल फेड्रिक पोलस याने १४ सप्टेंबर १९४२ पासून आक्रमणास सुरुवात केली. दररोज जर्मन लष्कर दोन हजार पेक्षा जास्त बॉम्बफेकी विमानांनी त्या शहरावर बॉम्बफेक करत होती. या शहराचे रूपांतरण दगड मातीच्या ढिगाऱ्यात झाले होते. सप्टेंबर महिन्याच्या अखेरपर्यंत स्टॅलिनग्राडचा मोठा भाग

जर्मनांच्या हाती आला होता. रशियन लष्कर व स्टॅलिनग्राड येथील जनता आपल्या शहरासाठी व मातृभूमीसाठी प्राणपणाने लढत होती. मशिनगन्स, बंदुका, खंजीर, चाकू अशा मिळेल त्या शस्त्रांनी रशियन सैनिक व जनता अखेरच्या श्वासापर्यंत जर्मनाशी लढा देत होती. रशियन सैन्याने जर्मनांचे दळणवळणाचे सर्व मार्ग बंद केले. अन्नधान्य व इतर साधन सामुग्रीचा पुरवठा करण्यासाठी जर्मन केवळ विमानांवर अवलंबून होते. परंतु सोव्हिएत विमानभेदी तोफांमुळे जर्मनांची विमाने रोज पाडली जात होती. त्यामुळे जर्मन सैनिकांना हवाईमार्गाने सुध्दा पुरवठा होऊ शकत नव्हता. जानेवारी १९४३ पर्यंत फिल्ड मार्शल पॉलसच्या सहाव्या जर्मन सैनिक तुकडीची अवस्था अत्यंत बिकट व दयनीय झाली होती. हिटलर माघार घेण्यास तयार नव्हता. शेवटी ३१ जानेवारी १९४३ रोजी फिल्डमार्शल पॉलसने रशियन फौजेसमोर शरणागती पत्करली जर्मनीचे सहावे लष्कर रशियाचे युध्दकैदी बनले होते. यामध्ये सेनापतींचाही समावेश होता. या स्टॅलिनग्राडच्या लढ्यात सोव्हिएत रशियाला जर्मनीकडून २४ जर्मन जनरल, २५०० लष्करी अधिकारी, एकूण साडेतीन लक्ष जर्मन लष्करापैकी शेवटी उरलेले, जिवंत राहिले दीड लक्ष जखमी लष्करी सैनिक, ६७ हजार तोफा, १४४२ लहान तोफा, १५५० रणगाडे, ९०,००० बंदुका, ६११०२ ट्रक्स, ७५० विमाने इत्यादी युध्द साहित्य मिळाले. १९४५ च्या सुरुवातीला फिनलंड, रुमानिया, बल्गेरिया, हंगेरी, युस्लोव्हाकिया ही पूर्व युरोपची सर्वराष्ट्र नाझींच्या नियत्रणातून मुक्त झाली.

**रशियाचे वाढते सामर्थ्य :**

सोव्हिएत रशियाच्या युध्द समाप्तीच्या मोहिमांची सुरुवात सोव्हिएत रशियाच्या फिनलंड वरील आक्रमणाने सन १९४४ च्या उत्तरार्धात झाली. सोव्हिएत रशियाच्या आक्रमणासमोर फिनलंडचा टिकाव धरणे शक्य नव्हते. शेवटी अक्ष राष्ट्रांशी संबंध तोडून फिनलंडने १९ सप्टेंबर १९४४ रोजी सोव्हिएत रशियासोबतच्या युध्दबंदी करारावर सह्या केल्या या करारात सोव्हिएत रशियाला फिनलंडकडून निकेलच्या खाणी, पेस्तेमोचा प्रदेश मिळाला. त्याऐवजी फिनलंडला सोव्हिएत रशियाकडून १९४० मध्ये सोव्हिएत रशियाने काबीज केलेला हान्गो प्रदेश व पन्नास वर्षाकरिता पोरक्क्ल उद बंदराचा प्रदेश फिनलंडला दिला. रुमानिया-रशिया यांच्यात १२ सप्टेंबर १९४४ रोजी अनाक्रमणाचा करार झाला. त्यात २८ जून १९४० रोजी प्रस्थापित झालेल्या उभय राष्ट्रांतील सीमारेषेवर शिक्कामोर्तब करण्यात आली. याचबरोबर आठ वर्षाच्या काळात ३०० दशलक्ष डॉलरची नुकसान भरपाई रुमानियाने रशियाला द्यावी असे निश्चित झाले. रुमानियानंतर रशियन फौजा बल्गेरियाकडे वळल्या. ऑक्टोंबरच्या शेवटी बल्गेरियाने सुध्दा जर्मनांची साथ सोडून संयुक्त राष्ट्र संघाच्या पक्षात सामील झाले. रशियन लष्कराने २० ऑक्टोबर रोजी बेलग्रेड काबीज केले व युस्लोव्हाकियातून नाझींची हकालपट्टी केली. जानेवारी १९४५ मध्ये हंगेरी सरकारने सोव्हिएत रशियाविरुध्द युध्दबंदी करून जर्मनीविरुध्द युध्द घोषणा केली.

**याल्टा परिषद/क्रीमिया परिषद (४ ते ११ फेब्रुवारी १९४५)**

सन १९४५ च्या प्रारंभी दुसऱ्या महायुध्दाचा निकाल कसा लागणार याविषयी लोकांमध्ये पुसटशी कल्पना होती त्याच दृष्टीने जर्मनीच्या अखेरच्या मोहिमा, त्या राष्ट्राचे भवितव्य, युध्दसमाप्तीनंतरचे कल्पना होती. त्याच दृष्टीने जर्मनीच्या अखेरच्या मोहिमा, त्या राष्ट्राचे

भवितव्य, युध्दसमाप्तीनंतरचे सहकार्य व शांतता याबद्दल निश्चित योजना आखण्यासाठी फेब्रुवारी १९४५ मध्ये अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष फ्रँकलिन रुझवेल्ट, सोव्हिएत रशियाचे राष्ट्रप्रमुख जोसेफ स्टॅलिन व इंग्लंडचे पंतप्रधान विस्टन चर्चिल या तीन राष्ट्र प्रमुखांची बैठक जर्मनीच्या आक्रमणांनी उध्वस्त झालेल्या याल्टा या शहरात (क्रिमियाजवळ) ४ ते ११ फेब्रुवारी १९४५ रोजी आयोजित करण्यात आली होती. युध्दकाळातील सर्व परिषदांमध्ये ही परिषद सर्वात महत्त्वाची व वादग्रस्त ठरली. या परिषदेत खालील निर्णय घेण्यात आले.

१. जर्मनीने बिनशर्त शरणागती पत्करावी,

२. जर्मनीचे सोव्हिएत रशिया, इंग्लंड व अमेरिका या तीन राष्ट्रात प्रादेशिक विभाजन व्हावे,

३ फ्रान्सला जर्मनीच्या प्रदेशात हिस्सा द्यायचा की नाही याबद्दल या नेत्यात एकमत नव्हते,

४. दोस्त राष्ट्रांच्या झालेल्या हानीची भरपाई जर्मनीने करावी.

५. सर्वात जास्त हानी सोव्हिएत रशियाची झाली, म्हणजे भरपाईची निम्मी रक्कम रशियाला मिळावी.

६. कर्झन रेषा ही रशिया पोलंड यातील सीमा रेषा ठरावी. पोलंडचा जो प्रदेश सोव्हिएत रशियाकडे येईल त्याची भरपाई जर्मनीचा काही प्रदेश पोलंडला देण्यात यावा.

७. जर्मनीच्या नाझी प्रभावापासून मुक्त झालेल्या पूर्व युरोपीय राष्ट्रांना त्याचे राजकीय व आर्थिक प्रश्न लोकशाही मार्गाने सोडवण्यासाठी दोस्त राष्ट्रांनी मदत करावी.

८. जपान विरुध्दच्या लढाईत सोव्हिएत रशियाचे सहकार्य मिळविणे.

९. जगातील शाततेसाठी संयुक्त राष्ट्र संघटना उभारणे.

**आपली प्रगती तपासा.**

१. रशिया-जर्मन युद्धावर सविस्तर लिहा.
२. याल्टा परिषद

**जर्मनीची शरणागती :**

सोव्हिएत रशिया, फ्रान्स, इंग्लंड, अमेरिकेच्या जर्मनीविरुध्दच्या अखेरच्या संयुक्त मोहिमांना जानेवारी १९४५ पासून सुरुवात झाली. सोव्हिएत रशियाने १७ जानेवारी १९४५ रोजी वॉर्सा शहर काबीज केले. पोलंडमधून नाझी सैन्याची पूर्णपणे माघार घेतली होती. पश्चिमेकडून दोस्त राष्ट्रांच्या फौजा जर्मनीच्या दिशेने वाटचाल करीत होत्या. रशियन फौजांनी बर्लिन सभोवताली आपला लष्करी पाश आवळला. यामुळे बर्लिनमधील जर्मनीची लष्करी कोंडी झाली. यावेळी मार्शल झुकोवाच्या तोफा बर्लिन वर आग ओकत होत्या. मृत्यू किंवा शरणागती याशिवाय अन्य पर्याय जर्मनीसमोर उरला नव्हता. १ मे १९४५ रोजी जर्मनीच्या चान्सलरच्या कार्यालयात हिटलर ने आत्महत्या केली होती. १ मे १९४५ रोजी जर्मन ग्रँड ॲडमिन क्लार्ल डोनित्सयाने हिटलरच्या मृत्यूची घोषणा नभोवाणीवरून केली.

सन २ मे १९४५ रोजी पहाटे बर्लिन येथील १ लाख ३० हजार जर्मन सैनिकांनी सोव्हिएत रशिया समोर शरणागती पत्करली. संपूर्ण बर्लिन आता सोव्हिएत रशियाच्या आधिपत्याखाली होता. जर्मनीच्या चान्सलर कार्यालयावर सोव्हिएत रशियाचा झेंडा मानाने फडकू लागला होता. ५ मे १९४५ रोजी फील्डमार्शल मॉण्टगोमेरी याच्याशी क्लार्ल डोनित्सने शरणागतीची बोलणे केले. ८ मे रोजी रशियन सेनापती मार्शल झुकोव, अमेरिकन जनरल स्पाट्झ, ब्रिटीश वायुदल प्रमुख सर आर्थर टेडर याच्या उपस्थितीत बर्लिन येथे शरणागतीच्या करारावर जर्मनीने स्वाक्षऱ्या केल्यानंतर जर्मनी विरुध्दचा लढा संपुष्टात आला.

**पॉट्सडॅम परिषद (१७ जुलै १९४५) :**

जर्मनीच्या पुढील भवितव्याची रूपरेषा निश्चित करण्यासाठी १७ जुलै १९४५ रोजी बर्लिन नजीक असलेल्या पॉट्सडैम येथे ब्रिटन, सोव्हिएत रशिया व अमेरिका याच्या प्रतिनिधींची बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीस याल्टा परिषद् येथील उपस्थित असलेल्या राष्ट्रप्रमुखापैकी फक्त स्टॅलिन उपस्थित होता. जुलै महिन्यात इंग्लडमध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकात इंग्लंडचा तत्कालीन पंतप्रधान विस्टन चर्चिल यांचा पक्षाचा पराभव झाल्याने त्याच्या ऐवजी इंग्लंडचा नवा प्रधानमंत्री क्लेमेंट ॲटली तर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष रुझवेल्टच्या निधनानंतर राष्ट्राध्यक्ष बनलेला हेनरी दुमन या परिषदेला उपस्थित होते. जर्मनीमुळे जागतिक शांततेला धोका निर्माण होऊ नये म्हणून या राष्ट्रप्रमुखांनी काही महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. ते खालील प्रमाणे:-

१. जर्मनीतील नाझीवादाचाचे, लष्करवादाचे व युध्द उपयोगी उद्योगधंद्याचे उच्चाटन व्हावे,

२. जर्मनीला लोकशाही तत्वांची शिकवण दिली जावी,

३. या महायुध्दात सर्वात जास्त हानी सोव्हिएत रशियाची झाल्याने जर्मनीकडून सोव्हिएत रशियास युध्द भरपाई म्हणून बाकी राष्ट्रांपेक्षा मोठा वाटा द्यावा.

४ सोव्हिएत रशियाची नुकसान भरपाई म्हणून रशिया व्याप्त जर्मन प्रदेशातून औद्योगिक यंत्रसामुग्री व अन्य साहित्य (शांतताकालीन गरजांना आवश्यक ती साधनसामुग्री सोडून) युध्द भरपाई म्हणून घ्यावे

५. फिनलंड, बल्गेरिया, हंगेरी, रूमानिया व पूर्व ऑस्ट्रिया या प्रदेशातील जर्मन मालमत्तेवर सोव्हिएत रशियाचा अधिकार असावा,

६. बाल्टा परिषदेतील निर्णयावर या परिषदेत शिक्कामोर्तब करण्यात आले.

**जपानची शरणागती व दुसऱ्या महायुद्धाची समाप्ती :**

जर्मनीने शरणागती पत्करली तरी जपान अजूनही दोस्त राष्ट्राविरुध्द आगेकूच करीत होते. जोपर्यंत जपान शरण येत नाही तोपर्यंत दुसऱ्या महायुध्दाचा शेवट होणे शक्य नव्हते. याल्टा परिषदेत ठरल्याप्रमाणे जर्मनीच्या शरणागतीनंतर ९० दिवसाच्या नंतर ८ ऑगस्ट रोजी सोव्हिएत रशिया जपान विरुध्द युध्दात उतरले. सोव्हिएत रशिया मांचुरियात तीन दिशांनी रशियाची लाल सेना जपान विरुध्द आगेकूच करू लागली. याचवेळी रशियन नौदल व लष्कर यांनी संयुक्तरित्या जपानच्या दक्षिण साखलित बंदरावर आक्रमण केले. सोव्हिएत

रशियाच्या युध्द प्रवेशानंतर चार-पाच दिवसातच जपानच्या लष्करी सामर्थ्याचा कणा मानल्या गेलेल्या मांचुरियातील जपानचे क्वांटूम लष्कर नामोहरम झाले. शेवटी सोव्हिएत रशिया समोर जपानी लष्करास शरण येणं भाग पडले. या वेळेपर्यंत जपानवर अमेरिकेने ६ ऑगस्ट १९४५ रोजी हिरोशिमा व ९ ऑगस्ट १९४५ रोजी नागासाकीवर अणुबाँब टाकला. शेवटी अणुबाँबच्या भयंकर संहारशक्तीने हादरून जाऊन जपानने १४ ऑगस्ट १९४५ रोजी बिनशर्त शरणागती मान्य केली. अमेरिकेच्या 'मिसूरी' या युध्दनौकेवर जपानच्या शरणागती करारावर स्वाक्षऱ्या झाल्या. यावेळी सोव्हिएत रशियाच्या वतीने लेफ्टनंट जनरल कुझामा देरेवेन्को यांनी स्वाक्षरी केली. अशाप्रकारे दुसऱ्या महायुध्दाचा शेवट झाला.

## ५.५ सारांश :

१९१७ च्या रशियन राज्यक्रांतीनंतर बोल्शाविकांच्या हाती सत्ता आली. क्रांतीपूर्व रशिया युरोपीयन राष्ट्रांपेक्षा अनेक क्षेत्रात मागासलेला होता. क्रांतीनंतर लेनिनने साम्यवादी तत्वज्ञानावर आधारित रशियाचा पाया घालण्याचा प्रयत्न केला. हा पाया मजबूत करून त्यास सुदृढ करण्याचे काम जोसेफ स्टॅलिनच्या काळात झाले. रशियातील सोव्हिएत सरकार जरी कामगार, शेतकरी व कष्टकऱ्यांचे असले तरी एकप्रकारे व्यक्तीच्या स्वरूपात हुकूमशाहीच होती. स्टॅलिनने सत्तेचा कठोरपणे उपयोग करून रशियास जागतिक महासत्ता म्हणून निर्माण करण्यात यश मिळविले. अन्नधान्य, युद्धसामुग्री, शिक्षण, आरोग्य, उद्योग या क्षेत्रात युरोपियन देशावर अवलंबून न राहता रशियाला युरोपियन राष्ट्रांच्या पंक्तीत प्रथम क्रमांकावर बसविण्यासाठी त्याने राजकीय, सामाजिक, आर्थिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण बदल घडवून आणले. निरंकुश सत्ता स्थापन करत स्टॅलिनने आपल्या विरोधकांना यमसदनी धाडले. पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून रशियाचे प्रत्येक क्षेत्रातील परावलंबित्व दूर केले. युरोपात उदयास आलेल्या इटलीचा मुसोलिनी व जर्मनीचा हिटलरशी सुरवातीस सख्य राखून रशियातील साम्यवादाला यांच्यापासून सुरक्षित ठेवण्याचा आणि रशियाच्या सभोवताल शेजारील राष्ट्रांसोबत तह करून संरक्षण कवच निर्माण करण्याचा प्रयत्न फसल्यावर रशियाने जर्मनीविरुध्द दुसऱ्या महायुद्धात उडी घेतली. या युद्धात अपरिमित नुकसान उचलूनसुद्धा जर्मनीशी प्रत्येक आघाडीवर मात करीत हिटलरचा आपल्या कुशल नियोजन बद्धतेने पराभव केला. स्टॅलिनची कणखर भूमिका व नियोजनबद्धता सोव्हिएत रशियाला जागतिक महासत्ता बनण्यासाठी उपयुक्त ठरली.

## ५.६ प्रश्न:

१. रशियाच्या विकासातील स्टॅलिन याच्या योगदानावर भाष्य करा.

२. रशियाच्या आर्थिक विकासातील पंचवार्षिक योजनांचे महत्व विशद करा.

३. दुसऱ्या महायुद्धातील रशिया-जर्मन संघर्षावर चर्चा करा.

४. पाॅट्सडॅम परिषदेवर टिपण लिहा.

५. दुसऱ्या महायुद्धकालीन रशियामधील युद्धजन्य परिस्थितीचा मागोवा घ्या.

## ५.७ संदर्भ :


१. कदम य. ना. आधुनिक जग: भाग-२, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २०१०.

२. वैद्य सुमन, आधुनिक जग भाग-१, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती, १९९७.

३. गायकवाड आर. डी., कदम य. ना., थोरात डी. डी., आधुनिक जगाचा इतिहास : भाग-२, १९२०-१९७५, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, १९९७.

४. कोलारकर श. गो., युरोप (१७८९-१८७०) आधुनिक युरोप (१८७१-१९६५), श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, २००५.

५. गाठाळ एस. एस., आधुनिक जागतिक इतिहासातील स्थित्यंतरे, कैलास प्रकाशन, औरंगाबाद, २०१५.

६. गाडगीळ पां. वा., रशियातील राज्यक्रांती, प्रकाशक : यशवंत गोपाळ जोशी, पुणे.

७. जोशी पी. जी., विसाव्या शतकाचा इतिहास, विद्या प्रकाशन, नागपूर, २००३.

८. तळवलकर गोविंद, सोव्हिएत साम्राज्याचा उदय व अस्त खंड:१ व २, मौज प्रकाशन गृह, पुणे, १९९८.

९. उदगावकर म. न., राऊत गणेश, आधुनिक जग, डायमंड पब्लिकेशन, पुणे, २००८.


❖❖❖❖

# ६

# ६.१ शीतयुद्ध आणि सोव्हिएत संघ
# ६.२ डी-स्टालिनायझेशन आणि ख्रुश्चेव्ह थॉ (१९५३-१९६४)
# ६.३ ग्लासनोस्त (मोकळेपणा) आणि पेरिस्त्रोईका सुधारणा (१९८५-१९९१)
# ६.४ सोव्हिएत रशियाच्या विघटनाचे परिणाम

**प्रकरण रचना**

६.१. उद्दिष्टे

६.२. प्रस्तावना

६.३. शीतयुद्ध आणि सोव्हिएत संघ

६.४. डी-स्टालिनायझेशन आणि ख्रुश्चेव्ह थॉ (१९५३-१९६४)

६.५. ग्लासनोस्त (मोकळेपणा) आणि पेरिस्त्रोईका (लोकशाहीकरण) सुधारणा (१९८५-१९९१)

६.६. सोव्हिएत रशियाच्या विघटनाचे परिणाम

६.७. सारांश

६.८. प्रश्न

६.९. संदर्भ सूची

## ६.१. उद्दिष्टे

१. शीतयुद्धकालीन सोव्हिएत संघाची वाटचाल अभ्यासणे.

२. ख्रुश्चेव्ह थॉ याच्या काळात घडून आलेले डी-स्टालिनायझेशन समजून घेणे.

३. मिखाईल गोर्बाचेव्ह यांच्या ग्लासनोस्त आणि पेरिस्त्रोईका सुधारणांचा मागोवा घेणे.

४. सोव्हिएत रशियाच्या विघटनाचे परिणाम अभ्यासणे.

## ६.२. प्रस्तावना:

२० व्या शतकातील जागतिक राजकारणात दोन महासत्तांच्या संघर्षाने संपूर्ण जग व्यापले होते. एकीकडे अमेरिकेच्या नेतृत्वाखालील भांडवलशाही राष्ट्रसमूह तर दुसरीकडे साम्यवादावर आधारित सोव्हिएत संघ (USSR). या संघर्षाला ‘शीतयुद्ध’ (Cold War) असे म्हणण्यात आले. ही स्पर्धा थेट युद्ध न करता राजकीय, आर्थिक, सामाजिक व लष्करी क्षेत्रांतून चालू राहिली. दुसऱ्या महायुद्धानंतर उदयास आलेला सोव्हिएत संघ साम्यवादी विचारधारेचा मुख्य पुरस्कर्ता होता. त्याच्या प्रभावाखाली अनेक देश आले आणि जगाचे द्विध्रुवीय विभाजन झाले. मात्र, हे साम्यवादी साम्राज्य १९९१ मध्ये कोसळले आणि त्याचा जागतिक पातळीवर खोल परिणाम झाला. सोव्हिएत संघाच्या पडझडीच्या मागे काही प्रमुख ऐतिहासिक घटनाक्रम होते, ज्यांमुळे त्याच्या अंताची बीजे रोवली गेली. त्यात डी-स्टालिनायझेशन व ख्रुश्चेव्ह थॉ (Khrushchev Thaw) आणि नंतर ग्लासनोस्त व पेरिस्त्रोईका या सुधारणा निर्णायक ठरल्या. १९५३ मध्ये जोसेफ स्टालिनच्या मृत्यूनंतर निकिता ख्रुश्चेव्ह यांनी सत्तेची सूत्रे हाती घेतली. त्यांनी स्टालिनने राबवलेली दडपशाही, व्यक्तिपूजा आणि हिंसक शुद्धीकरण याविरोधात धोरणात्मक बदल केले. हाच काळ "डी-स्टालिनायझेशन" या नावाने ओळखला जातो. १९८५ मध्ये मिखाइल गोर्बाचेव्ह यांची सत्ता हाती आल्यानंतर USSR मध्ये नवे युग सुरू झाले. देश आर्थिक, सामाजिक आणि राजकीय दृष्टिकोनातून अडचणीत होता. या समस्यांवर मात करण्यासाठी गोर्बाचेव्ह यांनी ग्लासनोस्त (मोकळेपणा) व पेरिस्त्रोईका (पुनर्रचना) या दोन सुधारणांनी रशियाचा कायापालट घडवून आणला.

१९९१ पर्यंत USSR या महासत्तेचे राजकीय, आर्थिक आणि सामाजिक ताण तणाव इतक्या टोकाला गेले की, संपूर्ण संघराज्य तुकड्यांमध्ये विभागले गेले. २५ डिसेंबर १९९१ रोजी मिखाइल गोर्बाचेव्ह यांनी राजीनामा दिला आणि सोव्हिएत संघाचा अधिकृत अस्त झाला. त्याच्या जागी १५ स्वतंत्र राष्ट्रे अस्तित्वात आली.

## ६.३ शीतयुद्ध आणि सोव्हिएत संघ :

१९४५ मध्ये दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्ती झाल्यावर अमेरिका आणि साम्यवादी रशिया यांच्यातील राजकीय, लष्करी आणि वैचारिक संघर्षाचा प्रदिर्घ काळ ‘शीतयुद्ध’ म्हणून ओळखला जातो. एकमेकांवर मात करण्यासाठी दोन्ही गटांनी निरनिराळे मार्ग, साधने आणि पद्धतींचा वापर केला. शीतयुद्धाच्या काळात जर्मनी, कोरिया आणि क्युबा येथे अंतर्गत संघर्ष निर्माण होऊन त्याचे जागतिक परिणाम घडून आले. इ. स. १९८५ नंतर परिस्थिती बदलत गेली. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष रोनाल्ड रेगन व रशियाचे राष्ट्राध्यक्ष मिखाईल गोर्बाचेव्ह यांनी सामंजस्याची भूमिका घेत शीतयुद्ध संपुष्टात आणण्यासाठी प्रयत्न केले. इ. स. १९८९ नंतर पूर्व युरोपीय देशांमधील साम्यवादी सत्ता संपुष्टात आल्या. साम्यवादी रशियाचे अधिकृतरित्या विघटन झाले, दोन्ही महासत्तांच्या दृष्टिकोनात बदल झाल्यामुळे शीतयुद्ध संपुष्टात आले. अनेक विचारवंतांनी आपापल्या परीने शीतयुद्धाचा अर्थ सांगण्याचा आणि त्याचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न केला आहे. इंग्लंडचे माजी पंतप्रधान विस्टन चर्चिल यांनी सन १९४६ मध्ये फुल्टन येथील आपल्या भाषणात या वैचारिक संघर्षाचा उल्लेख केला होता. या संघर्षाला 'शीतयुद्ध' हा शब्दप्रयोग सर्वात पहिल्यांदा १६ एप्रिल, १९४७

रोजी अमेरिकन विचारवंत चर्नार्ड बरूच यांनी वापरला होता. सन १९४७ मध्ये वॉल्टर लीपमन या अमेरिकन विचारवंताने याचे वर्णन 'भासमान युद्ध' असे केले होते. 'कोल्ड वॉर' नावाच्या आपल्या पुस्तकातून त्यांनी 'शीतयुद्ध' या शब्दाचा सर्रास वापर त्यांनी सुरू केला.

३.१ शीतयुद्ध आणि सोव्हिएत संघ
३.२ डी-स्टालिनायझेशन आणि ख्रुश्चेव्ह थॉ (१९५३-१९६४)
३.३ ग्लासनोस्त (मोकळेपणा) आणि पेरिस्त्रोईका सुधारणा (१९८५-१९९१)
३.४ सोव्हिएत रशियाच्या विघटनाचे परिणाम

**शीतयुद्धाची वाटचाल :**

इ. स. १९४५ नंतर म्हणजेच दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर शीतयुद्धाला सुरुवात झाली. जगातील कोणत्याही राष्ट्रात साम्यवादाचा प्रसार होऊ नये आणि तिथल्या लोकशाही राष्ट्राला साम्यवादी राष्ट्रांनी धोका उत्पन्न करू नये, म्हणून अशा ठिकाणी अमेरिका आपल्या शस्त्रसामर्थ्याने हस्तक्षेप करू शकते, अशी घोषणा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रुमन यांनी १२ मार्च, १९४७ रोजी केली. या घोषणेलाच 'ट्रुमन सिद्धांत' असे म्हणतात. ट्रुमन घोषणेमुळे लोकशाहीवादी तसेच भांडवलशाहीवादी राष्ट्रांचे नेतृत्व करण्याचे अमेरिकेचे धोरण स्पष्ट झाले. साम्यवादाच्या विरोधात अनेक राष्ट्रांना आर्थिक मदत देणारी योजना मार्शल नावाच्या अमेरिकन मंत्र्याने तयार केली. त्या योजनेला 'मार्शल योजना' असे म्हणतात. एखाद्या राष्ट्राच्या आर्थिक दुर्बलतेचा फायदा घेऊन साम्यवादी राष्ट्रांनी त्या ठिकाणी आपले वर्चस्व प्रस्थापित करू नये, हा मार्शल योजनेमागील हेतू होता. युरोपमधील एकूण १४ राष्ट्रांनी मार्शल योजनेखाली आर्थिक मदतीचा स्वीकार केला होता. रशियानेही अमेरिका व इंग्लंड यांच्या विरोधात उघड पवित्रा घेतला. मार्शल योजनेवर रशियाने हल्ला केला. एवढेच नव्हे तर ऑक्टोबर १९४८ मध्ये कॉमिन्फॉर्मची स्थापना केली. मार्शल योजना उधळून लावणे हा कॉमिन्फॉर्मचा उद्देश होता. कॉमिन्फॉर्मने झेकोस्लोव्हाकियातील लोकशाही संपुष्टात आणून तेथे साम्यवादांची हुकूमशाही स्थापन केली. इ. स. १९५३ ते १९५७ या कालखंडात अमेरिकेने साम्यवादी रशियाभोवती अनेक लष्करी ठाणी प्रस्थापित करून रशियाला वेढा देण्याचा प्रयत्न केला, साम्यवादी रशियानेही पूर्वीय युरोपियन राष्ट्रांबरोबर परस्पर संरक्षणाचा करार केला. त्यालाच 'वॉर्सा करार' असे म्हटले जाते.

**वॉर्सा करार :**

अमेरिकेने केलेल्या नाटो, सिएटो, सेन्टो या करारांना प्रत्युत्तर म्हणून रशियाने साम्यवादी देशांशी वॉर्सा करार केला. ११ ते १४ मे, १९५५ रोजी सर्व साम्यवादी देशांची परिषद वॉर्सा येथे भरवण्यात आली होती. या परिषदेत अल्बानिया, बल्गेरिया, झेकोस्लोव्हाकिया, पूर्व जर्मनी, हंगेरी, पोलंड, रूमानिया आणि रशिया या देशांनी भाग घेतला होता. या सर्व देशांनी वीस वर्षे मुदतीचा मैत्री व सहकार्याचा करार केला. साम्राज्यवादी आणि भांडवलशाही आक्रमणाला तोंड देणे, हा या कराराचा उद्देश होता. सभासद देशांपैकी कोणावरही आक्रमण झाल्यास त्याला इतर सर्व देश मदत करतील, अशी तरतूद त्यात होती. तसेच सभासद देशांना आर्थिक राजकीय सामाजिक आणि सांस्कृतिक सहकार्य केले जाईल, असेही या करारात होते. या करारात सहभागी झालेल्या सर्व राष्ट्रांचे सार्वभौमत्व, प्रत्येकाला राष्ट्रीय धोरण ठरवण्याचे स्वातंत्र्य, करारातील कोणत्याही राष्ट्राच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप होणार नाही, याची ग्वाही देण्यात आली होती. परस्परांबरोबर मैत्री, सहकार्य, सहजीवन या तत्त्वांच्या आधारे शांततामय मार्गाने आपापसातील सर्व प्रश्न सोडवण्याचे वॉर्सा संघटनेतील राष्ट्रांनी मान्य केले होते. या संघटनेचे मध्यवर्ती कार्यालय मास्को येथे होते. संघटनेच्या संयुक्त लष्कराचा सरसेनापती म्हणून रशियाच्या मार्शल

कोनेव्ह याची नियुक्ती करण्यात आली होती. १ जुलै, १९९१ रोजी वॉर्सा करार रद्द करण्यात आला.

**कौन्सिल ऑफ म्युच्युअल इकॉनॉमिक असिस्टन्स :**

रशियाने एप्रिल, १९४९ मध्ये बल्गेरिया, पोलंड, हंगेरी, रूमानिया, झेकोस्लोव्हाकिया या देशांच्या मदतीने याची स्थापना केली. पुढे अल्बानिया, पूर्व जर्मनी, मंगोलिया व युगोस्लाव्हिया हे देश त्यात सहभागी झाले. 'कॉमेकॉन' या संक्षिप्त नावाने ही संघटना ओळखली जाते. १९७० नंतर सभासद देशांचे आर्थिक एकीकरण करण्याच्या प्रक्रियेला वेग आला. त्यामुळे त्यांचे राष्ट्रीय उत्पन्न २ टक्क्यांनी वाढले.

**कम्युनिस्ट इन्फॉर्मेशन ब्युरो :**

युरोपमध्ये सर्वसाधारण साम्यवादी धोरणांची अंमलबजावणी करणे हे या संघटनेचे मुख्य उद्दिष्ट होते. पूर्व युरोपातील साम्यवादी सरकार दृढ करणे आणि त्यांना साम्यवादी कार्यानितीमध्ये प्रशिक्षित करणे यात संघटनेने मोलाची भूमिका पार पाडली. 'कॉमिन्फॉर्म' या संक्षिप्त नावाने ही संघटना ओळखली जाते.

**बर्लिन भिंत :**

द्वितीय महायुद्धानंतर जर्मनीचे पूर्व आणि पश्चिम असे दोन भागांत विभाजन झाले. पूर्व जर्मनी (जर्मन लोकशाही प्रजासत्ताक) हे साम्यवादी रशियाच्या प्रभावाखाली साम्यवादी राज्य बनले, तर पश्चिम जर्मनी (संघीय प्रजासत्ताक जर्मनी) हे अमेरिका, ब्रिटन आणि फ्रान्सच्या प्रभावाखाली लोकशाही राज्य बनले. आर्थिक ऐक्यावरून झालेल्या मतभेदानंतर रशियाने पश्चिम बर्लिन शहाराची मार्च, १९४७ मध्ये नाकेबंदी केली. ४ मे १९४९ रोजी फ्रान्स, इंग्लंड आणि अमेरिकेने रशियाबरोबर समझोता केला. त्यानंतर रशियाकडून ही नाकेबंदी उठवण्यात आली. बर्लिन शहराचे पूर्व व पश्चिम असे भाग करणारी भिंत ऑगस्ट, १९६१ मध्ये रशियाने उभारली. पश्चिम बर्लिन दोस्त राष्ट्रांकडे तर पूर्व बर्लिन रशियाकडे देण्यात आले. अमेरिकेने त्यास विरोध केला. इ. स. १९८९ मध्ये प्रागने पश्चिम जर्मनी बरोबरची सीमा खुली केली. त्यानंतर हजारो पूर्व जर्मन नागरिक रस्त्यावर आले व त्यांनी स्वातंत्र्याची मागणी केली. साम्यवादी राजवटी विरोधात स्वातंत्र्य आणि साम्यवादाचा शेवट यासाठी ऑक्टोबर, १९८९ मध्ये पूर्व जर्मनीत प्रचंड निदर्शने होऊ लागली. १८ मार्च, १९९० रोजी पूर्व जर्मनीमध्ये खुल्या निवडणुका घेण्यात आल्या. त्यात सोशल डेमोक्रॅट या पक्षाच्या आघाडीचे सरकार सत्तेवर आले. इगोन क्रेन्झ पूर्व जर्मनीचा अध्यक्ष आणि कम्युनिस्ट पक्षाचा सरचिटणीस बनला. ९ नोव्हेंबर, १९८९ रोजी बर्लिनची भिंत पूर्व जर्मनीमधील इगोन क्रेझच्या साम्यवादी सरकारने पाडून टाकली. त्यामुळे बर्लिन शहराचे एकीकरण होऊन दोन्ही जर्मनींचे एकीकरण करणे सोपे झाले. जर्मनीच्या एकीकरणास गोर्बाचेव्हचा पाठिंबा आणि सक्रिय मदत होती. ३ ऑक्टोबर, १९९० रोजी ४५ वर्षानंतर पूर्व व पश्चिम जर्मनीचे विलीनीकरण झाले आणि जर्मनीचे एकीकरण पूर्ण झाले. हेल्मुट कोहल हे एकत्रित जर्मनीचे पहिले पंतप्रधान बनले. २० जून, १९९१ रोजी बर्लिन ही नव्या जर्मनीची राजधानी बनली.

## कोरियन प्रश्न :

३.१ शीतयुद्ध आणि सोव्हिएत संघ
३.२ डी-स्टालिनायझेशन आणि ख्रुश्चेव्ह थॉ (१९५३-१९६४)
३.३ ग्लासनोस्त (मोकळेपणा) आणि पेरिस्त्रोईका सुधारणा (१९८५-१९९१)
३.४ सोव्हिएत रशियाच्या विघटनाचे परिणाम

सन १९५० ते १९५३ या काळात झाले आणि त्यामध्ये उत्तर कोरिया आणि दक्षिण कोरिया यांच्यात संघर्ष झाला. या युद्धामुळे कोरिया द्विपकल्पाचे दोन भागांत विभाजन झाले आणि आजही ते कायम आहे. या युद्धामध्ये अमेरिका आणि सोव्हिएत युनियन यांचा अप्रत्यक्ष सहभाग होता, ज्यामुळे शीतयुद्धाचा तणाव वाढला. दुसऱ्या महायुद्धानंतर कोरियावरील जपानचा ताबा संपला. शीतयुद्धामुळे कोरिया ३८ व्या समांतर रेषेवर विभागले गेले. कोरिया उत्तर आणि दक्षिण अशा दोन भागांमध्ये विभाजित झाले. उत्तर कोरिया कम्युनिस्ट राज्यव्यवस्थेखाली येऊन त्यावर साम्यवादी रशियाचा प्रभाव वाढू लागला, तर दक्षिण कोरिया अमेरिकेच्या प्रभावाखाली येऊन तेथे भांडवलशाही व्यवस्था रुजली. त्यामुळे कोरियन राष्ट्र दोन भागांमध्ये विभागलं गेलं. हे विभाजन केवळ भौगोलिक नव्हते, तर वैचारिक देखील होते. दोन्ही भागांमध्ये परस्परविरोधी राजकीय, आर्थिक आणि सामाजिक व्यवस्था विकसित झाल्या.

## व्हिएतनाम युद्ध (१९५५-१९७५):

१९५४ च्या पहिल्या इंडोचायना युद्ध आणि  जिनिव्हा करारानंतर व्हिएतनामचे उत्तर आणि दक्षिण असे विभाजन झाल्यामुळे व्हिएतनाम युद्धाची सुरुवात झाली. कम्युनिस्ट उत्तरेला सोव्हिएत संघ आणि चीनचा पाठिंबा होता, तर दक्षिणेला अमेरिकेचा पाठिंबा होता. साम्यवादाचा प्रसार रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक धोरणाचा एक भाग म्हणून अमेरिका व्हिएतनाममध्ये अधिकाधिक सहभागी होत गेली . १९७५ मध्ये उत्तर व्हिएतनामी सैन्याने दक्षिण व्हिएतनामची राजधानी सायगॉनचा पराभव करून युद्धाचा शेवट झाला, ज्यामुळे कम्युनिस्ट राजवटीत व्हिएतनामचे पुनर्मिलन झाले.

## क्यूबा प्रश्न :

अमेरिका आणि साम्यवादी रशिया दोन्ही महाशक्तींनी क्यूबाबर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रयत्न केले. त्यामुळे शीतयुद्धात गंभीर परिस्थिती निर्माण झाली. इ. स. १९५९ मध्ये क्युबात राज्यक्रांती होऊन फिडेल कॅस्ट्रो हे क्युबाचे अध्यक्ष बनले. त्यांचा समाजवादी व्यवस्थेवर विश्वास होता. ते अमेरिकेचे विरोधक होते. त्यांनी आपल्या देशात समाजवादी व्यवस्था लागू केली. साम्यवादी रशियाबरोबर अधिक जवळीक निर्माण केली. कॅस्ट्रोच्या भांडवलशाहीविरोधी धोरणामुळे त्याला अमेरिकेतून विरोध होऊ लागला. इ. स. १९६० च्या सुरुवातीस राष्ट्राध्यक्ष आईसेनहॉवर याने क्युबातून अमेरिकेला होणारी साखरेची निर्यात बंद केली. अमेरिकेच्या या दडपशाही धोरणामुळे कॅस्ट्रो अजिबात डगमगला नाही. त्याने फेब्रुवारी, १९६० मध्ये रशियाशी व्यापारी करार करून अमेरिकेला चोख प्रतिउत्तर दिले. क्यूबातील डॉ. फिडेल कॅस्ट्रो यांचे शासन उलटवून पाडण्याचे कट सी. आय. ए. ही अमेरिकेची गुप्तहेर संघटना आखू लागली. अमेरिकेतील धनिक क्युबन नागरिक, कॅस्ट्रोने हद्दपार केलेले लोक आणि क्युबातील कॅस्ट्रोविरोधी नार्गारक यांच्याशी सी. आय. ए. ने संपर्क साधला. क्युबामध्ये दोन लाख संशयीतांना राष्ट्रद्रोहाच्या आरोपाखाली अटक केली गेली. हे बंड फसल्यामुळे अमेरिकेच्या पदरी नामुष्की आली. फिडेल कॅस्ट्रोने संयुक्त राष्ट्रसंघाच्या महासभेत या बंडामागे अमेरिकेचा हात असल्याचे पुराव्यानिशी सिद्ध केले. त्यामुळे जगात अमेरिकेची नाचक्की झाली. क्यूबाच्या संरक्षणाची निकड कॅस्ट्रोला जाणू

लागल्याने त्याने रशियाकडे मदत मागितली. रशियाच्या मदतीमुळे क्यूबाचे सुसज्ज सैन्य उभे राहिले. त्यास अमेरिकेने विरोध केला आणि क्युबा मधून पश्चिम गोलार्धामधील कोणत्याही देशावर क्षेपणास्त्र डागल्यास ते अमेरिकेवर केलेले प्रत्यक्ष आक्रमण समजण्यात येईल, असे जाहीर केले. २२ ऑक्टोबर, १९६२ रोजी अमेरिकन नौदलाने क्युबाची आरमारी नाकेबंदी केली. त्यातून युद्धाला तोंड फुटून तिसरे महायुद्ध घडून येण्याची शक्यता निर्माण झाली. पण ते कोणालाच नको होते. त्यामुळे अमेरिकन राष्ट्राध्यक्ष जॉन केनेडीने संयुक्तराष्ट्र संघटनेचे महासचिव ऊ थांट यांना मध्यस्थी करण्याची विनंती केली. त्यांच्या मध्यस्थीमुळे आणि राष्ट्राध्यक्ष केनेडी व रशियन पंतप्रधान ख्रूश्चेव यांच्यातील चर्चेमुळे शेवटी रशियाने आपला क्षेपणास्त्र तळ तेथून हलवण्याचे ठरवले. त्यामुळे हा प्रश्न सुटला.

**अंतराळ स्पर्धा :**

अंतराळ स्पर्धा ही अमेरिका आणि सोव्हिएत युनियनमधील अंतराळ संशोधनात टप्पे गाठण्यासाठीची स्पर्धा होती. १९५७ मध्ये सोव्हिएत संघाने पहिला उपग्रह, स्पुतनिक, प्रक्षेपित केला आणि १९६९ मध्ये अमेरिकेच्या अपोलो कार्यक्रमाचे यशस्वी चंद्रावर उतरणे हे प्रमुख कार्यक्रम होते. शीतयुद्धादरम्यान दोन महासत्तांमधील तांत्रिक आणि वैचारिक स्पर्धेचे प्रतीक म्हणून अंतराळ शर्यत खेळली गेली.

**शस्त्रास्त्र नियंत्रणाचे प्रयत्न :**

१९७० च्या दशकात, अमेरिका आणि सोव्हिएत युनियनमध्ये तणाव कमी करण्याचा किंवा तणाव कमी करण्याचा काळ सुरू झाला. स्ट्रॅटेजिक आर्म लिमिटेश ट्रीटी (SALT) आयोजित करण्यात आल्या, ज्यामुळे अण्वस्त्रांची शर्यत कमी करण्याच्या उद्देशाने शस्त्र नियंत्रण करार झाले. १९७५ मध्ये स्वाक्षरी झालेल्या हेलसिंकी करारांमध्ये मानवी हक्कांच्या समस्यांना संबोधित करण्यात आले आणि युरोपीय देशांमध्ये सहकार्याला चालना देण्याचे उद्दिष्ट होते.

**शीतयुद्धाचा अंत:**

शीतयुद्धामुळे जगामध्ये भीतीचे, दहशतीचे वातावरण निर्माण झाले. प्रत्येक क्षेत्रात दोन्ही गटांनी एकमेकांची नाकेबंदी करण्याचा कसोशीने प्रयत्न केला. या काळात शस्त्रास्त्र स्पर्धेला व अण्वस्त्र स्पर्धेला प्रचंड प्रोत्साहन मिळाले. अणुयुद्धाची शक्यता मोठ्या प्रमाणात वाढली आणि राष्ट्राराष्ट्रांमधील लष्करी करारांच्या संख्येत मोठी वाढ झाली. मार्च, १९५३ मध्ये स्टॅलिन याचे निधन झाले. त्यामुळे रशियाच्या धोरणातील ताठपणा कमी होऊ लागला. आंतरराष्ट्रीय राजकारणातील तणाव नाहीसा व्हावा आणि अमेरिकेसोबत प्रत्यक्ष युद्ध होऊ नये, असे मार्लेकोव्ह, बुल्गानीन, निकिता कृश्चेव्ह या रशियन नेत्यांना वाटत होते. इ. स. १९७० नंतर अमेरिका आणि रशिया यांच्यातील संबंधांमध्ये सुधारणा झाली. धमक्या, इशारे, संघर्ष यांची जागा परस्परांच्या देशांना भेटी देणे, सांस्कृतिक देवाणघेवाण आणि व्यापारी करारांनी घेतली. १९८० च्या दशकात मात्र या प्रयत्नांना धक्का बसला दोन्ही देशांमध्ये पुन्हा विविध कारणांनी अविश्वासाचे, तणावाचे वातावरण निर्माण झाले. इ. स. १९८५ नंतर पुन्हा परिस्थिती बदलत गेली. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष रोनाल्ड रेगन व रशियाचे राष्ट्राध्यक्ष मिखाईल गोर्बाचेव्ह यांनी सामंजस्याची भूमिका घेत शीतयुद्ध संपुष्टात आणले.

**आपली प्रगती तपासा.**

१. शीतयुद्ध कालीन रशियाचे करार
२. क्युबा प्रश्न

३.१ शीतयुद्ध आणि सोव्हिएत संघ
३.२ डी-स्टालिनायझेशन आणि ख्रुश्चेव्ह थॉ (१९५३-१९६४)
३.३ ग्लासनोस्त (मोकळेपणा) आणि पेरिस्रोईका सुधारणा (१९८५-१९९१)
३.४ सोव्हिएत रशियाच्या विघटनाचे परिणाम

## ६.४ डी-स्टालिनायझेशन आणि ख्रुश्चेव्ह थॉ (१९५३-१९६४) :

निकिता ख्रुश्चेव्ह थॉ हा एक सोव्हिएत राजकारणी व सप्टेंबर १९५३ ते ऑक्टोबर १९६४ दरम्यान देशाचा राष्ट्रप्रमुख तसेच सोव्हिएत संघाच्या कम्युनिस्ट पक्षाचा सरचिटणीस होता. जोसेफ स्टॅलिनच्या मृत्यूनंतर ख्रुश्चेव्हने सोव्हिएतचे नेतृत्व केले व देशामध्ये स्टॅलिनची धोरणे बदलण्याचे कार्य मोठ्या प्रमाणावर हाती घेतले. १९५८ ते १९६४ दरम्यान ख्रुश्चेव्ह सोव्हिएत मंत्रीमंडळाच्या अध्यक्षपदावर होता. स्टॅलिनच्या अखेरच्या काळात ख्रुश्चेव्ह मॉस्कोमध्ये दाखल झाला. ६ मार्च १९५३ रोजी स्टॅलिनच्या मृत्यूनंतर सोव्हिएत कम्युनिस्ट पक्षाच्या नियंत्रणासाठी अनेक नेत्यांमध्ये रस्सीखेच सुरू झाली ज्यामध्ये ख्रुश्चेव्हचा विजय झाला व तो पक्षाचा सरचिटणीस व पर्यायाने देशाचा राष्ट्रप्रमुख व सरकारप्रमुख बनला. १४ ऑक्टोबर १९६४ रोजी कम्युनिस्ट पक्षाने ख्रुश्चेव्हला सरचिटणीस पदावरून काढले व त्याला राजकीय निवृत्ती स्वीकारण्यास भाग पाडले.

१९५३ मध्ये स्टॅलिनकालीन नीतीचा कडकपणा निवळण्याच्या हेतूने रशियन नेत्यांनी पावले उचलली होतीच. पण स्टॅलिनवादाचा उच्छेद होण्याच्या दृष्टीने १९५६ साल महत्त्वाचे ठरले. १९५६ मध्ये साम्यवादी पक्षाची विसावी परिषद १४ फेब्रुवारी रोजी मास्को येथे सुरू झाली. निरनिराळ्या राष्ट्रांच्या ५५ साम्यवादी पक्षांचे प्रतिनिधी त्या परिषदेला उपस्थित होते. त्या परिषदेसमोर २५ फेब्रुवारी रोजी क्रुश्चेवने स्टॅलिनवादाचा उच्छेद करण्याच्या हेतूने केलेले भाषण पक्ष सदस्यांना व राष्ट्राला चांगलेच धक्का देणारे ठरले. आपल्या भाषणात त्याने स्टॅलिन व त्याची नीती यांवर अत्यंत जळजळीत शब्दांत टीकेचा हल्ला चढविला. 'स्टॅलिनने त्याच्या प्रदीर्घ कारकीर्दीत अनेक अन्याय व अत्याचार केले. तो एक दयामायाशून्य जुलमी शासक होता. राष्ट्राच्या शासनाची संपूर्ण सत्ता स्वतःच्या हाती केंद्रित करून घेऊन त्याने व्यक्तिपूजेचे महत्त्व वाढविले. १९३६-३७ च्या पक्षशुद्धीत त्याने हजारो निरपराधी लोकांचे व विरोधकाचे निर्दालन केले. कधीही चुका न करणारा एक आदर्श व महान नेता हे त्याचे चित्रण वास्तवाला धरून नाही. उलट, त्याच्याच चुकीच्या धोरणामुळे महायुद्धात रशियाला अनावश्यक अशी प्रचंड हानी सोसावी लागली, व त्याच्याचमुळे महायुद्धानतर आंतर्राष्ट्रीय क्षेत्रात शीतयुद्ध उद्भवले, असे अनेक आरोप स्टॅलिनवर करून, स्टॅलिनवाद म्हणजे मार्क्सवाद व लेनिनवाद याचे एक विकृत रूप आहे, त्याचे पुनर्मूल्यांकन व्हावे, व्यक्तिपूजेचे अवडंबर रशियात पुन्हा माजवले जाऊ नये राष्ट्रात सामूहिक नेतृत्त्व असले पाहिजे असे आग्रही प्रतिपादन क्रुश्चेवने पक्ष सदस्यांसमोर केले.

**ठिकाणे आणि इमारतींच्या नावात बदल:**

ख्रुश्चेव्हने स्टालिनच्या नावाने ओळखल्या जाणाऱ्या अनेक ठिकाणांची नावे बदलली किंवा उलट केली , ज्यात शहरे, प्रदेश, खुणा आणि इतर सुविधांचा समावेश होता. सोव्हिएत युनियनच्या राज्यगीतातून स्टालिनचे संदर्भ काढून टाकण्यात आले तसेच त्याच्या प्रजासत्ताकांच्या गाण्यांमधूनही स्टालिनचे संदर्भ काढून टाकण्यात आले. पोलंडमधील

वॉर्सा येथील जोसेफ स्टालिन पॅलेस ऑफ कल्चर अँड सायन्सचे १९५६ मध्ये नाव बदलण्यात आले. यूएसएसआरमधील सर्वोच्च बिंदू असलेल्या स्टालिन पीकचे नाव कम्युनिझम पीक असे ठेवण्यात आले. यूएसएसआरच्या पतनानंतर, पर्वताचे नाव इस्मोइल सोमोनी पीक असे ठेवण्यात आले. पूर्वजर्मनीमध्ये १९६१ मध्ये स्टालिनस्टॅडचे नाव बदलून आयझेन ह्युटेनस्टॅड असे ठेवण्यात आले. मॉस्कोमध्ये, अर्बत्स्को -पोक्रोव्स्काया मार्गावरील मॉस्को मेट्रो स्टेशन स्टालिनस्कायाचे नाव सेम्योनोव्स्काया असे ठेवण्यात आले.

**स्टॅलिन स्मारकांची विल्हेवाट:**

या सार्वजनिक नामांतराच्या गतीनंतर, सोव्हिएत सरकारने संपूर्ण यूएसएसआरमधील शेकडो स्टॅलिन स्मारके पाडली. उदाहरणार्थ, आर्मेनियन राजधानी येरेवनमधील स्टॅलिनचे स्मारक १९६२ च्या वसंत ऋतूमध्ये काढून टाकण्यात आले आणि १९६७ मध्ये मदर आर्मेनियाने त्या जागी उभे केले. पूर्व ब्लॉकमध्ये आणखी अनेक स्मारके पाडण्यात आली किंवा नष्ट करण्यात आली. नोव्हेंबर १९६१ मध्ये, बर्लिनच्या स्मारक स्टॅलिनलीवरील मोठा स्टॅलिन पुतळा एका गुप्त कारवाईत काढून टाकण्यात आला. बुडापेस्टमधील स्मारक ऑक्टोबर १९५६ मध्ये नष्ट करण्यात आले. सर्वात मोठे, प्राग स्मारक , नोव्हेंबर १९६२ मध्ये पाडण्यात आले.

**स्टॅलिनच्या शरीराचे स्थलांतर :**

१९६१ मध्ये सीपीएसयूच्या २२ व्या काँग्रेस दरम्यान डी-स्टालिनायझेशनची प्रक्रिया शिगेला पोहोचली. ३१ ऑक्टोबर १९६१ रोजी, स्टालिनचे शरीर रेड स्क्वेअरमधील लेनिनच्या समाधीस्थळापासून क्रेमलिन वॉल नेक्रोपोलिसमध्ये हलवण्यात. ११ नोव्हेंबर १९६१ रोजी स्टॅलिनग्राडचे नाव व्होल्गोग्राड असे ठेवण्यात आले.

**परराष्ट्र धोरणात बदल:**

स्टॅलिन युगानंतर शीतयुद्धादरम्यान ख्रुश्चेव्ह यांनी सोव्हिएत परराष्ट्र धोरणात बदल घडवून आणला. परराष्ट्र धोरणातील सर्वात मोठा बदल "अप्रतिबद्ध राष्ट्रे" यांच्याशी संबंधित होता. सोव्हिएत संघाच्या मते तटस्थतेचे दोन प्रकार होते, विचारसरणीनुसार आणि परिस्थितीनुसार. तटस्थ असलेली अनेक राष्ट्रे या दोन्ही गटांमधून आली होती आणि युरोपियन शक्तींच्या पूर्वीच्या वसाहती होत्या. स्टॅलिनच्या काळात तटस्थ देशांसाठी जागा नव्हती आणि ख्रुश्चेव्हच्या काळात तटस्थ शक्तींची कल्पना आली. परराष्ट्र धोरणात ख्रुश्चेव्ह यांचे सर्वात मोठे योगदान म्हणजे लेनिन काळातील पारंपारिक समाजवादी आदर्शांशी सुसंगत असलेले जगाला वेगळे सोव्हिएत संघ दाखविण्यासाठी डी-स्टालिनायझेशनच्या इतर पैलूंचा फायदा घेणे. अखेरच्या काळात ख्रुश्चेव्हचे दिवस मानसिक नैराश्यामध्ये गेले व ११ सप्टेंबर १९७१ रोजी तो मॉस्कोमधील एका इस्पितळामध्ये हृदयाघाताच्या धक्क्याने मृत्यू पावला.

## ६.५ ग्लासनोस्त (मोकळेपणा) आणि पेरिस्त्रोईका (लोकशाहीकरण) सुधारणा (१९८५-१९९१):

३.१ शीतयुद्ध आणि सोव्हिएत संघ
३.२ डी-स्टालिनायझेशन आणि ख्रुश्चेव्ह थॉ (१९५३-१९६४)
३.३ ग्लासनोस्त (मोकळेपणा) आणि पेरिस्त्रोईका सुधारणा (१९८५-१९९१)
३.४ सोव्हिएत रशियाच्या विघटनाचे परिणाम

स्टॅलिनच्या मृत्यूनंतर सत्तेवर आलेले कुश्चेव्ह, बुल्गानिन, कोसिजिन, ब्रेझनेव्ह इत्यादी नेत्यांनी साम्यवादी हुकूमशाहीची चौकट हळूहळू खिळखिळी करायला सुरुवात केली होती. मार्क्स, लेनिन, स्टॅलिन यांची स्मारके, पुतळे यांची मोडतोड होऊ लागली. लेनिन-स्टॅलिनची शवे दफन करण्यात आली. प्रसारमाध्यमांवरील नियंत्रणे सैल झाल्याने देशात स्वातंत्र्याचे वारे वाहू लागले. परकीय नागरिकांचे येणे-जाणे रशियात सुरू झाल्यानंतर रशियन नागरिकांना आपल्या दैन्यावस्थेची कल्पना येऊ लागली, तरीही प्रशासनातील नोकरशाहीची यंत्रणा जबरदस्त पकड ठेवून होती, कारण या नोकरशाहीचे मुख्य पाठीराखे ब्रेझनेव्हसारखे सत्ताधारीच होते. त्यामुळे जनतेच्या असंतोषाने उग्र रूप धारण केले नव्हते. परंतु ज्या वेळी अन्नधान्य, जीवनावश्यक वस्तूंची टंचाई, रुबलचे आंतरराष्ट्रीय चलनातील अवमूल्यन इत्यादींमुळे सोव्हिएट युनियनची अर्थव्यवस्था कोलमडण्याच्या बेतात आली, त्याचवेळी मिखाईल गोर्बाचेव्ह १९८५ साली सत्तेवर आले. त्यांनी रशियन अर्थव्यवस्था सावरायची असेल तर खुली अर्थव्यवस्था (Market Economy) स्वीकारण्याशिवाय गत्यंतर नाही हे ओळखले; आणि रशियाला आर्थिक संकटातून वाचवण्यासाठी पुनर्रचना व खुलेपणाचे (Perestroika and Glasnost) चे धोरण गोर्बाचेव्हने जाहीर केले. या धोरणाचा परिणाम म्हणून सोव्हिएट रशियात राजकीय व आर्थिक उलथापालथी होऊन सोव्हिएट युनियनचे संघराज्यात्मक प्रजासत्ताक अल्पावधीत कोसळले. मिखाईल गोर्बाचेव्हने सोव्हिएट मिखाईल गोर्बाचेव्हने सोव्हिएट संघराज्याच्या डोलाऱ्यावर हाणलेला हा अखेरचा भीमटोला होता. म्हणूनच मिखाईल गोर्बाचेव्हने रशियात दुसरी राज्यक्रांती घडवून आणली असे म्हटले जाते.

### मिखाईल गोर्बाचेव्ह - दुसऱ्या राज्यक्रांतीचा प्रणेता :

रशियातील झारशाही उलथून टाकून, साम्यवादी राज्यक्रांती लेनिन-स्टॅलिन-टॉटस्की यांनी ऑक्टोबर, १९९७ साली घडवून आणली. रशियातील ही पहिली राज्यक्रांती होती. त्यानंतर सोव्हिएट प्रजासत्ताक संघराज्य (USSR) अधिकतपणे १९३६ साली स्थापन करण्यात आले. असे हे साम्यवादी सोव्हिएट संघराज्य ३१ डिसेंबर, १९९१ साली संपुष्टात येऊन संघराज्याचे विघटन झाले व रशियात दुसरी क्रांती १९९०-९१ साली झाली. या क्रांतीचा प्रणेता मिखाईल गोर्बाचेव्ह होता.

मिखाईल सेरेगोविच गोर्बाचेव्हचा जन्म रशियातील स्टाव्हारापोल या विभागातील पिव्दोलनोये या खेड्यात १९३१ साली झाला. त्या वेळी स्टॅलिनचा सामुदायिक शेतीचा प्रयोग सुरू झाला होता आणि आधुनिक शेती करण्यासाठी ट्रॅक्टरचा उपयोग करण्यात येत होता. गोर्बाचेव्हचे वडील एका ट्रॅक्टर विभागाचे प्रमुख होते. शाळेत असताना एक हुशार विद्यार्थी म्हणून मिखाईलचे नाव घेतले जात होते. त्याच्या अंगी उपजतच अभिनयकला ने शाळेत व महाविद्यालयात तो नाटकात उत्तम काम करीत असे. पुढे मिखाईल प्रिव्होलनोयेपासून १० मैलांवर असलेल्या शाळेत जाऊ लागला. कठीण परिस्थितीत मिखाईलने शालेय शिक्षण पुरे केले. स्टाव्हरोपोल येथील कृषी महाविद्यालयातून पदवी घेतल्यानंतर मिखाईलने मॉस्को विद्यापीठातून कायद्याचे शिक्षणही पूर्ण करून त्यात

डॉक्टरेटही संपादन केली. विद्यापीठात शिक्षण घेत असतानाच गोर्बाचेव्हचे रईसा या युवतीशी प्रेम जमले आणि त्याचे रूपांतर गोर्बाचेव्ह रईसा यांच्या विवाहात झाले.

मिखाईल शालेय शिक्षण पुरे करीत असतानाच कॉम्सोमॉल' या कम्युनिस्ट युवक संघटनेत सामील झाला होता. शिक्षण पूर्ण झाल्यावर स्टॉव्हरापोल येथे कम्युनिस्ट पक्षाच्या कामासाठी त्याची नेमणूक १९७० साली झाली. गाव, तालुका, जिल्हा अशा पातळ्यांवर त्यास बढती मिळत गेली. पुढे त्यांना बढती मिळून स्टाव्हरापोल या विभागाचे ते प्रमुख झाले. स्टाव्हरापोल येथे ते सहा-सात वर्षे होते. त्यांनी शेतीतील वाढीव उत्पादनासाठी बोनस देण्याची पद्धत सुरू केली. १९७७ सालानंतर त्यांची मॉस्कोत नेमणूक करण्यात आली व त्यांना केंद्रीय समितीत शेती विभागाचे प्रमुख करण्यात आले. त्यांनी १९७८ सालात जो एक अहवाल सादर केला होता त्यात सोव्हिएट संघराज्यातील शेती कशी अधोगतीला गेली आहे याचे वर्णन केले होते. गोर्बाचेव्ह १९८३ साली कॅनडात गेल्यावर कॅनडा आणि एकंदर पाश्चात्त्य देशांच्या अर्थव्यवस्थेचा अभ्यास केला. १९८५ साली ते कम्युनिस्ट पक्षाचे सरचिटणीस झाले. १९८५ सालच्या मेमध्ये त्यांनी लेनिनग्राडला भेट दिली आणि तेथेच त्यांनी 'स्वातंत्र्य व पुनर्रचना' या घोषणा केल्या. या घोषणा करताना त्यांनी देशाच्या अर्थव्यवस्थेतील अनेक दोष स्पष्ट केले.

**'ग्लासनोस्त व पेरिस्त्रोईका'चा जन्म** : गोर्बाचेव्ह यांच्या लेनिनग्राडच्या भेटीच्या वेळी रशियातील आर्थिक व राजकीय परिस्थितीचे चित्र स्पष्ट झाले होते. तरीही या परिस्थितीवर खुली चर्चा करण्यासाठी शास्त्रज्ञ, अर्थतज्ज्ञ, पत्रकार यांना त्यांनी आवाहन केले. आवाहनाला प्रतिसाद देऊन शास्त्रज्ञ, अर्थतज्ज्ञ वगैरे मंडळी पुढे आली आणि त्यांनी मोकळेपणाने चर्चा सुरू केली. लेनिनग्राडमधील सामाजिक शास्त्रविषयक संस्थेतील अगबेगियन या अर्थशास्त्रज्ञाच्या मार्गदर्शनाखाली काम करणाऱ्या झास्लावस्कया या समाजशास्त्रज्ञ महिलेने आर्थिक परिस्थितीची चर्चा करताना प्रथमतः 'पेरिस्त्रोईका' (Perestroika) पुनर्रचना हा शब्द वापरला. रशियातील कारखानदारी वाढत असताना माणसाचा विकास करण्याकडे दुर्लक्ष झाले, असे महिला शास्त्रज्ञाचे मत होते. सर्वंकष चर्चेतून निघालेल्या निष्कर्षामुळे गोर्बाचेव्ह यांची राजकीय सुधारणा करण्याविषयीची आस्था अधिकच वाढली व त्यांनी त्या दिशेने ठोस पावले उचलण्यास प्रारंभ केला. बदलत्या जगात आर्थिक सत्ता महत्वाची ठरणार आहे आणि आर्थिक अराजकतेच्या उंबरठ्यावर असलेले सोव्हिएत सध्याच्या चौकटीत राहून एक महासत्ता म्हणून फार काळ वावरू शकणार नाही गोर्बाचेव्ह यांना कल्पना आली होती. यातूनच 'ग्लासनोस्त व पेरिस्त्रोईका'या संकल्पनांचा जन्म झाला.

**सोव्हिएत रशियाचे विघटन :**

सोव्हिएट कम्युनिस्ट पक्षाच्या २ जुलै ते ११ जुलै १९९० रोजी मॉस्कोत येथे आयोजित केलेल्या २८ व्या काँग्रेसच्या महाअधिवेशनात मिखाईल गोर्बाचेव्ह यांनी 'ग्लासनोस्त व पेरिस्त्रोईका' या संकल्पना मांडल्या. गोर्बाचेव्ह यांच्या या संकल्पनांना अधिवेशनातील उपस्थित प्रतिनिधींनी भरघोस पाठिंबा दिला. १९८६ ते १९९० या पाच वर्षांत कम्युनिस्ट जगतात, विशेषतः सोव्हिएट रशियात जे जे घडले ते सारेच ऐतिहासिक आणि आश्चर्यकारकही आहे. या काळात संपूर्ण पूर्व युरोपातील कम्युनिस्ट राजवटी कोसळल्या,

रूमानियातील चासेक्यूसारखे हुकूमशहा परांस्त झाले, बहुपक्षीय निवडणुका होऊन नवी सरकारे अस्तित्वात आली, बर्लिन भिंत उद्ध्वस्त झाली. त्यामुळे एक प्रकारे सोव्हिएत रशियाच्या विघटनाची नांदी घडून आली.

३.१ शीतयुद्ध आणि सोव्हिएत संघ
३.२ डी-स्टालिनायझेशन आणि ख्रुश्चेव्ह थॉ (१९५३-१९६४)
३.३ ग्लासनोस्त (मोकळेपणा) आणि पेरिस्त्रोईका सुधारणा (१९८५-१९९१)
३.४ सोव्हिएत रशियाच्या विघटनाचे परिणाम

**सोव्हिएत रशियाच्या विघटनाचा तक्ता**

| अ.क्र. | उपप्रदेश | देश | स्वातंत्र्य |
|---|---|---|---|
| १. | बाल्टिक | लिथुआनिया (लिथुआनिया प्रजासत्ताक) | ११ मार्च १९९० |
| २. | दक्षिण काकेशस | जॉर्जिया (पूर्वी जॉर्जिया प्रजासत्ताक) | ९ एप्रिल १९९१ |
| ६. | बाल्टिक | एस्टोनिया (एस्टोनिया प्रजासत्ताक) | २० ऑगस्ट १९९१ |
| ४. | बाल्टिक | लटाविया (लटाविया प्रजासत्ताक) | २१ ऑगस्ट १९९१ |
| ५. | पूर्व युरोप | युक्रेन (युक्रेन प्रजासत्ताक) | २४ ऑगस्ट १९९१ |
| ६. | पूर्व युरोप | बेलारूस (बेलारूस प्रजासत्ताक) | २५ ऑगस्ट १९९१ |
| ७. | पूर्व युरोप | मोल्दोव्हा (मोल्दोव्हा प्रजासत्ताक) | २७ ऑगस्ट १९९१ |
| ८. | मध्यआशिया | किर्गिस्तान (किर्गिस्तान प्रजासत्ताक) | ३१ ऑगस्ट १९९१ |
| ९. | मध्यआशिया | उझबेकिस्तान (उझबेकिस्तान प्रजासत्ताक) | १ सप्टेंबर १९९१ |
| १०. | मध्यआशिया | ताजिकिस्तान (ताजिकिस्तान प्रजासत्ताक) | ९ सप्टेंबर १९९१ |
| ११. | दक्षिण काकेशस | आर्मेनिया (आर्मेनिया प्रजासत्ताक) | २१ सप्टेंबर १९९१ |
| १२. | दक्षिण काकेशस | अझरबैजान (अझरबैजान प्रजासत्ताक) | १८ ऑक्टोबर १९९१ |
| १६. | मध्यआशिया | तुर्कमेनिस्तान (पूर्वी तुर्कमेनिस्तान प्रजासत्ताक) | २७ ऑक्टोबर १९९१ |
| १४. | पूर्व युरोप | रशिया (रशियन फेडरेशन) | १२ डिसेंबर १९९१ |
| १५. | मध्यआशिया | कझाकस्तान (कझाकस्तान प्रजासत्ताक) | १६ डिसेंबर १९९१ |

**१. लिथुआनिया (११ मार्च १९९०):**

गोर्बाचेव्ह यांच्या 'पुनर्रचनेस व खुलेपणास' २८ व्या कम्युनिस्ट कॉंग्रेसच्या महाअधिवेशनात मंजुरी देण्याची प्रक्रिया चालू झाली होती. परंतु ही मंजुरी मिळण्याच्या आधीच बाल्टिक राज्यातील लिथुआनियाने ११ मार्च, १९९० रोजी आपले सार्वभौम, स्वतंत्र प्रजासत्ताक घोषित करून सोव्हिएट संघराज्यातून फुटून निघण्याच्या बंडखोरीचे पहिले निशाण फडकविले. २० एप्रिल १९९० रोजी, सोव्हिएत संघाने लिथुआनियाला कच्च्या मालाचा पुरवठा थांबवून आर्थिक नाकेबंदी लादली. केवळ देशांतर्गत उद्योगच नाही तर लोकांनाही इंधन, आवश्यक वस्तू आणि अगदी गरम पाण्याची कमतरता जाणवू लागली. जरी ही नाकेबंदी ७४ दिवस चालली, तरी लिथुआनियाने स्वातंत्र्याची घोषणा सोडली नाही.

**२. जॉर्जिया (९ एप्रिल १९९१):**

१९८८ पासून, जॉर्जियामध्ये स्वातंत्र्याच्या बाजूने मोठ्या प्रमाणात निदर्शने सुरू झाली, ज्यांचे नेतृत्व मेराब कोस्तावा आणि झ्वियाद गामसाखुर्दिया सारख्या जॉर्जियन राष्ट्रवादींनी केले. पुढच्या वर्षी, ४ ते ९ एप्रिल १९८९ रोजी तिबिलिसीमध्ये झालेल्या मोठ्या शांततापूर्ण निदर्शनावर सोव्हिएत सैन्याने केलेले क्रूर दडपशाही ही देशावरील सोव्हिएत राजवटीच्या सातत्याला बदनाम करणारी एक महत्त्वाची घटना ठरली. ऑक्टोबर १९९० मध्ये, सोव्हिएत जॉर्जियामध्ये पहिल्या बहु-पक्षीय निवडणुका झाल्या, ज्या संपूर्ण सोव्हिएत युनियनमधील पहिल्या बहु-पक्षीय निवडणुका होत्या, ज्यामध्ये विरोधी गटांना औपचारिक राजकीय पक्ष म्हणून नोंदणीकृत करण्यात आले होते. झ्वियाद गामसाखुर्दिया यांच्या नेतृत्वाखालील नवीन सरकार स्थापन केले. ९ एप्रिल १९९१ रोजी, सोव्हिएत युनियनच्या पतनाच्या काही काळापूर्वी जॉर्जियाच्या सर्वोच्च परिषदेने ३१ मार्च रोजी झालेल्या जनमत चाचणीनंतर स्वातंत्र्य घोषित केले. जॉर्जिया हा सोव्हिएत युनियनचा पहिला गैर- बाल्टिक प्रजासत्ताक होता, ज्याने अधिकृतपणे स्वातंत्र्य घोषित केले.

**३. एस्टोनिया (२० ऑगस्ट १९९१):**

१९८७ मध्ये सोव्हिएत सरकारने पेरेस्ट्रोइका लागू केल्याने एस्टोनियामध्ये राजकीय सक्रियता निर्माण झाली, ज्यामुळे स्वातंत्र्याच्या दिशेने शांततापूर्ण चळवळ सुरू झाली. २३ ऑगस्ट १९८९ रोजी बाल्टिक वे येथे , सोव्हिएत कब्जाविरुद्ध मोठ्या प्रमाणात निदर्शने करण्यासाठी तीन देशांमध्ये वीस लाख लोकांनी मानवी साखळी तयार केली. १९८८ मध्ये, नवीन राजकीय चळवळी उदयास आल्या, ज्यात स्वातंत्र्य चळवळीतील एक मध्यम गट असलेला पॉप्युलर फ्रंट ऑफ एस्टोनिया आणि सोव्हिएत युनियनमध्ये नोंदणीकृत पहिला गैर-कम्युनिस्ट राजकीय पक्ष बनला. मार्च १९९१ मध्ये, एका सामान्य जनमत चाचणीत (जिथे सर्व नागरिक, नागरिक नसलेले रहिवासी आणि सोव्हिएत लष्करी कर्मचाऱ्यांना मतदान होते) ७८.४% मतदारांनी पूर्ण स्वातंत्र्याला पाठिंबा दिला. १९९१ मध्ये मॉस्कोमध्ये झालेल्या सोव्हिएत सत्तापालटाच्या प्रयत्नादरम्यान एस्टोनियामध्ये २० ऑगस्ट १९९१ रोजी स्वातंत्र्याची घोषणा केली. सोव्हिएत युनियनच्या केंद्रीय सरकारने ६ सप्टेंबर १९९१ रोजी एस्टोनिया, लाटविया आणि लिथुआनियाच्या स्वातंत्र्याला मान्यता दिली आणि १७ सप्टेंबर रोजी हे तिन्ही देश संयुक्त राष्ट्रांचे सदस्य झाले.

## ४. लटाविया (२१ ऑगस्ट १९९१):

४ मे १९९० रोजी लटाव्हियाने आपल्या स्वातंत्र्याची घोषणा केली. ७ मे १९९० रोजी, लाटवियन पॉप्युलर फ्रंटचे इव्हार्स गोडमनिस यांची मंत्रिमंडळाचे अध्यक्ष म्हणून निवड झाली आणि ते स्वतंत्र लटावियन प्रजासत्ताकाचे पहिले पंतप्रधान बनले. एस्टोनिया पाठोपाठ २१ ऑगस्ट १९९१ रोजी लटाव्हिया रशियापासून वेगळा झाला.

## ५. युक्रेन (२४ ऑगस्ट १९९१):

मिखाईल गोर्बाचेव्ह यांनी पेरेस्ट्रोइका व ग्लासनोस्त या धोरणच अवलंब केल्यानंतर युक्रेनियन लोकांसह वांशिक अल्पसंख्याकांमध्ये राष्ट्रवादी आणि फुटीरतावादी प्रवृत्तींना चालना मिळाली. १६ जुलै १९९० रोजी युक्रेनियन सोव्हिएत समाजवादी प्रजासत्ताकाच्या नवनिर्वाचित सर्वोच्च सोव्हिएतने युक्रेनच्या सार्वभौमत्वाची घोषणा स्वीकारली. गोर्बाचेव्हला पदच्युत करताना मॉस्कोमधील काही कम्युनिस्ट नेत्यांनी केलेल्या अयशस्वी बंडानंतर २४ ऑगस्ट १९९१ रोजी पूर्णपणे स्वातंत्र्य घोषित करण्यात आले. १ डिसेंबर रोजी झालेल्या जनमत चाचणीत ९२% युक्रेनियन मतदारांनी ते मंजूर केले. युक्रेनचे नवे अध्यक्ष लिओनिड क्रावचुक यांनी बेलावेझ्ञा करारांवर स्वाक्षरी केली.

## ६. बेलारूस (२५ ऑगस्ट १९९१):

८ डिसेंबर १९९१ रोजी रशिया, युक्रेन आणि बेलारूसच्या नेत्यांनी बेलावेझ्ञा करारावर स्वाक्षरी केली आणि सोव्हिएत युनियनचे विघटन झाले. बेलारूसने २७ जुलै १९९० रोजी बेलारूसी सोव्हिएत समाजवादी प्रजासत्ताकाच्या राज्य सार्वभौमत्वाची घोषणापत्र जारी करून स्वतःला सार्वभौम घोषित केले. बायलोरशियाच्या कम्युनिस्ट पक्षाच्या पाठिंब्याने २५ ऑगस्ट १९९१ रोजी देशाचे नाव बेलारूस प्रजासत्ताक असे बदलण्यात आले. बेलारूसच्या सर्वोच्च सोव्हिएटचे अध्यक्ष स्टॅनिस्लाव शुश्केविच यांनी ८ डिसेंबर १९९१ रोजी बियालोविझ्ञा फॉरेस्टमध्ये रशियाचे बोरिस येल्तसिन आणि युक्रेनचे लिओनिड क्रावचुक यांची भेट घेऊन सोव्हिएत युनियनचे विघटन आणि स्वतंत्र राज्यांच्या राष्ट्रकुलची स्थापना औपचारिकपणे जाहीर केली.

## ७. मोल्दोव्हा (२७ ऑगस्ट १९९१):

१९२४ मध्ये युक्रेनियन एसएसआरमध्ये बेसराबियाच्या पूर्वेला अंशतः मोल्दोव्हन-वस्ती असलेल्या प्रदेशांवर तथाकथित मोल्दोव्हियन स्वायत्त प्रजासत्ताक स्थापन केले. १९४० मध्ये, मोलोटोव्ह-रिबेनट्रॉप कराराच्या परिणामी रोमानियाला बेसराबिया आणि उत्तर बुकोविना सोव्हिएत युनियनला सोव्हिएत युनियनला सोपवावे लागले, ज्यामुळे मोल्डाव्हियन सोव्हिएत समाजवादी प्रजासत्ताक (मोल्डाव्हियन एसएसआर) ची निर्मिती झाली. २७ ऑगस्ट १९९१ रोजी, सोव्हिएत युनियनचे विघटन सुरू असताना, मोल्डाव्हियन एसएसआरने स्वातंत्र्य घोषित केले आणि मोल्दोव्हा हे नाव धारण केले. १९९४ मध्ये मोल्दोव्हाचे संविधान स्वीकारण्यात आले आणि देश संसदीय प्रजासत्ताक बनला.

### ८. किर्गिस्तान (३१ ऑगस्ट १९९१) :

मार्च १९९१ मध्ये सोव्हिएत युनियनच्या संरक्षणावरील जनमत चाचणीत, ८८.७% मतदारांनी सोव्हिएत युनियनला "नूतनीकरण केलेले संघराज्य" मान्यता दिली. तरीही, त्याच वर्षी ऑगस्टमध्ये अलिप्ततावादी शक्तींनी किर्गिस्तानचे स्वातंत्र्य पुढे ढकलले. १९ ऑगस्ट १९९१ रोजी जेव्हा राज्य आपत्कालीन समितीने मॉस्कोमध्ये सत्ता हाती घेतली, तेव्हा किर्गिस्तानमध्ये अकायेव यांना पदच्युत करण्याचा प्रयत्न झाला. पुढच्या आठवड्यात सत्तापालट कोसळल्यानंतर अकायेव आणि उपाध्यक्ष जर्मन कुझनेत्सोव्ह यांनी सोव्हिएत युनियनच्या कम्युनिस्ट पक्ष (CPSU) मधून राजीनामा जाहीर केला आणि संपूर्ण ब्युरो आणि सचिवालयाने राजीनामा दिला. त्यानंतर ३१ ऑगस्ट १९९१ रोजी किर्गिस्तान प्रजासत्ताक म्हणून सोव्हिएत युनियनपासून स्वातंत्र्याची घोषणा करणाऱ्या सर्वोच्च सोव्हिएत मतदानाने मतदान केले.

### ९. उझबेकिस्तान (१ सप्टेंबर १९९१):

१९२० च्या सुरुवातीस मध्य आशिया पूर्णपणे रशियाच्या ताब्यात होता आणि बोल्शेविकांना सुरुवातीच्या काळात काही प्रतिकार होऊनही उझबेकिस्तान आणि उर्वरित मध्य आशिया सोव्हिएत युनियनचा भाग बनले. २७ ऑक्टोबर १९२४ रोजी उझबेकिस्तान सोव्हिएत समाजवादी प्रजासत्ताक निर्माण झाले. २० जून १९९० रोजी उझबेकिस्तानने आपले राज्य सार्वभौमत्व घोषित केले. ३१ ऑगस्ट १९९१ रोजी मॉस्कोमधील अयशस्वी बंडाच्या प्रयत्नानंतर उझबेकिस्तानने १ सप्टेंबर १९९१ रोजी स्वातंत्र्य घोषित केले. १ सप्टेंबर हा राष्ट्रीय स्वातंत्र्य दिन म्हणून घोषित करण्यात आला.

### १०. ताजिकिस्तान (९ सप्टेंबर १९९१):

सोव्हिएत युनियनमध्ये ताजिकिस्तान ५ डिसेंबर १९२९ रोजी सामील झाला. ९ सप्टेंबर १९९१ रोजी, सोव्हिएत युनियनचे विघटन होत असताना ताजिकिस्तानने स्वतःला स्वतंत्र सार्वभौम राज्य घोषित केले. स्वातंत्र्यानंतर मे १९९२ ते जून १९९७ पर्यंत यादवी युद्ध सुरू झाले. युद्धाच्या समाप्तीपासून, नव्याने स्थापित झालेल्या राजकीय स्थिरता आणि परकीय मदतीमुळे देशाची अर्थव्यवस्था वाढू लागली आहे.

### ११. आर्मेनिया (२१ सप्टेंबर १९९१):

१९८० च्या दशकातील गोर्बाचेव्हच्या काळात, ग्लासनोस्ट आणि पेरेस्ट्रोइकाच्या सुधारणांसह आर्मेनियन लोकांनी सोव्हिएत-निर्मित कारखान्यांमुळे होणाऱ्या प्रदूषणाला विरोध करत त्यांच्या देशासाठी चांगल्या पर्यावरणीय काळजीची मागणी करण्यास सुरुवात केली. सोव्हिएत अझरबैजान आणि त्याचा स्वायत्त जिल्हा नागोर्नो-काराबाख बहुसंख्य-आर्मेनियन प्रदेश यांच्यातही तणाव निर्माण झाला. काराबाखच्या आर्मेनियन लोकांनी सोव्हिएत आर्मेनियाशी एकीकरणाची मागणी केली. आर्मेनियाच्या कोणत्याही समस्या दूर करण्यात गोर्बाचेव्हच्या असमर्थतेमुळे आर्मेनियन लोकांमध्ये निराशा निर्माण झाली आणि स्वातंत्र्याची वाढती भूक वाढली. २३ ऑगस्ट १९९० रोजी, आर्मेनियाने आपल्या भूभागावर आपले सार्वभौमत्व घोषित केले. १७ मार्च १९९१ रोजी, आर्मेनियाने, बाल्टिक राज्ये, जॉर्जिया आणि मोल्दोव्हासह देशव्यापी जनमत चाचणीवर बहिष्कार टाकला

ज्यामध्ये ७८% मतदारांनी सुधारित स्वरूपात सोव्हिएत संघाच्या अस्तित्वासाठी मतदान केले. २१ सप्टेंबर १९९१ रोजी मॉस्को, आरएसएफएसआर येथे ऑगस्टमध्ये झालेल्या अयशस्वी सत्तापालटानंतर आर्मेनियाने अधिकृतपणे आपले राज्यत्व घोषित केले. २६ डिसेंबर १९९१ रोजी सोव्हिएत युनियनचे अस्तित्व संपुष्टात आले आणि आर्मेनियाचे स्वातंत्र्य मान्य करण्यात आले.



### १२. अझरबैजान (१८ ऑक्टोबर १९९१):

मिखाईल गोर्बाचेव्ह यांनी सुरू केलेल्या ग्लासनोस्तच्या धोरणानंतर सोव्हिएत युनियनच्या विविध प्रदेशांमध्ये नागरी अशांतता आणि वांशिक संघर्ष वाढला, ज्यामध्ये अझरबैजान एसएसआरचा स्वायत्त प्रदेश नागोर्नो-काराबाख यांचा समावेश होता. आधीच तापलेल्या संघर्षाकडे मॉस्कोच्या उदासीनतेला प्रतिसाद म्हणून अझरबैजानमधील अशांततेमुळे स्वातंत्र्य आणि अलिप्ततेची मागणी झाली, ज्याचा शेवट बाकूमधील ब्लॅक जानेवारीच्या घटनांमध्ये झाला. नंतर १९९० मध्ये अझरबैजान एसएसआरच्या सर्वोच्च परिषदेने आपल्या नावातून "सोव्हिएत समाजवादी" हे शब्द वगळले. अझरबैजान प्रजासत्ताकाच्या सार्वभौमत्वाची घोषणा केली. अझरबैजानच्या सर्वोच्च परिषदेने १८ ऑक्टोबर १९९१ रोजी स्वातंत्र्याची घोषणा केली.

### १३. तुर्कमेनिस्तान (२७ ऑक्टोबर १९९१):

रशियन साम्राज्याचा आणि नंतर सोव्हिएत युनियनचा एक शतकाहून अधिक काळ भाग राहिल्यानंतर सोव्हिएत युनियनच्या विघटनानंतर तुर्कमेनिस्तानने २७ ऑक्टोबर १९९१ रोजी आपले स्वातंत्र्य घोषित केले. सोव्हिएत युनियनच्या कम्युनिस्ट पक्षाचे माजी अधिकारी सपरमुरत नियाझोव्ह यांनी १९८५ पासून तुर्कमेनिस्तानवर राज्य केले. ते तुर्कमेनिस्तान एसएसआरच्या कम्युनिस्ट पक्षाचे प्रमुख झाले.

### १४. रशिया (१२ डिसेंबर १९९१):

१९८५ पासून, सोव्हिएत व्यवस्थेत उदारमतवादी सुधारणा लागू करण्याचा प्रयत्न करणारे शेवटचे सोव्हिएत नेते मिखाईल गोर्बाचेव्ह यांनी आर्थिक स्थिरतेचा काळ संपवण्यासाठी आणि सरकारचे लोकशाहीकरण करण्यासाठी ग्लासनोस्ट (खुलेपणा) आणि पेरेस्ट्रोइका (पुनर्रचना) ही धोरणे सुरू केली. तथापि, यामुळे देशभरात मजबूत राष्ट्रवादी आणि फुटीरतावादी चळवळींचा उदय झाला. सोव्हिएत युनियनपासून वेगळे होण्याचा निर्णय घेतल्याने आर्थिक आणि राजकीय गोंधळ सुरू झाला. १७ मार्च रोजी, एक जनमत चाचणी घेण्यात आली, ज्यामध्ये सहभागी नागरिकांच्या बहुसंख्येने सोव्हिएत युनियनला नूतनीकरण केलेल्या संघराज्यात बदलण्याच्या बाजूने मतदान केले. जून १९९१ मध्ये, बोरिस येल्त्सिन रशियन इतिहासातील पहिले थेट निवडून आलेले अध्यक्ष बनले. ऑगस्ट १९९१ मध्ये, गोर्बाचेव्हच्या सरकारच्या सदस्यांनी गोर्बाचेव्हविरुद्ध आणि सोव्हिएत युनियन टिकवून ठेवण्याच्या उद्देशाने केलेल्या सत्तापालटाच्या प्रयत्नामुळे सोव्हिएत युनियनच्या कम्युनिस्ट पक्षाचा अंत झाला. १२ डिसेंबर १९९१ रोजी रशिया १४ राष्ट्रांपासून वेगळा झाला.

**१५. कझाकस्तान (१६ डिसेंबर १९९१):**

ऑगस्ट १९९१ मध्ये मॉस्कोमध्ये झालेल्या अयशस्वी सत्तापालटाच्या प्रयत्नानंतर १६ डिसेंबर १९९१ रोजी देशाने पूर्ण स्वातंत्र्याची घोषणा केली आणि असे करणारे ते शेवटचे सोव्हिएत प्रजासत्ताक बनले. २५ ऑक्टोबर १९९० रोजी कझाकस्तानने सोव्हिएत युनियनमध्ये आपले सार्वभौमत्व घोषित केले. कझाकस्तानच्या घोषणेनंतर दहा दिवसांनी सोव्हिएत युनियन स्वतःच विरघळले. कझाकस्तानचे कम्युनिस्ट काळातील नेते नुरसुल्तान नजरबायेव हे देशाचे पहिले राष्ट्रपती बनले.

मिखाईल गोर्बाचेव्ह हे सोव्हिएत युनियनचे अखेरचे अध्यक्ष होते आणि त्यांच्या कार्यकाळात सोव्हिएत युनियनचे विघटन झाले. त्यांनी केलेल्या सुधारणांमुळे (ग्लासनोस्तस्त आणि पेरेस्त्रोइका) सोव्हिएत युनियनमध्ये बदल झाले, ज्यामुळे शेवटी त्याचे तुकडे झाले आणि १५ नवीन स्वतंत्र राष्ट्रे उदयास आली. २६ डिसेंबर १९९१ रोजी सोव्हिएत युनियनचे औपचारिकपणे विघटन झाले.

**आपली प्रगती तपासा.**

१. रशियाच्या विघटनावर सविस्तर चर्चा करा.
२. मिखाईल गोर्बाचेव्ह

## ६.६. सोव्हिएत रशियाच्या विघटनाचे परिणाम:

**१. नवीन राष्ट्रांची निर्मिती:**

१९९१ मध्ये सोव्हिएत संघाचा (USSR) औपचारिकपणे विघटन झाला आणि एकसंध संघराज्याच्या जागी १५ स्वतंत्र राष्ट्रांची निर्मिती झाली. USSR चे पतन हे २० व्या शतकातील एक निर्णायक वळण होते. या नव्या राष्ट्रांमध्ये रशिया, युक्रेन, बेलारूस, एस्टोनिया, लात्विया, लिथुआनिया, मोल्डोवा, जॉर्जिया, आर्मेनिया, अझरबेजान, कझाकिस्तान, उझबेकिस्तान, ताजिकिस्तान, तुर्कमेनिस्तान आणि किर्गिझस्तान यांचा समावेश होतो. हे देश पूर्वी सोव्हिएत संघाच्या नियंत्रणात असले तरी विघटनानंतर प्रत्येकाने आपापली स्वतंत्र शासनव्यवस्था आणि संविधान तयार केले. काही देशांनी लोकशाही स्वीकारली तर काही ठिकाणी सत्तेचा केंद्रीकरण अधिक वाढले. अनेक राष्ट्रांनी आपल्या ऐतिहासिक, सांस्कृतिक ओळखींची पुनर्स्थापना केली. उदाहरणार्थ, बॅल्टिक राष्ट्रांनी रशियन प्रभाव झुगारून युरोपाशी आपले संबंध घट्ट केले.

***२. शीतयुद्धाचा अंत:***

शीतयुद्ध (Cold War) हे अमेरिका आणि सोव्हिएत संघ यांच्यातील एक दीर्घकालीन तणावाचे, स्पर्धेचे आणि वैचारिक संघर्षाचे युग होते. या युद्धाचा शेवट USSR च्या विघटनासह झाला. साम्यवाद आणि भांडवलशाही यांच्यातील स्पर्धा संपुष्टात आली आणि अमेरिकेच्या नेतृत्वाखालील भांडवलशाही जग यशस्वी ठरले. या परिवर्तनामुळे जगातील राजकीय समीकरणे बदलली. जगात एक महासत्ता राहिल्यामुळे विविध देशांमध्ये संरक्षण व

आर्थिक धोरणांत आमूलाग्र बदल झाले. अनेक देशांमध्ये आधुनिकीकरणाच्या नावाखाली उदारीकरणाचे धोरण राबवले गेले.

३.१ शीतयुद्ध आणि सोव्हिएत संघ
३.२ डी-स्टालिनायझेशन आणि ख्रुश्चेव्ह थॉ (१९५३-१९६४)
३.३ ग्लासनोस्त (मोकळेपणा) आणि पेरिस्त्रोईका सुधारणा (१९८५-१९९१)
३.४ सोव्हिएत रशियाच्या विघटनाचे परिणाम

### ६. नाटोचा विस्तार:

सोव्हिएत संघाच्या विघटनानंतर अमेरिका आणि पश्चिम युरोपने नाटो (NATO – North Atlantic Treaty Organization) चा पूर्व युरोपात मोठ्या प्रमाणावर विस्तार केला. पूर्वी सोव्हिएत संघाच्या प्रभावाखाली असलेले देश – पोलंड, चेक रिपब्लिक, हंगेरी, आणि नंतर बॅल्टिक राष्ट्रे (एस्टोनिया, लात्विया, लिथुआनिया) – यांना नाटो सदस्यत्व देण्यात आले. रशियासाठी हा विस्तार एक धोका मानला गेला. नाटोच्या या हालचालींमुळे पूर्व युरोप आणि रशिया यांच्यातील तणाव वाढले, ज्याचे पर्यवसान पुढे २०१४ मधील क्रिमिया व युक्रेन संकटात झाले. यामुळे रशियाने पश्चिमेकडे एक वेगळा आणि अधिक आक्रमक दृष्टिकोन स्वीकारला.

### ४. अमेरिकेचा जागतिक महासत्ता म्हणून उदय :

सोव्हिएत संघाच्या पतनानंतर अमेरिकेचा "एकमेव जागतिक महासत्ता" (Unipolar Superpower) म्हणून उदय झाला. १९९० च्या दशकात अमेरिका आर्थिक, लष्करी आणि तांत्रिक दृष्ट्या प्रचंड प्रभावी बनली. जगातील अनेक भागांतील संघर्षांत अमेरिका मध्यस्थ किंवा हस्तक्षेप करणारा देश ठरला – इराक युद्ध (१९९१), बाल्कन युद्ध, अफगाणिस्तान युद्ध (२००१), इराकवर हल्ला (२००३) इत्यादी. या काळात अमेरिकेच्या धोरणांना जागतिक स्तरावर मोठे समर्थन होते, कारण "लोकशाही व मानवी हक्कांचे रक्षण" हे त्यांचे प्रचारवाक्य बनले. याचा प्रत्यक्ष परिणाम म्हणजे वर्ल्ड बँक, IMF, WTO सारख्या संस्थांवरील अमेरिकेचा प्रभाव अधिक प्रबळ झाला.

### ५. रशियामधील आर्थिक संकट आणि "शॉक थेरपी":

USSR नंतरच्या रशियात १९९० ते २००० या दशकात प्रचंड आर्थिक संकट निर्माण झाले. सेंट्रल प्लॅनिंगचा अंत झाला, पण नव्या भांडवलशाही व्यवस्था आणण्याची तयारी नव्हती. रशियात "शॉक थेरपी" धोरण राबवण्यात आले. म्हणजेच अचानक किंमतींचे नियंत्रण हटवले, उद्योगधंदे खाजगी करण्यात आले, आणि सरकारी मालमत्तांचे खाजगीकरण झाले.या बदलांमुळे हायपर-इन्फ्लेशन, बेरोजगारी, आणि सामाजिक विषमता वाढली. काही मोजक्या उद्योजकांना कोट्यवधी डॉलर्सची संपत्ती मिळाली – हे "ऑलिगार्क" म्हणून ओळखले गेले. मात्र सामान्य नागरिकांचे जीवनमान प्रचंड खालावले.

### ६. आंतरराष्ट्रीय संघर्ष व यादवी युद्धे:

सोव्हिएत संघाच्या विघटनामुळे काही भागांमध्ये आंतरवांशिक, धार्मिक, व प्रादेशिक संघर्ष उफाळले. पूर्वी USSR च्या नियंत्रणामुळे रोखले गेलेले तणाव आता खुले होऊ लागले. नागोर्नो-काराबाख (आर्मेनिया-आझरबेजान), ट्रान्सनिस्ट्रिया (मोल्डोवा), चचेन्या युद्ध (रशिया), दक्षिण ओसेशिया व अब्खाझिया (जॉर्जिया), ताजिकिस्तान गृहयुद्ध हे संघर्ष हजारो लोकांच्या मृत्यूस जबाबदार ठरले. काही ठिकाणी ते अद्यापही चालू आहेत, ज्यामुळे या देशांची अर्थव्यवस्था, लोकशाही व सामाजिक स्थैर्य धोक्यात आले.

**७. साम्यवादाचा अंत:**

सोव्हिएत संघ हा साम्यवादी विचारसरणीचा किल्ला होता. १९१७ च्या बोल्शेविक क्रांतीपासून ते १९९१ पर्यंत USSR हे समाजवादी विचारांचा केंद्रबिंदू राहिले. त्यांच्या विघटनाने साम्यवादाच्या जागतिक प्रतिमेला मोठा धक्का बसला. राजकीय दृष्टिकोनातून, ही साम्यवादाच्या अपयशाची आणि भांडवलशाहीच्या यशाची घोषणा होती. साम्यवादाच्या वतीने चालणारे अनेक गट (उदा. भारतातील कम्युनिस्ट पक्ष) कमकुवत झाले. चीननेही यानंतर आपले आर्थिक धोरण अधिक लवचिक आणि बाजारपेठ-उन्मुख बनवले. साम्यवादी व्यवस्थेतील बंद अर्थव्यवस्था, अभिव्यक्तीवर बंधने, आणि दडपशाहीने सामान्य जनतेत असंतोष निर्माण केला होता, जो शेवटी १९९१ मध्ये उफाळून आला.

**८. जागतिक राजकारणात बदल:**

सोव्हिएत संघाच्या विघटनामुळे जगात असलेली द्विध्रुवीय व्यवस्था (Bipolar World Order) संपुष्टात आली. याऐवजी एकध्रुवीय व्यवस्था (Unipolarity) निर्माण झाली ज्यात अमेरिका हे एकमेव जागतिक महासत्ता म्हणून उभी राहिली. संयुक्त राष्ट्रसंघातही अमेरिकेचा प्रभाव वाढला. अमेरिका अनेक जागतिक संघर्षांत निर्णायक भूमिका बजावू लागली (उदा. खाडी युद्ध, बाल्कन संकट, अफगाणिस्तान युद्ध). सोव्हिएत समर्थक अनेक देशांनी (क्युबा, व्हेनेझुएला, उत्तर कोरिया) आपल्या धोरणात बदल केला. भूराजकीय मांडणीचा संपूर्ण चेहरामोहरा बदलला आणि नव्या सामरिक आणि कूटनीतिक समीकरणांची सुरुवात झाली.

**९. जागतिक आर्थिक व्यवस्थेतील बदल:**

सोव्हिएत संघाच्या कोसळल्यानंतर जागतिक स्तरावर भांडवलशाही, उदारीकरण आणि जागतिकीकरणाला चालना मिळाली. WTO मध्ये अधिकाधिक देश सहभागी झाले. IMF व World Bank चा प्रभाव वाढला. बहुराष्ट्रीय कंपन्यांचा प्रवेश नव्या बाजारपेठांमध्ये झाला. यामुळे जागतिक व्यापारात वाढ झाली, पण गरिबी, असमानता आणि पर्यावरणीय संकट यांसारख्या समस्या देखील वाढल्या.

**१०. सांस्कृतिक, भाषिक व वैचारिकतेतील बदल:**

सोव्हिएत संघाच्या काळात रशियन भाषा, विचार व एकसंध ओळख लादली जात होती. विघटनानंतर अनेक नव्या देशांनी आपल्या स्थानिक भाषांचा, संस्कृतीचा आणि इतिहासाचा पुनरुज्जीवन केला. लाटव्हिया, लिथुआनिया, एस्टोनियाने रशियन नागरिकांना नागरिकत्व नाकारले शिक्षण, प्रशासन, प्रसारमाध्यमे स्थानिक भाषांतून काही देशांत रशियन भाषिक अल्पसंख्याकांवर तणाव निर्माण झाला.

## ६.७. सारांश

दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिका आणि सोव्हिएत संघ यांच्यात सुरू झालेला **शीतयुद्ध** हा केवळ लष्करी नव्हे, तर विचारसरणी, राजकारण, अर्थव्यवस्था आणि तंत्रज्ञान यांचाही संघर्ष होता. सोव्हिएत संघ साम्यवादाचा प्रमुख पुरस्कर्ता होता, ज्याने अनेक देशांवर प्रभाव

टाकला. मात्र, या व्यवस्थेमधील अंतर्गत कमकुवतपणा आणि दडपशाहीमुळे असंतोष वाढत गेला. १९५३ मध्ये **स्टालिनच्या मृत्यूनंतर** निकिता ख्रुश्चेव्हने **डी-स्टालिनायझेशनची** सुरुवात केली. यामध्ये राजकीय मोकळीक, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, आणि दडपशाही कमी करण्याचा प्रयत्न झाला. या काळात **ख्रुश्चेव्ह थॉ** नावाने ओळखले जाणारे सैल धोरण राबवण्यात आले. यामुळे काही काळ वातावरण सौम्य झाले, पण समस्या कायम राहिल्या. १९८५ मध्ये मिखाइल गोर्बाचेव्ह सत्तेवर आल्यानंतर **ग्लासनोस्त (मोकळेपणा)** आणि **पेरिस्रोईका (पुनर्रचना)** या सुधारणा राबवल्या गेल्या. त्यांचा उद्देश सोव्हिएत संघ वाचवणे होता, पण या सुधारणांनी आर्थिक आणि राजकीय तणाव अधिकच वाढवला. विविध घटक प्रजासत्ताकांनी स्वातंत्र्याची मागणी केली. शेवटी १९९१ मध्ये सोव्हिएत संघाचा **विघटन** झाला. अमेरिका एकमेव महासत्ता म्हणून उदयास आली आणि साम्यवादाचा प्रभाव मोठ्या प्रमाणात कमी झाला. जागतिक राजकारणात नव्या युती, संघर्ष आणि भूराजकीय बदल घडून आले. हे विघटन आधुनिक इतिहासातील एक निर्णायक वळण ठरले.

३.१ शीतयुद्ध आणि सोव्हिएत संघ
३.२ डी-स्टालिनायझेशन आणि ख्रुश्चेव्ह थॉ (१९५३-१९६४)
३.३ ग्लासनोस्त (मोकळेपणा) आणि पेरिस्त्रोईका सुधारणा (१९८५-१९९१)
३.४ सोव्हिएत रशियाच्या विघटनाचे परिणाम

## ६.८. प्रश्न:

**१.** सोव्हिएत रशियाची शीतयुदकालीन वाटचाल विशद करा.

२. **ख्रुश्चेव्ह थॉ याने स्टॅलिनच्या धोरणांचा उच्छेद घडवून आणला. चर्चा करा.**

**३.** ग्लासनोस्त (मोकळेपणा) आणि पेरिस्त्रोईका (१९८५-१९९१) सुधारणांनी सोव्हिएत रशियाच्या विघटनात महत्वपूर्ण भूमिका बजावली. भाष्य करा.

४. सोव्हिएत रशियाच्या विघटनाचे परिणाम विशद करा.

५. मिखाईल गोर्बाचेव्ह यावर टिपण लिहा.

## ६.९. संदर्भ सूची :


१. कदम य. ना. आधुनिक जग: भाग-२, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २०१०.
२. वैद्य सुमन, आधुनिक जग भाग-२, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती, १९९७.
३. गायकवाड आर. डी., कदम य. ना., थोरात डी. डी., आधुनिक जगाचा इतिहास : भाग-२, १९२०-१९७५, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, १९९७.
४. कोलारकर श. गो., युरोप (१७८९-१८७०) आधुनिक युरोप (१८७१-१९६५), श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, २००५.
५. जोशी पी. जी., विसाव्या शतकाचा इतिहास, विद्या प्रकाशन, नागपूर, २००६.
६. तळवलकर गोविंद, सोव्हिएत साम्राज्याचा उदय व अस्त खंड:१ व २, मौज प्रकाशन गृह, पुणे, १९९८.
७. उदगावकर म. न., राऊत गणेश, आधुनिक जग, डायमंड पब्लिकेशन, पुणे, २००८.


❖❖❖❖